**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ३२**

**सभावृत्तांत**

दिनांक - १९/०७/२०१४ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै २०१४ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.१९.०७.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१५. मा.काळजे नितीन प्रताप
१६. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.भारती फरांदे
२७. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२८. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२९. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३०. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३१. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३४. मा.लोंढे गणेश नारायण
३५. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३६. मा.†›. संदीप गुलाब चिंचवडे
३७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३८. मा.अपर्णा निलेश डोके
३९. मा.अनंत सुभाष को-हाळे
४०. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४१. मा.जयश्री वसंत गावडे
४२. मा.पवार मनिषा काळूराम
४३. मा.प्रसाद शेट्टी
४४. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४५. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४६. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४७. मा.शेख अस्लम शैकत
४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव
५१. मा.मडिगेरी वर्षा विलास
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५५. मा.गोफणे अनुराधा देविदास
५६. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५७. मा.महेशदादा किसन लांडगे
५८. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५९. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६०. मा.लोंढे शुभांगी संतोष
६१. मा.सावळे सिमा रविंद्र
६२. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

६३. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६४. मा.पालांडे सुजाता सुनिल
६५. मा.बहल योगेश मंगलसेन
६६. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६७. मा.कदम सदगुरु महादेव
६८. मा.गिता सुशील मंचरकर
६९. मा.कैलास महादेव कदम
७०. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७१. मा.आसवानी सविता धनराज
७२. मा.वाघेरे सुनिता राजेश
७३. मा.आसवाणी हिरानंद ऊर्फ डब्बू किमतराम
७४. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७५. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७६. मा.काळे विमल रमेश
७७. मा.पाडाळे निता विलास
७८. मा. विनोद जयवंत नढे
७९. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८०. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८१. मा.विमलताई सुरेश जगताप
८२. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८३. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
८४. मा.बारणे माया संतोष
८५. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८६. मा.कलाटे स्वाती मयुर
८७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८८. मा.चौंधे आरती सुरेश
८९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९०. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९१. मा.जवळकर वैशाली राहुल
९२. मा.जगताप राजेंद्र गणपत
९३. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९४. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
९५. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९६. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९७. मा.शेंडगे आशा सुखदेव
९८. मा.मोटे किरण बाळासाहेब
९९. मा.संजय केशवराव काटे

१००. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०१. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१०२. मा.पाटील सुजित वसंत
१०३. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.खांडकेकर, मा.दुरगूडे, मा.माछरे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील - सहशहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा.डॉ.अनिल रॉय - आरोग्य वैद्दकीय अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.साळवी, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.केदारी, मा.कांबळे-कार्य.अभियंता, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे - प्रशासन अधिकारी (जनतासंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे-** मा.महापौर साहेब, अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे- माजी महापौर, झोहरा सेहगल- हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री, किरण काळभोर- सामाजिक कार्यकर्ते, मुकींदराव नढे, वृषाली सचिन लांडगे, भगवंत यशवंत काटे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

**मा.बाळासाहेब तरस -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.
**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व नगरसेवक, अधिकारी, पत्रकार मित्र. आज अतीशय दु:ख होत आहे या सभागृहाचे अनेक वर्षे नानासाहेबांनी नेतृत्व केले ते काल आपल्यातून अचानक निघून गेले. एक खेळाडू आणि एक सचोटीने नेतृत्व करणारा नेता, संयमी स्वभाव असलेला नेता म्हणून त्यांचे स्थान होते, अनेक वर्षे पक्षनेता ते महापौर या सर्व पदावर त्यांची अतीशय कारकिर्द गाजली. या शहराच्या संयुक्त कॉंग्रेस मध्ये, त्या नंतर राष्ट्रवादी कॉंग्रेस मध्ये अनेक निवडणूका ज्यावेळेला व्हायच्या त्यावेळेला पक्षाची धुरा नानासाहेब सांभाळत होते. मीतर असे म्हणेल की मराठवाडयातील कार्यकर्ता म्हणून भाऊसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करत होतो. ९७ साली मेंबर ऑफ पार्लमेंटरी बोर्डामध्ये माझ्यासारख्या छोटया कार्यकर्त्यांना नानासाहेबांच्या शिफारशीने सुशील कुमार शिंदे यांच्याकडे पाठवल आणि मी पार्लमेंटरी बोर्डात गेलो, कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना एका छोटया कार्यकर्त्याला संधी देण्याच्यासाठीचे काम त्यांनी केले. मी आज त्यांच्या कुटूंबीयाच्या दु:खामध्ये सहभागी आहे तसेच भारतीय समाजमनावर ज्यांनी अनेकवर्षे अदिराज्य गाजवल

अशा चित्रपट अभिनेत्या झोहरा सहगल यांचही निधन झालेल आहे त्यांना व इतर सर्वांना भावपुर्ण आदरांजली वाहतो आणि थांबतो.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.सभागृह. माजी पक्षनेते, सर्व पक्षाचे मार्गदर्शक नानासाहेब शितोळे यांचे काल आकस्मिक हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालेले आहे. संपुर्ण शहराला धक्का देणारी ही गोष्ट समजल्यानंतर प्रत्येकाला वाईट वाटलेल आहे. नानासाहेबां बरोबर काम करण्याच भाग्य माझ्या सारख्या एका सामान्य कार्यकर्तीला मिळालेल आहे. नानांनी कधीही पक्षपातीपणा केलेला नाही. आम्ही जेव्हा या सभागृहामध्ये नवीन निवडून आल्यानंतर काही गोष्टीवर आम्ही आक्रमकपणे सभागृहामध्ये विचार मांडत असताना नाना वडीलकीच्या नात्याने आम्हांला समजावून सांगायचे. विरोधाला विरोध करु नये, काही गोष्टी तुमच्या लक्षात येत नाहीत त्यामुळे नानाने सांगीतलेल आम्हांला उशिरा आकलन झाल की त्यांनी सांगीतलेल सगळ खरं होत परंतु त्यांच्या माध्यमातून बरच काही या सागृहातील नगरसेवकांना शिकायला मिळालेल आहे. नानांचे चिरंजीव सुध्दा नगरसेवक म्हणून या सभागृहात निवडून आलेले आहेत त्यांच्या कुटूंबीयाच्या दुःखात आम्ही सर्व सहभागी आहोत. मी माझ्या उबाळे कुटूंबाच्या वतीने, खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, श्रीरंग आप्पा बारणे यांच्या वतीने आदरणीय नानासाहेबांना याठिकाणी आदरांजली अर्पण करते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उपस्थित सर्व सभागृह आमचे नेते, या शहराचे माजी महापौर आदरणीय नानासाहेब शितोळे यांचे काल दुःखद निधन झाले. ही वार्ता एसएमएसव्दारे समजली, कोणालाही खरे वाटले नाही. नानासारखा चांगला नेता जो निर्णयक्षमता ठेवणारा असा नेता गेल्यानंतर मनाला चटका लागला की आपला एक जवळचा नेता गेला. १९९७ साली ज्यावेळेला मी पहील्या वेळेस महापालिकेचे इलेक्शन लढवणेसाठी पार्टीकडे, काँग्रेस पक्षाकडे उमेदवारी मिळावी म्हणून प्रयत्न केले त्या प्रयत्नामध्ये नानासाहेब हे आमचे मेन होते त्यांच्या पाठीमागे लागलो ९७ साली त्यांनी मला उमेदवारी दिली. मला पार्टीचा विरोध असताना सुध्दा त्यांनी उमेदवारी दिली, पाठबळ दिलं त्या पाठबळावर मी आज नगरसेवक म्हणून काम करतो. नगरसेवक म्हणून काम करत असताना, १९९८ साली मला विधी समिती सभापतीपद सुध्दा त्यांच्यामुळेच मिळाल. नानाच्या नेतृत्वाखाली स्थायी समितीच सदस्यत्वपद सुध्दा एक वर्ष का होईना मला मिळाल आहे. त्यांनी मला स्वतःहून सांगीतल नाना जे सांगायचे ते करुन दाखवायचे. आज त्यांच्या जाण्यामुळे माझ्या सारख्या नगरसेवकांना जे पाठबळ होत ते पाठबळ नाहीस झाल. असो, जन्म-मृत्यु हा प्रत्येकाला असतो मी माझ्या प्रभागाच्या वतीने, माझ्या कुटूंबाच्या वतीने नानांना चिरशांती लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो, धन्यवाद.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, शहराचे माजी महापौर व आपल्या सर्वांचे नेते आदरणीय नानासाहेब शितोळे यांचे काल अल्पशः आजाराने निधन झालेले आहे. नानासाहेबांच्या बाबतीत सांगायचे झालेतर मी असेल, विजय लांडे असेल, आप्पा बारणे असतील आम्ही तरुण मंडळी पहील्यांदाच सभागृहात निवडून आलो सभागृहात कसे बोलायचे, आयुक्तांशी कसे बोलायचे, महापौरांचा प्रोटोकॉल कसा पाळायचा या छोटया छोटया गोष्टी ते

सांगत होते. सभागृहामध्ये जेव्हा आम्ही प्रवेश करायचो तेव्हा बरेचसे नगरसेवक डायरेक्टर यायचे, आपल्या सीटवर बसायचे, बाहेर जाताना पण असंच करायचे त्यावेळेला नाना आम्हांला सांगायचे ज्यावेळेस आपण आत येतो किंवा सभागृहाच्या बाहेर जातो, पिठासीन अधिकारी म्हणून ज्यावेळेस मा.महापौर बसलेले असतात तेव्हा त्यांना लवून नमस्कार करायचा असतो. अशा छोटयाछोटया गोष्टी असतात, प्रोटोकॉल असतो तो नानांनी आम्हांला त्या काळात शिकवला. आपल्या भागातील काम कसे करुन घ्यायचे त्यासंदर्भात आयुक्तांना किंवा संबंधीत अधिका-याना कशा पध्दतीने पत्र दयायचे हे नाना आम्हांला त्या काळात सांगत. वॉर्डातील विकासाच्या कामाच्या संदर्भात एखादया सदस्यांच काम होत नसेलतर नाना स्वत: त्या सदस्याला महापौरांकडे, आयुक्तांकडे घेवून जात त्यांना अडचण सांगत. अशा पध्दतीचा हा नेता सर्वांना बरोबर घेवून जाणारा, कोणाच्याही बाबतीत दुजाभाव करणार नाही अशा पध्दतीचे काम नानांनी त्या काळात केलेले आहे. नानांचा सांगवीतील बंगला हा कॉंग्रेस पक्षाचे हाऊस असं म्हणलतरी वावग ठरणार नाही. पक्षाच्या अनेक मिटींग त्याठिकाणी होत असत. महापालिकेचे महापौर, अध्यक्ष, पक्षनेते हे त्याच ठिकाणी ठरत असे. त्यावेळी आमच्यातले काही सदस्य गरीब होते, एक आठवण म्हणून मी सांगतो, एक सदस्य होते ते दत्तनगर झोपडपट्टी भागातून निवडून आलेले होते त्यांच्याकडे गाडीघोडा काही नसायचे, ते नानाला फोन करायचे नाना मी येतो, रिक्षान येतो परंतु रिक्षासाठी माझ्याकडे पैसे नाहीत. ब-याचवेळेस नानांनी रिक्षाचे पैसे दिलेले आहेत. असा उमदा नेता आम्हांला सोडून गेलेला आहे. एक आठवण म्हणून सांगतो नाना सभागृहामध्ये असायचे अनेकवेळा सभागृहामध्ये बयाच विषयावर वादंग होत असे, वादविवाद होत असे अशावेळेस एकदा नाना बोलले की सभागृहात कोणीही बोलत नसे. नाना महापौर होते, त्यांच्या मनाचा मोठेपणा असा की, त्यावेळेस उपमहापौर म्हणून महंमदभाई पानसरे होते अनेकवेळा सभा तहकूब होणार असेलतर त्यावेळेला ते महंमदभाई पानसरे यांना देखील पिठासीन अधिकारी म्हणून बसवत असत. ब-याचवेळा नाना महापौरांच्या केबीनमध्ये उपस्थित असायचे परंतु महंमदभाई पानसरे यांना पिठासीन अधिकारी म्हणून बसवणेसाठी ते महापौर केबीनमध्ये बसायचे अशा उमदया मनाचा नेता आपल्यातून निघुन गेलेला आहे. त्यांच्या निधनामुळे संपुर्ण शहरावर दुखाचा डोंगर कोसळलेला आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी परमेश्वर चरणी प्रार्थना करतो आणि मी माझ्या कुटूंबीयाच्या वतीन आणि मा.आण्णा बनसोडे यांच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.सीमा सावळे** - मा.महापौर साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते नानासाहेब शितोळे यांच्या दु:खद निधनाची बातमी काल प्रथमत: आली, ती अत्यंत चटका लावून जाणारी कालची ही घटना. मी जरी शिवसेनेची नगरसेवीका असलेतरी प्रत्येकदा पेपरमध्ये बातमी आली की पहीला सकाळी सकाळी नानांचा फोन यायचा. पोरी, अत्यंत चांगल काम करतेस, भेटायला ये. पहील्यांदा त्यांचा आवाज ऐकला तेव्हा वाटल नाही की, एका मोठया पक्षाचा नेता माझे कौतूक करतो, अभीनंदन करतो. आज तो आवाज यापुढे ऐकण्यासाठी मिळणार नाही, कोणी कौतूक करणार असणार नाही, मनाचं मोठेपण दाखविणारा कोणी असा व्यक्ति मिळणार नाही. काल त्यांच्या निवासस्थानी गेल्यानंतर जो जनसागर पाहीला त्यावरुन त्यांची लोकप्रियता लक्षात आली. मागच्या महीन्यातील घटना आहे त्यांच्या दारातून जात असताना गाडीतून उतरवल.

घरात घेवून गेले, अतूलला सांगीतले ज्या ज्या वेळेस तुला वाटेल की आपण खरंच वेगळ काही तरी काम करायच त्या त्या वेळेस या पोरीची मदत घे. मी म्हणाले नाना असं काय सांगता, तो सत्ताधारी पक्षाचा नगरसेवक आहे तो काहीही करु शकेल. त्यावेळेस ते म्हणाले, चांगल काम करत असताना नेहमी चांगल्या लोकांची साथ असली पाहीजे आज अतूल सभागृहात नाही तो लहान भावासारखा आहे त्याच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. याठिकाणी मी जिजाई प्रतिष्ठानच्या सर्व महिला भगीनींच्या वतीने, माझ्या कुटूंबाच्या वतीने, शिवसेनेच्या वतीने त्यांना आदरांजली वाहते, जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, या पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाचे शिल्पकार नानासाहेब शितोळे यांचे काल निधन झालेले आहे. माझा जास्त राजकीय संबंध आला नसलातरी त्यांची दोन तीन वेळा भेट झाली त्यावेळेला त्यांनी औदयोगीक क्षेत्रा विषयी प्रश्नांची माहिती घेतली ते खरोखरच माझ्या दृष्टीने दुरदृष्टी नेते आहेत. त्यांची छबी माझ्या मनात बसली. त्याच वर्षी महेशदादा स्पोर्टस फौंडेशन तर्फे कबड्डी स्पर्धा होत्या त्यावेळेला त्यांचेबरोबर बोलण्याचा योग आला त्यावेळेला त्यांनी औदयोगीक क्षेत्राशी अनेक प्रश्न मांडले. औदयोगीक परस्थिती कशी आहे, मंदी कितपत आहे, ती केव्हा संपेल असे अनेक प्रश्न उपस्थित करुन मला या विषयावर बोलण्यास भाग पाडले सांगण्याच तात्पर्य एवढंच आहे की त्यावरुन त्यांची जी दुरदृष्टी आहे त्याची चुनूक मला जाणवली. शितोळे परिवाराच्या दु:खामध्ये मी माझे म्हेत्रे कुटूंब तसेच पिंपरी चिंचवड शहरातील सर्व औदयोगीक क्षेत्रातील सर्व उदयोजक, लघुउदयोजक, तसेच सर्व अपक्ष नगरसेवक गटा तर्फे सहभागी आहोत. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देओ अशी प्रार्थना करतो.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सर्व नगरसवेक, नगरसेवीका, पत्रकार मित्र, अधिकारी वर्ग. कै.नानासाहेब शितोळे यांच्या दु:खद निधनानिमित्त महापालिका सभेच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. नानासाहेब सांगवीला राहतात आणि मी पिंपळेगुरवला राहतो या शहरामध्ये महापालिकेची पहीली निवडणूक ८६ साली झाली. नानासाहेब या शहराचे नेते झाले त्यावेळेस पासून मी नानासाहेबां बरोबर सांगवी पिंपळेगुरव परीसरामध्ये काम केलेले आहे. नानांच्या बंगल्यावरती सांगवीला असेल, पिंपळेगुरवला असेल किंवा या महापालिकेमध्ये असेल नानासाहेबांच ८६ सालापासून असणार काम, व्यक्तिमत्व जवळून पाहीलेल आहे. या ज्येष्ठ नेत्याच्या मार्गदर्शनाखाली काम केले त्या ज्येष्ठ नेत्याला श्रध्दांजली वाहण्याची वेळ माझ्या सारख्या कार्यकर्त्यावरती आलेली आहे. ३० वर्षे पाठीमागे जावून पाहीलतर नानांनी केलेल काम, त्यांचे कार्य आणि त्यांच्या कार्याची पध्दत ही ख-या अर्थान पिंपळेसौदागरचा एखादा नगरसेवक असेल, राहटणीचा असेल, काळेवाडीचा असेल, चिंचवड परीसरातील, ग्रामीण भागातील नगरसेवकांनी नानासाहेबांचे जवळून कार्य पाहीलेले आहे, मार्गदर्शन घेतलेले आहे. याठिकाणी वर्षापुर्वीची आठवण सांगायची झालीतर अतूल निवडून आल्यानंतर अतूलने संपर्क कार्यालय सांगवीला काढले होते त्याठिकाणी आम्हांला निमंत्रीत केल होत. त्या संपर्क कार्यालयाच उदघाटन झाल्यानंतर नाना मला सहज म्हणाले आरे, रामदास तु बीनविरोध निवडून आला आहेस, बरेच दिवस झाले एकत्र काम करतो पण

बरेच दिवस झाल मी तुझ भाषण ऐकल नाही, मला भाषण कधी ऐकायला मिळणार. मी हासत म्हणालो नाना एखादा कार्यक्रम ठेवा मी भाषण करील आपण ऐकताल. म्हणजे आज ज्यांचेकड मोठ नेतृत्व असताना देखील एका सर्वसामान्य माणसाला आनंदाचे शब्द देवून एक क्षण आठवणीच्या संधी निर्माण करुन देतो अशा नेत्यांना श्रध्दांजली वाहण्याची वेळ माझ्यावर आलेली आहे. याठिकाणी सभागृहाचा अधिक वेळ न घेता अधिक बोलण देखील उचीत ठरणार नाही परंतु ख-या अर्थान सांगवी, पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर, राहटणी, काळेवाडी या ग्रामीण भागासाठी विकास करण्याचे काम त्यांनी केलेले आहे ते कै.नाना आज तुमच्या आमच्यातून निघुन गेले आहेत. आज त्यांना चिंचवड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परीवार, पिंपळेगुरव प्रभाग क्रमांक ५६,५७,५८ या प्रभागातील सर्व नागरीक बंधु भगीनीच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो, परमेश्वर नानासाहेबांच्या आत्म्याला शांती देओ, शांती देओ, शांती देओ.

**मा.विलास नांदगुडे-** मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, पत्रकार नानासाहेबांना श्रध्दांजली वाहण्यासाठी याठिकाणी उभा आहे. खासदाराकीच्या निवडणूकीमध्ये त्यांच्याशी बोलण्याचा प्रसंग आला. दोन तीन महीन्यापुर्वी त्यांची ती लगबग, त्यांची काम करण्याची पध्दत आणि ७५ वय झाल असतांना सुध्दा त्यांची ती तळमळ पाहील्यानंतर नानासाहेब लवकर जातील अशी मनात सुध्दा कधी शंका आली नाही. ७५ वयापर्यंत सुध्दा ते अतीशय चांगल्या पध्दतीने काम करत होते, राहणीमान सुध्दा अतीशय चांगल होत. पिंपरी चिंचवड महापालिकेला त्यांनी दिशा देण्याच काम केलच परंतु त्यांनी त्या बरोबर पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनमध्ये सुध्दा फार मोठ काम केलेल आहे. गरीब खेळाडूसाठी ज्यावेळेस पैसे जमवायचे होते, पुणे जिल्हा असोसिएशन कडे हा निधी जमवायचा होता त्यावेळेला तो निधी जमविण्यासाठी नानासाहेबांनी अतीशय परीश्रम घेवून जवळ जवळ १ कोटीचा निधी नानासाहेबांच्या नेतृत्वाखाली पुणे जिल्हा असोसिएशनने जमवीला त्या निधीच्या व्याजातून गरीब खेळाडूना मदत केली जाते एवढ मोठ काम त्यांनी पिंपरी चिंचवड्च नाहीतर कबड्डी असोसिएशन असेल अशा विवीध संघटनेमध्ये त्यांच काम तुमच्या आमच्या लक्षात राहणार आहे. असं एक संयमी नेतृत्व आपल्यातून निघून गेलेल आहे नांदगुडे कुटूंबाच्या वतीने भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, कै. नानासाहेब शितोळे शहरातील अत्यंत मुरब्बी, सयंमी आणि कार्यकर्ता म्हणून प्रत्येक कार्यकर्त्या समोर एक राजकीय व्यक्तीमत्व म्हणून आरसा आणि आदर्श असतो त्यापैकी नानासाहेब शितोळे यांचा आदर्श आमच्यासारखे सामान्य कार्यकर्ते याठिकाणी घेत असतात. ग्रामीण भागामध्ये आमच्या कुटूंबीयांचे, आमच्या गावचे तुकाराम यशवंत आल्हाट यांच्या बरोबर काम करत असताना आण्णासाहेब मगर या शहराचे नेते यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना लहानपणी त्यांना बघण्याचा योग आला. खरंतर जुन्या काळातील, जुन्या पिढीतील राजकीय माणस म्हणजे समाजासाठी ख-या अर्थाने जान्त व्यक्तिमत्व असतात. राजकारणामध्ये आपण कस काम करायच, खरंतर ही माणस म्हणजे राजकारणाचा मोठा ग्रंथ आहे. या ग्रंथाच एक-एक पान जर आपण उलगडलतर त्यांनी

राजकारण समाजासाठी केल, स्वत:साठी नाही हे आपल्या लक्षात येत. त्यांचा प्रत्येक क्षण हा समाजातील गोरगरीब माणसासाठी व्यतीत होत असतो. सामान्य माणसाना बरोबर घेवून त्यांच्या बरोबर दोन शब्द प्रेमान बोलायच. काम करत असताना आपले पाय जमिनीला लागले पाहीजे आणि या समाजातील सर्व सुख, दु:ख सामावून घेण्याच काम अशा व्यक्ती करत असतात आणि त्यांची दुरदृष्टी एवढी मोठी असते, राग आणि अहंकार त्यांच्यामध्ये अजीबात नसतो. काम करत असताना राग आणि संयम हा माणसाने जर ठेवलातर त्याच्या कामाच चिज होत नाही, कोळसा होतो अस म्हणतात. ही माणस थोर असतात कितीही, कुठलाही प्रसंग, संघर्ष निर्माण झालातर त्याला कसं सामोरं जायचं ते अशा माणसाकडून आपल्या लक्षात येतं. आजच राजकारण हे फार बदललेल आहे आणि या बदललेल्या राजकारणामध्ये आपण जरी दिवसाला अशा माणसाच स्मरण केलतरी आपल्याला निश्चित अशा लोकांच्या कारकिर्दीवरुन एक ऊर्जा मिळत असते, एक अनुभव मिळत असतो याठिकाणी माझ्या वतीने, माझ्या शिवसेना पक्षाच्या वतीने, ग्रामीण भागातील तमाम कार्यकर्त्याच्या वतीने नानांना आदरांजली व्यक्त करतो.

**मा.शारदा बाबर -** मा.महापौर साहेब, कालच माजी महापौर नानासाहेब शितोळे यांचे दु:खद निधन झाले. त्यांचा सहवास लाभला नाही परंतु माझे सर्व कुटूंबीयाना त्यांचा सहवास जवळून लाभलेला आहे. काही कारणास्तव बाहेर असल्यामुळे मी त्यांच काल अन्त्यदर्शन घेवू शकले नाही. त्यांचा सहवास लाभला नसलातरी त्यांच्याविषयी मी भरपुर ऐकलेल आहे. खेळाडू कसा असावा किंवा एक मित्र कसा असावा त्याचे उदाहारण दयायचे झालेतर आरुण सरनाईक यांचे ते जीवलग मित्र होते. आयुष्यभर त्यांची आठवण रहावी म्हणून त्यांनी त्यांच्या घरासमोरच्या रस्त्याला आरुण सरनाईक यांच नाव दिलं एका मित्राची ओळख आयुष्यभर ठेवली यातच नानासाहेबांच मोठेपणा दिसून येतो. त्यांच्या कुटूंबीयांना या दु:खातून बाहेर निघण्यासाठी परमेश्वर त्यांना शक्ती देओ. मी माझ्या प्रभागाच्या वतीने, मा.माजी खासदार गजानन बाबर यांच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करते. जयहिन्द, जय महाराष्ट्र.

**मा.विनोद नढे -** मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सभागृह, पत्रकार काल या शहराचे माजी महापौर कै. आदरनीय नानासाहेब शितोळे यांच निधन झाले. वास्तवीक पाहता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची स्थापना १९८२ साली झाली होती व या शहराची निवडणूक १९८६ साली झाली. १९८६ सालापासून आजपर्यंत नानांच पिंपरी चिंचवड शहराच्या राजकारणामध्ये अस्तित्व होत. १९८७ साली त्यांनी प्रथमत: पिंपरी चिंचवड शहराचे महापौरपद भूषविले त्यानंतर चारवेळेला सत्तारुढ पक्षनेता असेल किंवा पीसीएमटीचे पाचवर्षे सदस्य पद असेल त्यावर ते होते. पिंपरी चिंचवड शहर कॉंग्रेस अध्यक्षपद असेल आदरणीय देशाचे नेते शरद पवार साहेब असतील किंवा आदरणीय रामकृष्ण मोरे असतील त्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी काम करत असताना या पिंपरी चिंचवड शहराचा विकास करण्यासाठी अतीशय धाडसी आणि चांगले निर्णय घेतलेले आहेत. निश्चितपणे पिंपरी चिंचवड शहराच्या विकासामध्ये त्यांचा खुप मोठा वाटा आहे. आमच्यासारखी तरुण पिढी त्यांच्या सारख्या आदरयुक्त अशा नेतृत्वाकडे पाहूनच या पिंपरी चिंचवड शहरामध्ये तयार झालेली आहे. त्यांचा आदर्श आणि त्यांचा

राजकारणाचा वसा घेवून भविष्यात वाटचाल करण्याचे ध्येय ठेवून मी पिंपरी चिंचवड शहर काँग्रेस पक्षाच्या वतीने, माझ्या नढे कुटूंबाच्या वतीने, काळेवाडी गावच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटूंबाला जे दु:ख झालेले आहे त्यांमध्ये आम्ही सर्व सहभागी आहोत, धन्यवाद.

**मा.शांताराम भालेकर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.सभागृह. कालच आदरणीय कै.नानासाहेब शितोळे यांच निधन झालेल आहे. या व्यक्तीमत्वाच्या बाबतीत बोलायच झालतर ख-या अर्थान माझ्यासारखा कार्यकर्ता तरुणपणी काम करत असताना या शहराच त्यांनी महापौरपद भूषविल आहे, पक्षनेतेपद भूषविल आहे. त्यांच व्यक्तीमत्व असं होत की ख-या अर्थान राजकारणात काम करत असताना नेता म्हणून काम करत असताना ज्या गोष्टी आवश्यक असतात त्यामध्ये नेतृत्व असेल, कर्तृत्व असेल असं चांगल काम नानासाहेबांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये केल आहे. ख-या अर्थान कबड्डी या खेळाची आवड असल्यामुळे कबड्डीसाठी त्यांच मोठ योगदान आहे. अशा या अष्टपैलू व्यक्तीमत्वाला मी माझ्या भालेकर कुटूंबाच्या वतीने आणि संपुर्ण सभागृहाच्या वतीने त्यांना भावपुर्ण आदरांजली अर्पणकरतो.

**मा.भाऊसाहेब भोईर** - मा.महापौर साहेब, आजच्या या सभेमध्ये आपल्या परिसरातले लोकनेते आणि विशेषत: राजकीय जीवनामध्ये पर्दापण करणा-या अनेक नेत्यांचे गुरु, राजकीय नेत्यांचा पाया राजकीयदृष्टया भक्कम केला ते कै.नानासाहेब शितोळे यांना आपण भावपुर्ण श्रध्दांजली या सभागृहामध्ये अर्पण करतो. खरतर नानांच नाव घेवून आपण या सभागृहामध्ये भाष्य करत आहोत तर निश्चित माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पुन्हा यातून या गोष्टीचा उजाळा मिळत आहे. अनेक गोष्टी आहेत कारण मी स्वत:ला भाग्यवान एकाच गोष्टीसाठी समजतो की त्या कालखंडामध्ये कॉलेजची शेवटच्या वर्षाची परीक्षा दिल्यानंतर नगरसेवक होण्याच सदभाग्य ज्यावेळेस मला मिळाल त्यावेळेला सर्वात लहान नगरसेवक म्हणून मी याठिकाणी उपस्थित होतो. त्याच कालखंडामध्ये नानांचा जो राजकीय दबदबा होता किंबहूना त्यांनी नेत्यांची जी विश्वासार्हता जमवली होती त्याच्या जोरावर या शहरामध्ये जे जे नव्याने राजकारणामध्ये पदार्पण करुन नेतृत्व करु इच्छित आहेत अशा सर्वांचे नेतृत्वगुण ओळखणारा, प्रा.रामकृष्ण मोरे नंतरचा, जर कोण नेता असेलतर ते म्हणजे नानासाहेब शितोळे, याचा मी स्वत: व्यक्तीश: सत्तेतील साक्षीदार म्हणून या सर्व गोष्टीचा मी साक्षीदार आहे. त्याच परस्थितीमध्ये मी असेल, १९९२ मध्ये योगेशभाई असतील, कदम वैनी, प्रकाश रेवाळे, लक्ष्मण जगताप असतील किंबहूना विलास लांडे असतील त्यावेळेस आम्ही सर्व १९९२ मध्ये निवडून आलेलो आहोत. आम्ही सर्व एका बँचचे राजकारणामध्ये पदार्पण केलेल होत. परंतु माझा राजकीय घराण्यामध्ये जन्म झाला असल्या कारणान मी १९८८ सालीच एनएसयुचा अध्यक्ष झालो आणि त्यानंतरच्या कालखंडामध्ये काही मेळावे असतील ते संघटनेच्या माध्यमातून विशेष: रामकृष्ण मोरे हे आमच्यासारख्या कार्यकर्त्याला घेवून फिरायचे आणि त्याच कालखंडामध्ये आम्हांला नानांचा राजकीय कालखंड अतीशय चांगल्या पध्दतीचा होता या प्रत्येक गोष्टीचा साक्षीदार मी आहे. मी अनेक लोक पाहीली परंतु नानांनी स्वत:चा तोल कधीही ढासळू दिला नाही. याच कारण ते कला क्षेत्राशी निगडीत होते विशेषत: खेळाडू म्हणून खिलाडू वृत्ती

त्यांच्यामध्ये जन्मताच होती आणि कलात्मक दृष्टीकोनातून त्यांची जी वाटचाल होती त्यामध्ये अतीशय बीनधास्त व्यक्तीमत्व म्हणून त्यांना ओळखल जायचं. मी २५-३० वर्षाच्या कालखंडामध्ये अनेक राजकारणी आणि अनेक व्यक्ती पाहील्या दुपारी काय बोलतात ते वेगळं, संध्याकाळच्या बोलण्यावर विश्वास ठेवायचा का नाही ते वेगळं परंतु नाना हे एक अस व्यक्तीमत्व होत की मी जसा आहे तसाच आहे. मुख वेगळ आणि मुखवटा वेगळा अशी त्यांनी त्यांच्या आयुष्यामध्ये कधीच राजकीय भूमीका स्वीकारली नाही. मी असा आहे, त्यांच्या बाबतीत अनेक खालच्या पातळीवर आरोप झाले, आरोप झाल्यानंतर त्यांना कोणत्याही पत्रकारान विचारल आणि खाजगी मध्ये कोणी विचारलतर नाना फक्त हासायचे आणि असे म्हणायचे की तुम्हांला जे वाटतय आणि तुम्हांला त्या वाटण्यांन जो तुम्हांला आनंद घ्यायचा आहे तो तुम्ही पुरेपूर घ्यावा तुमच्या आनंदामध्ये मी विष कालवत नाही इतक ते बीनधास्त बोलत. मला असं वाटत की मी माझ्या ३५ वर्षाच्या राजकारणामध्ये नानासारख व्यक्तीमत्व पाहीलेल नाही. ज्यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेसची विभागणी झाली त्या परस्थितीमध्ये नानावर राजकीय आघात ज्या पध्दतीने झाले त्यावेळेला त्यांच्याजवळ फक्त प्रा.रामकृष्ण मोरे गेले आणि त्यांना २००१ मध्ये काँग्रेसमध्ये प्रवेश दिला, आणि म्हणाले नाना तुम्ही काळजी करु नका तुम्ही या शहरामध्ये अनेक नेते घडवीले, अनेक तरुण कार्यकर्त्याला संधी दिली तुमची मी अशी अवहेलना होवू देणार नाही असे प्रा.रामकृष्ण् मोरे म्हणाले आणि त्यावेळेस आम्ही सांगवीमध्ये मेळावा घेतला आणि त्यांना काँग्रेस पक्षामध्ये सहभागी करुन घेतल, नारायण बहीरवाडे त्याला साक्षीदार आहेत. या सर्व परस्थितीमध्ये २००२ साली पॅनल सिस्टीम झाली त्यामध्ये त्यांना पराभव पत्कारावा लागला. प्रा.रामकृष्ण मोरे त्यावेळेला असा नेता होता की जे पराभूत होतात त्याच्या घरी पहीला पोहचणारा जो कोणता नेता असेलतर ते प्रा.रामकृष्णजी मोरे होते. ते नानाच्या घरी गेले त्याचा मी स्वत: साक्षीदार होतो, हनुमंतराव गावडे होते आणि म्हणाले नाना तुम्ही काळजी करु नका आणि नानाला परत काँग्रेस पक्षामध्ये घेतल आणि त्यांची सांगवीमधुन मिरवणूक काढली. आमच्या चेह-यामध्ये बदल असायचा पण नानासाहेबांच्या चेह-यामध्ये कधी बदल पाहीला नाही, चालतयं, पराभूत झालो चालेल, इतक्या सहजतेन ते सर्व गोष्टी घ्यायच्या. मला वाटत ते आमच्या पिढीला इतक्या जवळून पाहता आल्यामुळे आम्हांला सुध्दा एखादया गोष्टीच संकट आल्यानंतर आम्ही अशा नेत्यांचे एक एक गुण वेचून ते मोत्याप्रमाणे जपून ठेवलेले आहेत आणि म्हणून नानाच्या रुपाने एक नेता जरी हरवला असलातरी त्यांच्या अनेक आठवणी आहेत. मी तर असे म्हणेल विलास लांडे असतील, प्रकाश रेवाळे असतील, लक्ष्मण जगताप असतील, योगेश बहल असतील अशा अनेक मंडळीना फक्त नाना होते म्हणून त्यांना या शहरामध्ये संधी मिळाली आहे. आणि आम्ही त्या कालखंडामध्ये गटबाजीमध्ये आडकलो असल्या कारणांन आमचे नेते प्रा.रामकृष्ण मोरे होते आम्ही पदाच्या बाबतीत त्यांच्या पासून वंचीत राहीलो परंतु पोटाची भूक त्यांनी भागवीली, राजकीय भूक नाही भागवीली. अनेकवेळा त्यांच्या घरामध्ये आमच्या पोटाची भूक त्यांनी भागवीली, त्यांनी कधीही दुजाभाव केला नाही, सगळी समीकरण सांगवीतून घडलेली असताना आम्ही नानांच्या विरोधात असायचो. त्या परस्थितीमध्ये सुध्दा त्यांच्या घरी नाना कधी जेवण केल्याशिवाय सोडत नव्हते. म्हणून आमची राजकीय भूक जरी त्यांनी भागवीली नसलीतरी पोटाची भूक त्यांनी भागवीलेली आहे. नानांने आयुष्यामध्ये त्यांनी मरेपर्यंत कोणालाही त्रास

दिला नाही, नानांनी कधी षडयंत्र केले नाही. नाना दिलदार होते आम्ही त्यांना शेवटपर्यंत म्हणायचो नाना तुमच वय किती, तुम्ही माझ्या वडीला बरोबर काम केलं, आता माझ्या बरोबर काम करता, आता भविष्यामध्ये तुमचे काय प्लॅन आहेत असं विचारत, अशा इतक्या सहजतेने वागणारा माणूस आम्हांला वैचारीक राजकारणामध्ये कस वागाव त्याच ऑक्सीजन देणारा नेता आमच्यातून गेलेला आहे. खरतर या सर्व नेत्यांची आपण गोपीनाथ मुंडे यांना श्रध्दांजली वाहीली आहे परंतु अशा ज्या काही आठवणी देणारे नेते आहेत त्यांचा एक संग्रह महापालिकेमध्ये असावा. माणस येतात, माणस जातात, माणसाचा चेहरा लक्षात राहत नाही परंतु त्याच व्यक्तीमत्व, त्याचे विचार आणि दिलेली शिकवण कायमची लक्षात राहण्यासाठी काहीतरी योजना आपण आखण गरजेच आहे. आपण बोलतो, निघून जातो, अनेक लोक येतात, अनेक लोक जातात परंतु अशी जी काही माणस असतात त्यांच्या विचाराचा संगह असण आवश्यक आहे. १९८६ साली महापालिकेची लोकसंख्या दिड ते पावणेदोन लाख होती, १८ लाख या शहराच्या लोकसंख्येच स्वप्न पाहणारी ही नेते मंडळी, त्या काळामध्ये २५ वर्षानंतर या शहराला काय लागणार आहे याचा विचार करणारी ही नेते मंडळी आहे. प्रत्येकाला वाटत माझ्या कालखंडामध्ये काहीतरी व्हाव परंतु ही नशीबवान मंडळी होती. ओसाड असलेल हे गाव याच शहरात रुपांतर अवघ्या दहा ते पंधरा वर्षात करुन दाखवीणारी ही मंडळी आहे. रामकृष्ण मोरेंना माझ्या समोर डायरेक्ट वेळ प्रसंगी कार्यकर्त्या साठी बोलणारा, रागवणारा मी नानासाहेब शितोळेना पाहील. प्रभाकर साठेंची निवडणूक होती त्यावेळेस वरुन आदेश आला कोणालाही मदत करायची नाही ताबडतोब माघार घ्या त्यावेळेस प्रा.रामकृष्ण मोरे यांनी निर्णय बदलला आणि तो केवळ नानासाहेब शितोळेमुळे बदलला. आणि नानासाहेब शितोळेंनी वेळप्रसंगी तत्वासाठी, विचारासाठी, नेत्यांसाठी त्यांची जी निष्ठा आहे ती निष्ठा व्यक्त करण्यासाठी रामकृष्ण मोरे यांना सुध्दा जाब विचारणारा या शहरात नानासाहेब शितोळे होते. अशा पध्दतीने नानासाहेबानी अनेक क्रांतीकारी निर्णय घेतलेले आहेत. मी पिंपरी चिंचवड शहर कॉंग्रेस जिल्हा कमिटीच्या वतीने, सर्व पक्षाच्या वतीने त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह, पत्रकार मित्र. नानांसाहेबांविषयी बोलावे तेवढे कमीच आहे. नाना म्हणजे असामान्य व्यक्तीमत्व, एक कुशल, अनुभवी, पितृतूल्य यास शहर मुकलं आहे असं म्हणलतरी वावग ठरणार नाही. नानांसाहेबांच्या अनेक आठवणी याठिकाणी सांगीतल्या. नानासाहेबांनी महापालिकेमध्ये १९८६ पासून राजकारणाला सुरवात केली. आम्ही सर्व १९९२ पासून आजपर्यंत नानासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली अनेक महत्वपुर्ण निर्णय घेत असताना मग तो वायसीएमसारखा निर्णय असेल, आता भाऊसाहेबांनी जो उल्लेख केला आदिच्या काळामध्ये रामकृष्ण मोरे असतील नंतर दादा असतील. अलीकडच्या काळात राजकारणामध्ये जे बदल आपल्याला दिसतात जे हात वर करुन मतदान करावे हे सोपे झालेले आहे. परंतु पुर्वी गुपीत मतदान पध्दत असायची, एक दमदाटीच राजकारण असायच, एक वेगळ राजकारण असायच मग तो कोणत्याही पक्षाचा व्यक्ती असो त्याची मनजमाई करायची झालीतर मनजमाई करण्यामध्ये मग नाना उभे राहायचे मग त्यामध्ये कुठलाही माणूस असो, शिवसेनेचा माणूस असो किंवा भाजपचा माणूस असो पाच मिनीटाचा अवधी महापौरांना मागीतला जायचा मग अर्धातासामध्ये मनमिलन व्हायचं आणि

बीनविरोध निवडणूक व्हायची किंवा त्यातून काहीतरी मार्ग निघायचा अशा पध्दतीचे वेगळे त्यांचे व्यक्तीमत्व होते. नानानी राजकारण, समाजकारणात अनेकांना संधी दिली, अनेकांना मदत केली व ते स्वत: उत्तम कबड्डीपट्टू होते. त्यांनी पिंपरी चिंचवड शहरात कबड्डीची पहिली महापौर चषक भरविण्याची परंपरा सुरु केली. अनेक क्रिडा विषयक त्यांना प्रेम असायचं आणि अनेक महापौर चषक सुध्दा त्यांनी या शहरामध्ये सुरु केले. नानांच्या बद्दल सांगायचे झालेतर ज्या काही पुर्वी मिटींग असायच्या, जे निर्णय असायचे ते निर्णय सांगवी याठिकाणी त्यांच्या घरी व्हायचे. ते सांगवीचे शिल्पकार असं म्हणायचो, त्यांनी अनेकाना घडविण्याचे काम केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आमच्यासारखे अनेक कार्यकर्ते वेगवेगळया पदावर काम करताना दिसतात. खरं पाहीलतर नानासाहेबांसारखे जीवन हे क्वचीतच काही लोकांना मिळते खरे पाहता ते खूप भाग्यवान होते, ते एक राजबिंडा जीवन मध्ये जगणे किंवा एक सरदार म्हणून जीवन जगत असताना असे खुप कमी लोकांच्या नशीबी मिळते असे मला म्हणायच आहे. त्यांच्या घरामध्ये गेलतर पुर्वीपासून त्यांच ते मोठ घर, राहणीमान त्यांच वेगळ, चांगले कपडे, त्यांच चांगल चॉईस, चांगली गाडी, घरामध्ये टेलीफोनच कनेक्शन असेल अशी त्यांची निवडच वेगळी होती. ख-या अर्थाने ते चांगले जीवन जगले. मध्यंतरी लोकसभेच्या इलेक्शनमध्ये रोज कचेरीमध्ये येवून सकाळी संध्याकाळी दोन तास हजर असायचे. या दोन महीन्याच्या आजारामुळे त्यांचे आकस्मिक निधन झालेले आहे. वास्तवीक पाहता वयाच्या ७५ व्या वर्षी सुध्दा त्यांनी त्यांचे राहणीमान, त्यांचा स्वभाव तोच ठेवला, असं खुप कमी लोकांमध्ये असतं. आता त्यांच्या निधनामुळे जी पोकळी निर्माण झालेली आहे, जे दु:ख त्यांच्या कुटूंबावर आलेले आहे ते सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. अशी प्रार्थना करतो. भविष्यामध्ये नवीन जे नगरसेवक आहेत, नवीन जे कार्यकर्ते आहेत त्यांनी त्यांच्या पध्दतीने वाटचाल करावी त्यांच्या पध्दतीनेच कामकाज केलेतर ख-या अर्थाने त्यांना आदरांजली ठरणार आहे. मी माझ्या कुटूंबाच्या वतीने, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने, सभागृहाच्या वतीने भावपुर्ण आदरांजली अर्पण करतो.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सहकारी. कै.आदरनीय नानासाहेब शितोळे यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण सर्वजण बोलत आहोत. नाना विषयी आता सर्व सहका-यांनी आपआपले अनुभव सांगीतले आहेत त्यापेक्षा माझे अनुभव खुप वेगळे आहेत. माझ्या नशीबामध्ये योगायोगाने कदम या कुटूंबाबरोबर नानांचे घरचे रिलेशन होते आणि मला हाताने जेवण करुन घालण्याची खुपवेळा संधी लाभलेली आहे. शेवटच्या मागच्या महीन्यामध्ये त्यांची ऍन्जीओग्राफी झाल्याचे सांगीतले. काल सुध्दा मी पत्रकारानां सांगीतल की, सभागृहामध्ये कसं बोलाव, कसं वागाव हे त्यांच्याकडे बघीतल्यानंतर सगळया गोष्टीचा जो काही खुलासा आहे तो व्हायचा. आणि त्या पध्दतीने पुर्वी राजकारणाची जी काही दोन-चार मंडळी होती, या दोन चार मंडळीमध्ये नाना डोळयांनी बोलायचे. त्यामध्ये सभागृह असेल, राजकारण असेल, आणि आम्ही काम कसं कराव या सगळयाची ठेव आणि शिकवण त्यांच्याकडून घेतलेली आहे. म्हणूनच राजकारणामध्ये माणूस यशस्वी होतो, त्यामध्ये ब-याच जणांचे हात असतात, त्यामध्ये आम्ही यशस्वी होत असताना नानांचा फार मोठया प्रमाणामध्ये

हात आहे असे मला अवर्जून सभागृहाला सांगावेसे वाटते. आता भाऊसाहेबांनी सांगीतले, योगेश बहल यांनी सांगीतले. त्यांची खरंच राहण्याची पध्दत इतकी छान होती की आम्ही अतूलला सुध्दा मस्करीमध्ये म्हणायचो की अतूल तुझा नानाच्या इतका नंबर कधी लवकर लागणार नाही, अशा पध्दतीन तू तूझ्या वडीलांना राहण्याच्या बाबतीत ओव्हरटेक करु शकणार नाहीस, असं आम्ही अतूलला मस्करीमध्ये म्हणायचो. शेवट त्यांनी त्यांचा स्वाभीमान असेल, राहणीमान असेल, त्यांच्या मनामध्ये ज्या ज्या ईच्छा असतील त्यामध्ये ते सामर्थ्यवान बनले असे मला वाटते. मा.शरद पवार साहेबांशी नांनाचे इतके जवळचे संबंध होते की, नानांचा फोन म्हणल्यानंतर पवार साहेबांनी कधीही तो फोन टाळला नाही ते आमदारकीच्या निवडणूकीमध्ये आम्ही अनुभवलेले आहे आणि त्याच दृष्टीकोनातून पवार साहेबांचे नानाशी घरच्यासारखे संबंध होते. कोणतेही राजकीय काम असेलतर नाना दोन मिनीटात साहेबांकडे पोहचायचे. असे ज्येष्ठ नेते आज आपल्यामध्ये नाहीत. त्यांनी समाजासाठी काम केलेले आहे, पिंपरी चिंचवड शहरासाठी काम केलेले आहे, पक्षासाठी काम केलेल आहे. त्यातल आपण थोडस जरी काम त्यांच्याप्रमाणे केले तर मला वाटतं हीच खरी त्यांना श्रध्दांजली ठरेल. त्यांच्या सारखे आपल्याला होता येणार नाही परंतु त्यांच्या सारखे नक्कीच काम करण्याचा प्रयत्न आमच्या सारखे सर्व सहकारी करतील अशीच मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहते आणि साई चरणी प्रार्थना करते की त्यांच्या कुटूंबाना सावरण्यासाठी आणि आम्हां सर्वाना यातून सावरण्यासाठी शक्ती आणि ताकद देवो. मी सर्वांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली वाहते आणि मा.महापौरांना विनंती करते, ही सभा सोमवार दि.४/८/२०१४ रोजी दु.२.०० पर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडते.

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर** - आज कै.नानासाहेब शितोळे यांना सर्वानी श्रध्दांजली वाहीलेली आहे. असं उमद नेतृत्व आपल्यापासून हिरावून गेलेलं आहे आज आपल्या सर्वांचेच गुरु म्हणलेतरी हरकत नाही, त्यांच्यासारखे परत गुरु कोणी होणार नाही. अतीशय चांगल्या रितीने त्यांनी माजी महापौर, माजी पक्षनेता अशी पदे भूषविलेली आहेत आणि अतीशय चांगल्या रितीने त्यांनी आपल्या सर्वाना मार्गदर्शन केलेले आहे. अतीशय चांगल व्यक्तीमत्व असलेले नाना आज आपल्याला सोडून गेलेले आहेत. त्यांच्या कुटूंबाला जे दुःख झालेले आहे ते सहन करण्याची शक्ती परमेश्वर त्यांना व सर्वांनाच देओ अशी मी परमेश्वरचरणी प्रार्थना करुन त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहून ही सभा सोमवार दि. ४/८/२०१४ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

(दि.१९/७/२०१४ ची तहकूब सभा )

<u>दिनांक - ०४.०८.२०१४</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे दि. १९/७/२०१४ (जुलै २०१४) ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दि.०४.०८.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७. मा.भारती फरांदे
२८. मा.जावेद रमजान शेख
२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१. मा.नंदा विकास ताकवणे
३२. मा.नेटके सुमन राजेंद्र
३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३७. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३९. मा.†›. संदिप गुलाब चिंचवडे
४०. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४३. मा.जयश्री वसंत गावडे
४४. मा.पवार मनीषा काळूराम
४५. मा.प्रसाद शेट्टी
४६. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४७. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४८. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव
५१. मा.मडिगेरी वर्षा विलास
५२. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५३. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५४. मा.सुपे आशा रविंद्र
५५. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५६. मा.अजित दामोदर गव्हाणे
५७. मा.गोफणे अनुराधा देविदास
५८. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५९. मा.महेशदादा किसन लांडगे

६०. मा.श्रद्धा बाजीराव लांडे
६१. मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६२. मा.लोंढे शुभांगी संतोष
६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६५. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६६. मा.पालांडे सुजाता सुनिल
६७. मा.बहल योगेश मंगलसेन
६८. मा.कदम सदगुरु महादेव
६९. मा.कैलास महादेव कदम
७०. मा.वाघेरे सुनिता राजेश
७१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७२. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
७३. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७४. मा.काळे विमल रमेश
७५. मा.पाडाळे निता विलास
७६. मा.विनोद जयवंत नढे
७७. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७८. मा.विमलताई सुरेश जगताप
७९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८०. मा.बारणे निलेश हिरामण
८१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८२. मा.बारणे माया संतोष
८३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
८४. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८६. मा.कलाटे स्वाती मयुर
८७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८८. मा.चौंधे आरती सुरेश
८९. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९०. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९१. मा.जवळकर वैशाली राहुल
९२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
९३. मा.जगताप राजेंद्र गणपत
९४. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९५. मा.जगताप नवनाथ दत्तु
९६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९७. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९८. मा.जम सोनाली पोपट
९९. मा.प्रशांत शितोळे
१००. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१०१. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०२. मा.गायकवाड संध्या सुरदास
१०३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०४. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
१०६. मा.संजय केशवराव काटे
१०७. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०८. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.माने, मा.कुलकर्णी, मा.गायकवाड, मा.दुरगुडेमा.खांडकेकर,मा.माछरे-सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक,मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील,मा.तुपे - सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.काची, मा.तांबे,मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी,मा.बरशेट्टी, मा.गलबले,मा.केदारी- कार्य.अभियंता, मा.उबाळे-प्र.अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.कांबळे -प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी, मा.बोदडे - प्र.अधिकारी (जनसंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आंबेगाव तालुक्यातील माळीण गावातील दरड कोसळून मृत्यूमुखी पडलेले ग्रामस्थ व मनपा कर्मचारी लोहकरे यांची मुलगी, जावई, व्याही, विहीण व तीन नातवंडे यांना आणि चीनमध्ये झालेल्या भुकंपामध्ये मृत झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात यावी. तसेच पुष्पलता पाटील - बिहारचे राज्यपाल डॉ.डी.वाय.पाटील यांच्या पत्नी, प्रकाश सदाशिव गायकवाड-सामाजिक कार्यकर्ते, फुगेवाडी, ज्ञानेश्वर केशव जाधव-सामाजिक कार्यकर्ते, हरणाबाई बबन जाधव, प्रभाग क्र.५, बबन पंढरीनाथ मोरे पाटील, प्रभाग क्र.३, ओंकर नेताजी काशिद, प्रभाग क्र.३, चिमणराव आनंदा लोंढे -मनपा सदस्य मा.वसंत (नाना) लोंढे यांचे बंधू, देवराम रामचंद्र लोंढे, इंदूमती दत्तात्रय ताम्हाणे,गजराबाई शेलार,अनिता कांबळे,ऋषिकेश साखरे,सुरेंद्र कदम-शाहूनगरमधील सामाजिक

कार्यकर्ते, आरती मोडक, नितीन भगवान धांदरे, गंगाराम पवार यांचे दुःखद निधन झाले असल्याने त्यांना या मा.महापालिका सभेमध्ये श्रद्धांजली वाहणेत यावी अशी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब,श्रद्धांजलीची जी सूचना मांडली त्याला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, माळीण गाव, तालुका आंबेगाव इथे दरड कोसळल्याने तिथे असलेले ग्रामस्थ अडीअडचणीत असतील, त्यांचे वारस असतील, त्यांना आपले एक महिन्याचे मानधन देण्यासाठी आम्ही आत्ता सहया घेतलेल्या आहेत. ज्या-ज्या सहका-यांना मानधन द्यायचे आहे, जे एक महिन्याचे आपले मानधन देऊ इच्छितात. मा.महापालिका आयुक्त यांना मा.महापौरांच्या, सर्व सभागृहाच्या वतीने विनंती आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेकडून रु.२५ लाख द्यावेत अशी विनंती आहे. आत्ता माळिण गावाचे जे प्रेझेंटेशन दाखविण्यात येणार आहे, जी जी टीम गेली होती. इलेक्ट्रीकल विभाग असेल, स्थापत्य विभाग असेल, वैद्यकीय विभाग असेल आपली पिंपरी चिंचवड मनपाची टिम तिथे पहिल्यांदा गेली होती. आपण तिथे जाणे आपले कर्तव्यच आहे. आम्हाला समजले की, महापालिकेचे कर्मचारी लोहोकरे यांचे जावई, तीन नातवंडे, व्याही, विहीण, मुलगी, जावई ही सगळी फॅमिली या दूर्घटनेत मृत्यूमुखी पडले आहेत पिंपरी चिंचवड मनपाने तिथे धावून जाऊन चांगले काम केले आहे. आपले कर्मचारी सुद्धा कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता तेथे गेले मी आपल्या सगळ्यांचे मनापासून आभार मानते व या विषयाला अनुमोदन देते

**मा.महेशदादा लांडगे** - मा.महापौर साहेब, आत्ताच पक्षनेत्या मा.मंगलाताई कदम यांनी जी सूचना वाचली, त्याला मी अनुमोदन देतो.

(पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे अधिकारी व कर्मचारी यांच्या टीमने माळीण गावात जाऊन जे मदतीचे कार्य केले, त्याचा स्लाईड शो सभागृहामध्ये दाखवण्यात आला.)

**मा.सुलभाताई ऊबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच आपण जो ऑंखोदेखाहाल बघितला आहे. आपली टिम तिथे गेली होती. ही दूर्घटना संपूर्ण देशाला हादरा देणारी दूर्घटना आहे. आत्ताच मा.मंगलाताई कदम यांनी नगरसेवकांना आवाहन केले आहे की, त्यांनी त्यांचे एक महिन्याचे मानधन फंडामध्ये द्यावे. मी शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या सर्व नगरसेवकांचे मानधन या फंडासाठी देणार आहे हे सांगू इच्छिते. त्याचप्रमाणे निसर्गाला कोणीही आव्हान करु शकत नाही. मग तो लातूरला झालेला भूकंप असो, माळिण गावाची घटना असे अशा दूर्घटना कुठेही घडू नयेत अशी प्रत्येकाची इच्छा असते परवा पूर्णानगरमध्ये एक इमारती खचली होती. तिथे गेल्यानंतर तिथे आमदार आले होते, आयुक्त साहेब आले होते, मंगलाताई सुद्धा आल्या होत्या. ती महिला २५ फूट खाली पडली होती. तिच्या सुदैवाने तिला काही दुखापत झाली नाही तिथे महापालिकेचे सर्व अधिकारी आले होते. पीसीएनटीडीएची बिल्डींग परमिशन असल्यामुळे सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला त्याठिकाणी न

बिल्डींग समोर आहे. रस्त्याखालून संपूर्ण नाला गेलेला आहे दोन्ही इमारतींच्या खालून नाला गेला आहे. इथे पाण्याचा आवाज एवढा येत होता. यापूर्वी कमिश्नरांकडे तक्रारी केलेल्या आहेत. दूर्लक्ष होते आहे निसर्गाला एक प्रकारे आव्हान केले जाते आहे. आपणच लोकांच्या जीवाशी खेळतो आहोत. त्याठिकाणी जरी प्राधिकरण असले तरी लेखी स्वरुपात ज्या तक्रारी केल्या गेल्या आहेत त्यांची दखल घेऊन ज्या बांधकाम परवानग्या दिल्या गेल्या आहेत त्या रिवाईज करायला सांगा. त्यांची चौकशी व्हावी. बिल्डींगखालून नाला जात असेलतर त्याची सुद्धा चौकशी करावी. शहरातील जेवढ्या जेवढ्या नाल्यांच्या, इमारतींच्या संदर्भात तक्रारी केल्या आहेत, त्यांची चौकशी करावी. या इमारतींना कशा परमिशन दिल्या गेल्या आहेत. कोणत्या अटी शिथिल केल्या आहेत. तिथे धोका आहे का. नैसर्गिक पाण्याचा स्त्रोत थांबवला तर काय होते हे बघितले पाहीजे. पाणी कुठे-कुठे बाहेर येते. इमारतीच्या खालून पाणी आपला मार्ग शोधत असेल तर ती इमारत ढासळल्याशिवाय राहणार नाही. आज नाहीतर चार वर्षांनी ढासळेल. या घटनेतून उदबोध घेऊन सर्व नाल्यांवरील इमारतींची तातडीने चौकशी करावी अशी मी सभागृहाच्या वतीने विनंती करते.

**मा.गोरक्ष लोखंडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच एक चित्रफित पाहिली आहे. हृदय हेलावणा-या या ज्या गोष्टी घडत आहेत. निसर्गाचा प्रकोप झाल्यानंतर काय होते, निसर्गाला आव्हान दिल्यानंतर काय होते, निसर्गाचे उल्लंघन केल्यानंतर काय होते याचे उदाहरण माळिण गावात घडले आहे. मुंबई इथे नाला समजून मिठी नदी बुजवण्यात आली. प्रचंड पाऊस झाल्यानंतर मिठी नदीचा उगम झाल्यानंतर यात अनेकांना प्राण गमवावे लागले. अशा अनेक घटना निसर्गामुळे पहायला मिळतात. ही दूर्दैवाची गोष्ट आहे. या शहरात डिझॅस्टर मॅनेजमेंट असेल, टिम असेल या सगळ्या गोष्टींसाठी नंतर धडपड करतो. परंतू याची खबरदारी आधी घेणार आहोत का नाही. मग त्यावरील इमारत असेलतर कोणाच्या आशिर्वादाने अनधिकृत होणारी इमारत असेल तर त्याला वेळीच आळा घातला नाहीतर अशा घटना दिवसेंदिवस घडत राहतात. त्यावेळी आपण त्यामागील कारण शोधतो. मा.महापौर साहेब, आपण परदेशात जाऊन येतो. आपले सहकारी परदेशात जाऊन येतात. मा.महापौर साहेब, इस्त्रायला हा अतिशय छोटा देश आहे. तिथे अतिशय कमी पाऊस पडतो. तरीदेखील त्यांनी केलेले नियोजन, पडलेल्या पाण्याचे केलेले नियोजन पहा. चटई निर्देशांकानुसार बिल्डींग खालून पाणी सोडायला परमिशन त्याशिवाय मिळत नाही. बारीक बारीक गोष्टी आहेत. Now we are grown up. या सगळ्या गोष्टी होऊ नयेत म्हणून आपण याची काळजी घेतली पाहीजे, केले पाहीजे. आपण ते करावे. आमच्या नेत्या मा.मंगलाताई कदम यांनी आत्ताच सूचना मांडली आहे. खरे म्हणजे हे सगळे तोकडे आहे. शेवटी नुसतेच भाषण करून भागणार नाही. त्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्यासाठी त्यांना मदतीचा हात द्यावा लागणार आहे. याला अनुमोदन देतो. आपण रेस्क्यू टिम नेली होती. त्यांनी जे काम केले आहे ते एखाद्या चित्रपटातील नायकाला पडद्यावर पाहत असतो. फिल्डवर काम करताना ती उर्मी आतून लागते, उत्साह लागतो. भविष्य असे घडू नये याचे प्रिव्हेंन्टीव्ह मेजर्स आपण करावेत अशी विनंती करतो.

**मा.महेशदादा लांडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अत्यंत वाईट दूर्घटना माळीण या गावी घडली आहे. त्यासाठी पूर्ण महाराष्ट्रातून मदत पोहोचते आहे. उद्या नेत्यांनी, सभागृहातील सर्व गटनेत्यांना आपल्या सदस्यांचे मानधन याठिकाणी देण्याचे ठरवले आहे. सगळ्यांचा सहभाग सुद्धा घेतला आहे. मंगलाताईंनी रु.२५ लाख देण्याचा प्रस्ताव मा.आयुक्त व आपल्याला दिला आहे. मला यात म्हणायचे आहे. असे बोलून किंवा मदत करुनही त्यांना मदत मिळत असेलतर त्यांना मदत करायचा फायदा आहे. माझे मत आहे की, जे कोणी लोक जीवंत आहेत, त्यांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे, त्यांना रहायला घर नाही. आपण पैसे तर देणार आहोत. आपण त्यांना महापालिकेकडून घर बांधून दिलेतर त्यांना कायमस्वरुपी होईल. आपण जे पैसे देणार आहोत, जो फंड देणार आहोत, तो कलेक्टरकडे जमा होणार आहे. त्याचा उपयोग होईल, पण आत्ता त्या लोकांना रहायला घर नाही. त्यांच्या रोजच्या जेवणाचा प्रॉब्लेम येतो आहे. माझे म्हणणे आहे, जेवढे लोक राहीले असतील त्यांना आपण घर बांधून द्यावे. आपण केलेली मदत त्या निमित्ताने दिसेल ही विनंती आहे. आपण महापालिकेच्या विभागाकडून या गोष्टीकडे लक्ष दिले पाहीजे. तहान लागल्यावर आपण विहीर खोदणार असे दिसते आहे. ॲक्सिडंट होतो त्यावेळी रस्त्यावरील चूक लक्षात येते. नाल्यावरील पाणी फिरवले आहे, त्यावेळी कळते नाला कुठे आहे? ब्रीज छोटा होतो, जेव्हा ट्रॅफीक जाम होते. नियोजनात असताना त्यात बदल करणे योग्य असते. निसर्गाची कोणतीही घटना कुठे घडेल, कधी घडेल हे सांगता येत नाही. त्याकरीता सुद्धा गेल्यावर्षी एक टिम तयार करायचे ठरले होते. नुसती टिम तयार करुन चालणार नाही. त्यासाठी लागणारी यंत्रणा, साहित्य, बजेट सेपरेट निर्माण करुन दिले पाहीजे. अचानक काही घटना घडल्यावर आपल्याकडे यंत्रणा नसेलतर आणायला जायला आपल्याकडे गाड्या नसतात. अग्निशामकमध्ये काही गोष्टींची कमतरता आहे. भरपूर गोष्टी करत असलात तरी ज्यावेळी त्या गोष्टी नसतात, त्या गोष्टी आजच करुन दिल्या पाहीजेत. ४/५ दिवसांपूर्वी भरपूर पाऊस झाला. त्यामुळे लोकांना जास्त पळावे लागले. अग्निशामक केंद्राकडून दोन पंप घेतले होते. एका वेळेला पूर्ण शहरात पाणी असेल तर शहरात रोष होतो. भोसरी इथे पाणी काढायला पंप मागितला तर तो पंप काळेवाडीत होता. तोपर्यंत त्या लोकांनी पाण्यातच रहायचे का. जो अधिकारी असेल त्याच्या अंतर्गत सहा प्रभागांत यंत्र आहे का, या गोष्टी पाहील्या पाहीजेत हे मी वारंवार बोलतोय. आत्ता आपल्या समोर उदाहरण आहे. यात जातीने लक्ष घालावे. विभाग सक्षम कसा होईल य़ासाठी प्रयत्न करा. जे काही लोक दिवंगत झालेत त्यांना श्रद्धांजली वाहण्यात यावी.

**मा.सविता साळुंके** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता आपण मानवतेचे उदाहरण दाखवलेत. तसेच सभागृहाने आपले मानधन देऊन माणुसकी दाखवली. हे सगळे करत असताना आत्ता ज्येष्ठ नगरसेवक मा.सुलभा ऊबाळे यांनी जे मुद्दे उपस्थित केले. एकिकडे आपण दूर्घटना घडल्यानंतर मदत करतो. उदाहरण पाहिलेतर माझ्या प्रभागात पूर्ण नाला बारीक केला आहे. पेपरमध्ये सुद्धा बातमी दिली होती. अधिका-यांशी वारंवार चर्चा केली. अधिकारी म्हणतात, बिल्डरने प्लॅन सँक्शन करुन आणला आहे. पालिकेची अशीच एक इमारत आहे ती नाल्याच्या बरोबर आहे. नाला जेवढा होता, बिल्डरच्या इमारतीसाठी नाला बारीक करण्यात आला आहे. मागील कमिश्नर यांच्याकडे सुद्धा या विषयासंदर्भात पाठपुरावा करण्यात

आला होता. एकिकडे दूर्घटना घडू नये म्हणून पाठपुरावा करत असाल तरी एकिकडे दूर्घटना घडल्यानंतर मदत करतो म्हणून त्या दृष्टीने पाहणी करावी अशी विनंती आहे.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आख्ख्या देशाला, महाराष्ट्रालाच काय पण शहराला देखील हादरा बसेल अशी माळीण गावातली दूर्घटना घडली आहे. या घटनेबद्दल किती बोलले, किती श्रद्धांजली वाहीली तरी कमीच आहे. गेले ३/४ दिवसांपासून टि.व्हीवर पाहतोय. अंगाला काटा येणारा क्षण आहे. त्याठिकाणी एका आजीची प्रतिक्रिया पाहिली, त्यांचे आख्खे कुटूंब उद्धवस्त झाले आहे. रहायला घर नाही, जेवायला काही नाही. ९० वर्षांची महिला तिथे तिची प्रतिक्रिया देत होती. सर्व नेते मंडळींनी प्रतिक्रिया दिली आहे. आपल्याकडे रेस्क्यू ऑपरेशन, डिझॅस्टर मॅनेजमेंट आहे. फक्त शहरात घटना घडल्यानंतर त्या विषयावर चर्चा करायची. पिंपरी चिंचवड शहरात पूर्णानगरमध्ये आकस्मिकपणे स्लॅब खाली कोसळला होता. याअगोदर बरेच वेळा असे झाले आहे, ही पहिलीच घटना नाही. मा.मंगलाताई कदम महापौर असताना भरपूर पाऊस झाल्यानंतर काळेवाडीतल्या झोपडपट्टीत पाणी शिरले होते. तेव्हा महापौर स्वतः त्या पाण्यात उतरल्या होत्या. मागील वर्षी कात्रज इथे जोरात पाऊस आल्यावर डोंगराच्याकडेने पाणी वाहून आल्यामुळे एक महिला व तिची मुलगी या वाहून गेल्या होत्या त्याच मुलीचे वडील माळीणमध्ये स्वतः तिथे सेवा करण्यासाठी उपस्थित होते. त्यांची प्रतिक्रिया टि.व्हीवर दाखवण्यात आली. हे ऐकून खरेतर माणसाचे मन सुन्न होते. अंगावर काटा यावा अशी ही दूर्घटना घडली आहे. या माध्यमातून नॅशनल डिझॅस्टर रेस्क्यू टिमच्या जवानांचे उल्लेखनीय काम झाले आहे. किती बोलावे व काय बोलावे ही खरोखरच विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये काही गोष्टी घडल्यातरी आपण त्यासाठी तयार राहीले पाहीजे. असे काही घडल्यानंतर प्रयत्न करण्यापेक्षा आजच या गोष्टीवर विचार केला पाहीजे. नुसतेच मानधन देऊन, पैसे देऊन होणार नाही. आपल्या परिसरातील नदीकाठी जो भराव चालू आहे तो रोखला पाहीजे. झोपडपट्टी असू द्यात, काही लोक घर बांधतात ते रोखणे गरजेचे आहे. बांधून तयार झालेल्या बिल्डींग कट केल्यात. विरोधी पक्षनेत्यांच्या परिसरात काळेवाडीत अर्धवट तोडलेल्या बिल्डींगज् दिसत आहेत घर घेतल्यानंतर दुरुस्तीसाठी स्लॅब बांधायचे म्हटलेतरी त्यावर विचार करणे गरजेचे आहे. सगळ्यांना आपआपल्या वॉर्डातल्या अडचणी सांगायच्या आहेत, मत मांडायचे आहे. आयुक्त साहेबांनी रेस्क्यू ऑपरेशन केले. आयुक्तांचे अधिकारी, डॉक्टर्स असू देत, इंगळे साहेबांच्या नेतृत्वाखाली असू दे सर्वांनी खूप चांगल्या प्रकारे काम करायचा प्रयत्न केला. आख्खे गाव उध्वस्त झाले आहे. त्यांना पर्सनली जाऊन मदत करायची गरज आहे. फंड माध्यमातून मदत करण्यापेक्षा एक चांगली आदर्श मदत महापालिका करु शकते. तिथे खूप कमी लोक उरलेले आहेत. आपण त्यांचे पुनर्वसन करत असाल तर त्याला कोणाचाही विरोध होणार नाही. तुमची निर्णय घेण्याची क्षमता आहे. महापौर साहेब, तुम्ही ताबडतोब निर्णय घ्या. उरलेल्या लोकांसाठी पक्की घरे बांधत असाल, कोणी महापालिकेच्या माध्यमातून, नागरीकांच्या माध्यमातून काही संधी देत असेल तर मग मानवतेच्या दृष्टीकोणातून मदत कशी करता येईल या दृष्टीकोणातून जरुर प्रयत्न करा. आपल्या शहरात कधी अपघात होऊ नये म्हणून पर्मनन्ट डिझॅस्टर फोर्स तयार करा. म्हणजे ते २४ तांस तयार राहतील. कुठे आग लागली, रोगराई पसरली, कुठे पूर

आलातर ते आपल्य़ाला कळाले नाही, माहित नाही असे होणार नाही. अपघात कधी कोणाला सांगून येत नाही. कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ शकतो, कोणत्याही प्रकारचा आजार फैलू शकतो. आपण प्रॅक्टीकली अनुभव घेत असतो. आपण ठोस निर्णय घ्यावा. शहरात, देशात, महाराष्ट्रात आपले वेगळे नाव होईल अशा पद्धतीने माळीण गावाला वेगळ्या प्रकारे मदत देऊन अशा पद्धतीने काम करु अशी विनंती करतो.

**मा.रामदास बोकड** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर ही घडलेली दूर्घटना माझे मूळ गाव आंबेगावात आहे, या गावापासून फक्त ३५ किमी. अंतरावर माळिण गाव आहे. ज्यावेळी ही घटना घडली, शंभर टक्के आदिवासी असणारे हे गाव ही घटना घडल्यानंतर सकाळी ८.१० वा. मला फोन आला. त्याठिकाणी असणा-या माझ्या नातेवाईकांचा मला फोन आला. माळिण गावावर असा असा प्रसंग आला आहे. ही दूर्दैवी घटना घडली त्याठिकाणी मी बुधवारी सकाळीच माझ्या वॉर्डात राहणारे माझे सहकारी यांना घेऊन गेलो. कालही दिवसभर मी तिथे होतो. आमदार दिलीप वळसे पाटील व मी बरोबर होतो. आत्ता जी परिस्थिती आहे, ती न पाहण्याजोगी, न ऐकण्याजोगी आहे. तीन/चार कि.मी.वर दुर्गंधी पसरली आहे. प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. याठिकाणी पिंपरी चिंचवड महापालिकेने विशेष रेस्क्यू टिम केली आहे या सभागृहात त्यांचे विशेष अभिनंदन करतो. फिल्म दाखवली. तळवडे गावातून जो रस्ता गेला आहे तो फार अडचणीचा रस्ता आहे. पावसाळ्यात तिथे जास्त पाऊस पडतो. पुढे रस्ता नव्हता. परंतू आत्ता चित्र दाखवले त्यावरुन मला वाटते, आपल्या टिमने अभिनंदन करण्यासारखे काम केले आहे. रस्ता ढिल्ला आहे. तरीदेखील अतिदूर्गम भागात आपली टिम पोहचली. विशेष करुन आपला आरोग्य विभाग असेल, सुरक्षा कर्मचारी असतील, फायर ब्रिगेडचे कर्मचारी असतील, इंगळे, प्रशांत पाटील, मोरे या अधिका-यांचे खरेतर मी अभिनंदन करतो, स्वागत करतो. आयुक्त साहेब आपल्याला सांगायचे आहे, ज्यावेळी विशेष कामगिरी करणारे कर्मचारी असतात, त्यांचा महापालिकेमार्फत विशेष सत्कार करुन त्यांनी केलेल्या कामाची काहीतरी पावती आपण दिली तर निश्चितच त्यांचा काम करायचा जोम वाढणार आहे. फार दूर्दैवी प्रसंग आहे. या परिसरातील १० कुटूंबे माझ्या प्रभागात राहतात. त्यांच्या नातेवाईकांच्या घरातील ५ मृत्यू झाले आहेत. या घटनेतील कुटूंबियांना शासनामार्फत घरे मिळणार आहेत. या विषयावर जास्त बोलणे उचित ठरणार नाही. आपली महापालिका, जुन्नर महापालिका, आंबेगाव नगरपरिषद यांनी केलेली कामगिरी या सर्व कर्मचा-यांचे मी स्वागत करतो. पुणे शहरातील व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व आदिवासी संघटनांच्या वतीने सर्व मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करतो. चिंचवड विधानसभेचे आमदार श्री.लक्ष्मण जगताप यांच्या वतीने, त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करतो

**मा.आशा सुपे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माळीण गावात जी दूर्घटना घ़डली त्यात माझ्या मावशीचे देखील कुटूंब आहे. त्यांच्या कुटूंबातील ६ सदस्य मृत्यू पावले आहेत माझ्या वॉर्डात ६/७ जणांची कुटूंबे या गावात राहतात. सुपे कुटूंबाच्या वतीने, आदिवासी समाजाच्या वतीने मी मृत व्यक्तींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहते

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माळीण गावातील दूर्घटना घडली आहे, तिथे अक्षरशः लोकांना टि.व्ही.वर बघून अंगावर शहारे येत आहेत. पिंपरी चिंचवडमध्ये खूप ठिकाणी खड्डे झाले असून त्या खड्यांत पाणी साचले आहे त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. बीआरटी रस्त्यावरील ड्रेनेजची झाकणे चोरीला जातात. जेव्हा दूर्घटना घडते, त्यावेळी सभागृहाच्या वतीने त्यांना आपण श्रद्धांजली वाहतो शहरातील मुलांना जाण्यायेण्याची खूपच गैरसोय होते आहे. डेंग्यूचे प्रमाण खूप वाढले आहे. आपण काळजी घेतली पाहीजे. माळिण गावासारख्या घटना कुठेतरी टाळल्या गेल्या पाहीजेत. आपल्या अधिका-यांनी तिथे जाऊन काम केले आहे. मी अधिका-यांना सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देते व माळिण गावातील दूर्घटनेतील लोकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहते

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरोखरच आज माळिण गावातील कुटूंबांवर अशी वेळ आली आहे. माळिण गावामध्ये दूर्घटना घडली आणि टिव्हीवर दाखवायला लागले. परिस्थिती पाहून अक्षरशः डोळ्यात पाणी आले आपल्या अंतःकरणात उचंबळायला लागेल अशी परिस्थिती आहे. त्या गावातील उद्धवस्त कुटूंबांना पाहून सर्वांनाच वाईट वाटले आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने जी काही मदत केली आहे तो मदतीचा हात घ्यायला काही कुटूंबेच नाहीत. पूर्ण घर उद्धवस्त झाले आहे. या कुटूंबांतील एखादा सदस्य शिक्षणाच्या निमित्ताने, कामाच्या निमित्ताने गावाबाहेर गेला असेलतर त्याच्यापर्यंत मदतीचा हात पोहचू शकतो. आपण नगरसेवकांनी एक महिन्याचे मानधन दिले आहे. आयुक्त साहेबांनी देखील रु.२५ लाख दिले आहेत. याठिकाणी खरोखरच दुःख वाटते आहे आपण याठिकाणी या विषयावर जास्त बोलणे उचित ठरणार नाही. अशी परिस्थिती कुठेही, कोणावरही येऊ नये, अशी आपण सर्वांनी ईश्वरचरणी प्रार्थना करु या. माझ्या वॉर्डात ३०/४० वर्षांपूर्वीची मातीची भिंत, सिमेंटचा पत्रा असलेली घरे आहेत. काही ठिकाणी प्राधिकरण मान्यता देते, त्यामुळे लोकांनी छोटी छोटी घरे बांधली आहेत. आज त्यांच्या कुटूंबातील लोक वाचले आहेत. परंतू देवाच्या कृपेने अशी दूर्घटना टाळता आलीतर पहावे ती महिला कुटूंब चालवते. दत्तनगरमध्ये जी घटना घडली आहे, त्याला लागून जुने बांधकाम आहे अशीच परिस्थिती तिथे सुद्धा आहे. आज आपल्याकडून या बांधकामांना दुरुस्तीसाठी परवानगी मिळायला पाहीजे. कारण या लोकांनी अर्ध्या गुंठ्यांत जागा घेऊन घरे बांधली आहेत. त्यांनी बिल्डींग परमिशन मिळण्यात अनेक अडचणी आहेत. आपल्या काही अडचणी आहेत. त्यामुळे त्यांना चांगल्या परिस्थितीतील बांधकाम करता येत नाही. आयुक्त साहेब, आपण स्वतः येऊन व्हिजिट द्यावी, पाहणी केलीतर या लोकांना बांधकाम करण्यासाठी मदत केलीतर खरोखरच दूर्घटना टळेल. आपण दूर्घटना झाल्यावर सावध होतो. मी तुम्हाला विनंती करते की, आपण स्वतः येऊन खरोखरच व्हिजिट देऊन परिस्थिती काय आहे ते पहावे. आपण सर्वांनी मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहीली आहे.

**मा.विनोद नढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आंबेगाव तालुक्यातील माळिण गावात जी दूर्घटना घडली, त्यात १०७ लोक मृत्यूमुखी पडले अजूनही १५० मृत चेहरे हाती आलेले नाहीत. मा.मंगलाताई कदम यांनी संध्याकाळी फोन करून कळवले होते की, दूर्घटनाग्रस्त लोक

आहेत, त्यांना सदस्यांच्या वतीने मदत जाहीर करायची आहे. त्यांच्या या सूचनेचा आम्ही आदर करतो व पिंपरी चिंचवड शहर कॉंग्रेस पक्षाचा गटनेता या नात्याने कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकांचे मानधन माळीण दूर्घटनाग्रस्त गावाला देण्याचे जाहीर करतो. आत्ता मा.सुलभाताई ऊबाळे यांनी सांगितले, मा.उल्हास शेट्टी यांनी ज्या काही सूचना मांडल्या, त्या सूचनांचे खरोखरच योग्य प्रकारे अवलोकन करावे. महापालिकेतील नद्यांच्या बाजूने संपूर्ण नदीत भराव टाकायचे काम चालू आहे. प्रत्येक वर्षीप्रमाणे गेल्या ५/६ दिवसांत हा पहिलाच पाऊस असला तरी पाणी वाचावे म्हणून पाणी कपात केली. परंतू या ४/५ दिवसांत पाऊस झाला. संपूर्ण प्रशासन असलेतरी नगरसदस्यांची धावपळ उडली. तिथे अनेक अडचणी आहेत. आरोग्यचा खूप मोठा प्रश्न निर्माण होतो आहे. महापालिका आयुक्त म्हणून आयुक्त साहेब आपण यात लक्ष द्यावे. पिंपरीतील संजयनगर असेल, मुळानगर असेल, चिंचवडचे मोरया गोसावी मंदीर असेल ही ठिकाणे नदीला पाणी वाढल्यावर कायम पाण्यात जातात. यात गांभिर्याने लक्ष दिले पाहीजे. संबंधित अधिका-यांनी ही ठिकाणे पाण्यात जाऊ नयेत म्हणून लक्ष द्यावे. आपल्या ग्रेड सेपरेटरचा तलाव झाला आहे. अशा गोष्टी घडू नयेत म्हणून भविष्यात योग्य प्रकारे काळजी घ्यावी. पावसाळा आल्यानंतर ड्रेनेज विभागाचा कर्मचारी ड प्रभागात केवळ पाचच कर्मचारी, माझ्या प्रभागात दोनच कर्मचारी आहेत. यातून पावसाळा तोंडावर हा प्रश्न, कर्मचा-यांची संख्या वाढावी अशी विनंती करतो. जे काही लोक मृत्यू पावले आहेत त्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नैसर्गिक आपत्ती ज्यावेळी कोणतीही दूर्घटना घडते ती दूर्दैवीच असते. मानसिकतेच्या दृष्टिकोणातून, मानवतेच्या दृष्टिकोणातून सर्व महाराष्ट्रातून विविध संस्थांच्या वतीने त्यांना मदतीचा ओघ निश्चितपणे चालू राहतो. एखादी दूर्घटना घडल्यानंतर त्या कुटूंबातील माणसे मानसिक दृष्ट्या इतकी खचलेली असतात. त्याही परिस्थितीत आपण त्या घटनेचे भावनेशी नाते जोडून. आपण ही घटना का घडली याची उलट चर्चा करतो. हे देखील निश्चितपणे दूर्दैवी आहे. काही मंडळी राजकीय दृष्टीकोणातून कशा पद्धतीने या घटनेवर चर्चा होईल हे महाराष्ट्रात पाहतील. असे अनेक प्रसंग पहायला मिळतात. विशेषतः महापालिकेचे डॉक्टर तेथे गेले होते, त्यांचे कौतुक, अभिनंदन करतो. विशेषतः आयुक्त साहेबांचे मनापासून अभिनंदन करतो हा निर्णय त्वरित घ्यायचा असतो. सर्व नगरसदस्यांनी भावना व्यक्त केल्या. त्यासाठी मी देखील सहमत आहे. आम्ही आमचे एक महिन्याचे मानधन देऊच, पण मा.महेशदादा लांडगे यांनी ज्या सूचना केल्या आहेत. कायदेशीर अडचण असली तरी घरे निर्माण करत असाल तर शहरात जे ठेकेदार बसलेले आहेत. बीएसयूचे जे ठेकेदार गेले आहेत, त्यांना बोलवून सांगा की, माळीण गावातील लोकांना ५/५ घरे बांधून द्या. आजपर्यंत जे काही पाप केले आहे, राहिलेल्या आयुष्यात त्यांना पुण्य मिळेल. हे मी सांगितले असे सांगू नका. असे तुम्ही करा. आज माळिण गावातील लोक ज्या परिस्थितीला सामोरे जात आहेत, त्यांना आर्थिकदृष्ट्या बळ देणे गरजेचे आहे. केवळ मानसिक नाही. पाच कोटी, दहा कोटी कायम स्वरुपी मदत केली पाहीजे. पिंपरी चिंचवड महापालिका आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे. पण तिला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करण्याचे काम काही लोकांकडून होते आहे. म्हणून ही पुण्य कमवायची संधी आहे. एखादी घटना घडल्यानंतर

त्यावर फार मोठी चर्चा करतो. पिंपरी चिंचवडमध्ये एक वर्ष काहीही काम करु नका पिंपरी चिंचवड हे गावाचे शहर झालेले आहे. शहराच्या लोकसंख्येत झपाट्याने वाढ झाली आहे. शहराचा नियोजनबद्ध विकास झाला पाहीजे. तिथे आपण आजही कमी पडतोय. शहरात आजूबाजुला कुठेही घरे आहेत, त्यांचा सर्वे करा. १९९२ सालानंतर अंडरग्राऊंड भुयारी गटर योजना अंमलात आली, त्यावेळी असलेल्या लोकसंख्येचा आधार घेऊन फिल्ट्रेशन प्लॅन, त्याची कपॅसिटी, त्या वेळची लोकसंख्या, त्यावेळच्या पाईपची साईज, आत्ता असलेली परिस्थिती, त्यानंतर रोडचे रुंदीकरण या गोष्टी लक्षात घेतल्यातर ड्रेनेज पातळीमध्ये लोड झाला आहे. सर्वे करा. झोपडपट्टीत आत्ता माझ्याबरोबर चला, ही सुद्धा भीषण नैसर्गिक आपत्ती होऊ शकते. आपण अशा आपत्तीला कुठेतरी जबाबदार असतो. कोणीतरी गेल्यानंतर दूर्घटना झाल्यानंतर त्यावर चर्चा करण्यापेक्षा आत्मचिंतन केले नाहीतर अशी चर्चा तरी करु नका. चर्चा करण्यासाठी चर्चा करु नका. चर्चा करुन काय होईल. आपण त्यातून काय धडा घेणार आहोत. झोपडपट्टीत डायरेक्ट अंडरग्राऊंड असेल तर मैलाशुद्धीकरण प्रकल्प असतानाही हे पाणी डायरेक्ट नदीत सोडले जाते आहे. पाण्याला वास येतो आहे. पिण्याचे व ड्रेनेजचे पाणी एकच झाले आहे. अशी नदीची परिस्थिती झाली असताना या सर्व परिस्थितीवर भविष्यकाळात काय करणार आहोत. आम्ही आमच्या लहाणपणापासून चिंचवड गावातून नदीतून पाणी जाताना पाहीले आहे आमच्या बंधूंनी हे पाणी पाहिले आहे. आम्ही हे नदीचे पाणी पाहण्यासाठी गर्दी करायचो. त्यावर काय उपाययोजना झाली आहे. पाणी वाटपाचे नियोजन चुकीचे आहे. एक तासच पाणी मिळणार आहे. पाच तास पाण्याची सवय लागली आहे. एकच तास पाणी हे लोक कसे मान्य करतील. मग काही कटू निर्णय घ्यावे लागले तरी चालतील. शहराच्या भविष्य काळासाठी, नियोजनासाठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. कुटूंबेची कुटूंबे उद्धवस्त झाली आहेत. त्यांना घरे बांधून द्या. राहीलेली घरे फार कमी राहीली आहेत. घरे बांधून द्या. तुमच्या केबिनमध्ये तुमच्या भाषेत नियम करा, त्यांना सांगा, ते करतील व करायलाच पाहिजे अशी सूचनावजा विनंती करतो.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माळीण गावात झालेली दूर्घटना ही सर्वांना विचार करायला लावणारी दूर्घटना आहे. मी एकच सूचना करणार आहे, आपण पर्यावरणाचे ऑडीट करतो. मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब या विषयाच्या बाबतीत आपली महापालिका अतिशय हलगर्जीपणा करते आहे. दूर्घटना घ़डल्यानंतर आपण अतिशय मोठमोठी भाषणे करतो. प्रत्यक्षात कृतीत काहीच येत नाही. ही घटना घडल्यानंतर सर्वांनी खेद व्यक्त केला. पण असे का घडते यात डोकावून पाहायची गरज आहे. पर्यावरणाचे ऑडीट पाहिलेतर चुकीचे ऑडीट सध्या केले जाते आहे. तसे न करता पर्यावरण विभाग व अतिक्रमण विभाग यांचे एक संयुक्त ऑडीट म्हणून विशेष ऑडीट करा. शासनाने दिलेल्या नियमांतर्गत एक विशेष ऑडीट करा. गेले दोन/तीन महिन्यांत मा.सुलभाताई ऊबाळे यांनी उपस्थित केलेला नाल्याचा प्रश्न, मा.भाऊसाहेब भोईल यांनी उपस्थित केलेला नदीचा प्रश्न. आपल्या क्षेत्रांत किती नाले आहेत हे शासनाच्या रेकॉर्डमध्ये आहे. किंवा प्रत्यक्षात शासनाच्या रेकॉर्डमध्ये नसताना वस्तुस्थितीत तिथे नाला आहे. वर्षानुवर्षे असणारा नाला रेकॉर्डमध्ये नाही. असे दोन्ही स्वरुप आहेत. नाल्याचे पात्र किती किलोमीटर आहे, त्याची रुंदी किती आहे, ही वस्तुस्थिती व

आजची वस्तुस्थिती त्याचे संपूर्ण ऑडीट त्याठिकाणी झाले पाहीजे. तुम्ही धोकादायक इमारतींचे डिक्लेरेशन केलेले आहेत. नागरीक स्वतः अर्ज करतात. परंतू महापालिकेची कारवाई होत नाही. इमारतीचे असे आकडे समोर आले पाहीजेत. कंजस्टेड रस्ता असेलतर दूर्घटना घडल्यावर तिथे मुंबईमध्ये फायर ब्रिगेडच्या लोकांना पूर्ण मजला जळून खाक झालातरी घटनास्थळी जाता आले नाही. म्हणून फायर ब्रिगेडची गाडी जाऊ शकेल असे रस्ते केले पाहीजेत. याचे सुद्धा ऑडीट केले पाहीजे. त्यानंतर ज्यावेळी पूर परिस्थिती नियंत्रणात होती. आगीची परिस्थिती निर्माण होते. फायर ब्रिगेडची किती यंत्रणा उपलब्ध होते, किती केमिकल्स उपलब्ध आहेत. जो विषारी वास निर्माण होतो, अशा पद्धतीचे केमिकल्स उपलब्ध नाहीत. आपण केवळ पाणी मारून आग विझवतो. माझ्या भागात एक घटना झाली होती. वायपर कित्येक तास चालते आहे. लोकांना घशाचे आजार झाले आहेत. आपल्या विभागाचे काही देणे घेणे नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मागील वर्षी गणपती विसर्जन काळात इंद्रायणी नदीत सर्व खात्यांना सांगून तसे नियोजन लावले पाहिजे. दुर्दैवाने काही गणपती विसर्जन केल्यानंतर दोन तरुण अचानक गायब झाले. त्यांना शोधण्यासाठी दीड तास लागला. आपल्याकडे पाणबुडे नव्हते. बोटीने सर्वे करणे एवढीच सुविधा उपलब्ध होती. पुण्यामधून पाणबुडे आणून त्यांनी शोधल्यावर ते दोन तरुण हाती लागले. दोन दिवसांत त्यांचे मृतदेह त्याठिकाणी सापडले नाहीत. हा आपला कमकुवतपणा आहे. संपूर्ण ऑडीट पुढे आले पाहीजे. आपले विभाग किती सक्षम आहेत. फायर ब्रिगेडची गाडी जायला तिथे रस्ताच नाही. तिथे सुद्धा एनओसी दिली जाते. याचे फार मोठे सर्वेक्षण आहे. हे विशेष सर्वेक्षण राबविले पाहिजे. पाणी नाही, पाणी नाही म्हणून आरडाओरडा करतो. त्याचे सुद्धा ऑडिट झाले पाहीजे. त्यासाठी काही सांगायची गरज आहे. पर्यावरण खाते पाहीलेतर काही काम नसलेले कोणतेही खाते असले तरी पर्यावरण खाते यासाठी याठिकाणी विशेष सूचना द्या व माझ्या वतीने मी श्रद्धांजली अर्पण करतो व विशेष गांभिर्याने लक्षात घेऊन आपण सूचना कराव्यात अशी विनंती आहे.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आत्ताच याठिकाणी आपण चित्रफीत बघितली आहे, त्यानंतर प्रत्येकाला घटनेची भिषणता अनुभवायला मिळाली आहे. माळिण गावावर निसर्गाचा कोप अशा अनपेक्षित पद्धतीने झाला. त्यात अनेक कुटूंबे, अनेक निरपराध व्यक्ती, महिला, मुले मृत पावल्या आपण महापालिकेकडून त्यांना मदत केली, त्याबद्दल निश्चितपणे अधिकारी वर्गाचे कौतुक करतो. परंतू ज्या घटना घडतात, त्याविषयी गांभिर्याने बघणार आहोत का. घटना घडलीतर त्याचे नियोजन आयुष्यभर करणार आहोत का, काही पाऊले उचलणार आहोत का. दीड वर्षांपूर्वी या सभागृहात मी व माअश्विनी चिंचवडे यांनी एक निवेदन दिले होते. केशवनगर भागामध्ये काळेवाडीच्या पूलाच्या भागात नदीला वळण मिळाले आहे. तिथे एका बाजुने जागा मालकाने पूर्णपणे भराव टाकला आहे. त्यामुळे निश्चितपणे नदीला पाणी वाढले तर ते थेरगावात न जाता चिंचवड गावात शिरेल. हे भराव टाकणे चालू होते, त्यावेळी अधिका-यांना निवेदन दिले होते. हा भराव टाकणे थांबवावे. ४/५ फूटाऐवजी रस्त्यापासून हा भराव निश्चितपणे नागरीकांच्या जीवनाला धोकादायक आहे. त्याविषयी गांभिर्याने विचार करावा. प्रत्येक मासिक सभेमध्ये मी या विषयावर बोलतो. त्यावर कारवाई होत नाही. हा खूप महत्वाचा विषय आहे. मघाशी मा.महेशदादा लांडगे, मा.उल्हास शेट्टी म्हणाले

त्याप्रमाणे जी काही मदत करायची ती त्यांना त्वरित देण्यात यावी. त्यासाठी वेळ लागू नये. त्या पद्धतीने आपले शहर मजबूत दिसेल, अत्यंत बेखबरपणा असेलतर त्याला काही अर्थ नाही. शहरात कुत्री आहेत, घुशी आहेत. शहरात आतून कमकुवतपणा झाला आहे, त्याकडे लक्ष दिले पाहीजे. निश्चितपणे आमच्या पक्षाच्या वतीने, सर्व नगरसेवकांच्या वतीने माळीण गावात घडलेल्या घटनेत जे नागरीक मृत्यूमुखी पडले त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, याठिकाणी सर्वांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सर्वांनी श्रद्धांजली वाहिली आहे. महापालिकेच्या वतीने जी काही मदत शक्य आहे ती केली आहे. भविष्यात कोणी काही करु शकतो, यासंदर्भात सूचना केल्या आहेत. मी तोच तोच विषय रिपीट करत नाही. या दूर्दैवी घटनेच्या अनुषंगाने प्रत्येकाच्या भावना आहेत. आपल्या महापालिकेत अशा प्रकारची कोणतीही घटना घडू नये या दृष्टीने नेमके काय करु शकतो आणि काय केले पाहीजे याचा खरेतर विचार केला पाहीजे. मला वाटते आपल्या शहरात अशा प्रकारची घटना भविष्यात घडू शकते का याचे सर्वेक्षण केले पाहीजे. आपण सर्वे केला पाहीजे. त्यासाठी एखादी टीम केलीतर विशेषतः सुलभाताई ऊबाळे यांनी म्हटल्याप्रमाणे नाल्यावरील बांधकाम आहे. नैसर्गिक नाला डायव्हर्ट करण्यात आला आहे. आपल्या शहराचा कंटूर सर्व्हे नगररचना विभागाकडून केलातर नेमके लक्षात येईल की, नेमके कोणत्या लेवलवर पाणी जाऊ शकते. लेवल निश्चित केली आहे. नगररचना विभाग व बिल्डींग परमिशन विभाग यांना कडक सूचना दिलीतर शहरात अशी घटना घडू नये या दृष्टीने आत्तापासून उपाययोजना केलीतर अशा प्रकारची घटना निश्चितपणे घडू नये अशी आग्रहाची, कळकळीची विनंती आहे. आपण त्या दृष्टीने उपाययोजना आखावी व त्वरित अंमलबजावणी करावी. याठिकाणी अधिक न बोलता सभागृहाच्या वतीने व माझ्या वतीने सर्व मृत व्यक्तींच्या आत्म्याला मनःपूर्वक श्रद्धांजली वाहतो.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माळीण गावाची दूर्घटना बघितली तर जागतिक लेवलवर ही दूर्घटना गेली आहे. काल चीनमध्ये सुद्धा भूकंप झाला आहे, तिथे १७५ लोक दगावले आहेत. सभागृहाच्या वतीने त्यांना सुद्धा भावपूर्ण श्रद्धांजली वाहणेत यावी प्रत्येकाला वाटते, आम्ही बोलावे. आपल्या आजूबाजुला कुठेही काहीही घडेल या भितीच्या छायेत ही मंडळी आहेत म्हणून त्यांना बोलायचे आहे. असे प्रत्येकाला वाटते आहे. म्हणून सगळे बोलत होते. विषयाचे गांभिर्य इतके मोठे आहे यासाठी पावसाळा, नाले व त्यापासून होणा-या घटना यावर एक स्वतंत्र मिटींग स्थायी समितीमध्ये लावा अशी विनंती करते. शहरात, राज्यात कोट्यावधी जुनी घरे आहेत. कधीही अशी घटना घडू शकते. लोक घरे खाली करत नाहीत. त्यासाठी ही मिटींग आहे असे नाही. मघाशी मा.धराडे ताई हेच बोलल्या होत्या. नगरसेवक मा.रामदास बोकड यांनी सुद्धा हेच सांगितले. माळीण गावातील या सगळ्या लोकांना सभागृहाच्या वतीने, सर्व पक्षांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करते व आजची ही सभा मंगळवार दि.०५/०८/२०१४ दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करण्यात यावी अशी सूचना मी मांडते

**मा.शैलजा शितोळे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

**मा.महापौर** - पुण्यातील भिमाशंकर इथे असलेले माळीण गाव इथे झालेल्या दूर्घटनेबद्दल सर्वांनी पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहून सर्व नगरसेवकांनी ज्या-ज्या सूचना मांडल्या, पिंपरी चिंचवड शहरात अशी दूर्घटना झालीतर याविषयी बरेच जण बोलले आहेत, मा.भाऊसाहेब भोईर बोलले. यांच्या भावना लक्षात ठेवून नियोजन करावे. इथून पुढे असे घडू नये यासठी खबरदारी घ्यावी. सर्वांना श्रद्धांजली वाहून आजची सभा मंगळवार दिनांक ५/८/२०१४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ३२</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.१९/७/२०१४ व ४/८/१२०१४ ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक - ०५.०८.२०१४</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.४/८/२०१४ (माहे जुलै २०१४) ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.०५.०८.२०१४ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापु
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
१९. मा.पवार संगीता शाम
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे
२५. मा.आर.एस.कुमार
२६. मा.जावेद रमजान शेख
२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२९. मा.नंदा विकास ताकवणे
३०. मा.नेटके सुमन राजेंद्र
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३४. मा.†›. संदीप गुलाब चिंचवडे
३५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३६. मा.अपर्णा निलेश डोके
३७. मा.अनंत सुभाष को-हाळे
३८. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३९. मा.प्रसाद शेट्टी
४०. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४१. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४२. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४३. मा.शेख अस्लम शैकत
४४. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४५. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४६. मा.मडिगेरी वर्षा विलास
४७. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
४८. मा.सुपे आशा रविंद्र
४९. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५०. मा.अजित दामोदर गव्हाणे
५१. मा.गोफणे अनुराधा देविदास
५२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५३. मा.महेशदादा किसन लांडगे
५४. मा.श्रद्धा बाजीराव लांडे
५५. मा.†›. नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५६. मा.लोंढे शुभांगी संतोष
५७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५८. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५९. मा.पालांडे सुजाता सुनिल
६०. मा.बहल योगेश मंगलसेन

६१. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६२. मा.कदम सदगुरु महादेव
६३. मा.कैलास महादेव कदम
६४. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
६५. मा.वाघेरे सुनिता राजेश
६६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
६७. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६८. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
६९. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७०. मा.काळे विमल रमेश
७१. मा.पाडाळे निता विलास
७२. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७३. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७४. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
७५. मा.बारणे निलेश हिरामण
७६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७७. मा.बारणे माया संतोष
७८. मा.ओव्हाळ शेखर अशोक
७९. मा.यमुनाताई रमणनाना पवार
८०. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८१. मा.कलाटे स्वाती मयुर
८२. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८३. मा.चौंधे आरती सुरेश
८४. मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
८५. मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे
८६. मा.जवळकर वैशाली राहुल
८७. मा.जगताप राजेंद्र गणपत
८८. मा.शितोळे शैलजा बाबुराव
८९. मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९०. मा.प्रशांत शितोळे
९१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
९२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
९३. मा.गायकवाड संध्या सुरदास
९४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
९५. मा.शेंडगे आशा सुखदेव
९६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९७. मा.संजय केशवराव काटे

९८. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
९९. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१००. मा.पाटील सुजित वसंत
१०१. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१०२. मा.लोखंडे गोरक्ष जकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव - आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे, मा.खांडकेकर - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर - मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे - विकास अभियंता, मा.चव्हाण, मा.पाटील - सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.काची, मा.तांबे, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.गलबले, मा.कांबळे - कार्य.अभियंता, मा.कांबळे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.पोमण - संगणक अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे - प्र.अधिकारी (जनसंपर्क) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक- १

दिनांक- ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ई-गव्हर्नन्स/५/कावि/१३/२०१४ दि.१५/०१/२०१४.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६८१ दि.२८/०१/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.४९९ दि. ०५/०७/२०१४

पोलिस आयुक्त कार्यालय परिमंडळ-३ करीता बीट मार्शल व गुन्हे शोधपथक पेट्रोलींग ट्रॅकींग सिस्टीम या संगणक प्रणालीसाठी आवश्यक संगणक यंत्रणा खरेदी करणे बाबतचा खर्च र.रू.16,11,900/-(अधिक कर) सदर संगणक प्रणालीची वार्षिक देखभाल दुरूस्ती पहिले वर्ष पुर्ण झालेनंतर पुढील प्रत्येक वर्षासाठी ररू.3,53,400/- (वार्षिक) निविदा प्रसिद्ध न करता परंतू करारनामा करून थेट पद्धतीने मे.इन्फोटेक सॉफ्टवेअर अँन्ड सिस्टीम प्रा. लि. यांचेकडून करून घेणे तसेच मा.पोलिस उपायुक्त कार्यालय कामकाजाबाबतचे खर्चास

धोरणात्मक बाब असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ६६ मधील अ.क्र.४२ नुसार व कलम ७३ अनुसुची प्रकरण ५ नियम २ (२) परंतुकेनुसार मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यातील भीमाशंकरच्या पायथ्याशी असणारे माळीण गाव अतिवृष्टी झाल्याने व डोंगर खचल्याने पूर्णपणे गाडले गेले. त्यामध्ये गावांतील शेकडो रहिवासी मृत्यूमुखी पडले आहेत तर काही नागरिक अपघातग्रस्त झाले आहेत. निसर्गाच्या सानिध्यात असणा-या या गावावर संपूर्ण शोककळा पसरली आहे. या गावातील कुटुंबेच्या कुटुंबे या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडली आहेत. तर काही कुटुंबातील एखादी व्यक्ती जीवीत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. या दुर्घटनाग्रस्त नागरिकांना सहकार्य करणे ही मानवतेच्या दृष्टीने सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने या भागात आपत्कालीन पथकही पाठविले शासन पातळीवर या दुर्घटनेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून सहाय्य करण्यात येत असल्याने घटनेत प्रत्यक्ष झालेली मानवहानी आणि वित्तहानी मोठया प्रमाणावर असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगरसदस्यांकडून याकामी एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने सदर दुर्घटनाग्रस्त नागरिकांकरीता र.रु.२५ लाख मदत मुख्यमंत्री सहायता निधीस देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला खुलासा पाहीजे की यामध्ये निवीदा न काढता थेट पध्दतीने असे म्हणलेले आहे आणि प्रत्येक वर्षी म्हणलेले आहे. कायमस्वरुपी प्रत्येक वर्षी का? का दोन वर्षे प्रत्येक वर्षी, याला लिमीट टाकली का? याचा खुलासा करावा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, हा जो विषय आहे याला पहील्या वर्षी १६ लाख दयायचे प्रायोगीक तत्वावर. त्यांनी असे सांगीतले पेट्रोलींग ट्रॅकींग सिस्टीम या संगणक प्रणालीसाठी आवश्यक संगणक यंत्रणा खरेदी करणेसाठी, त्यांच सॉफ्टवेअर आहे ज्या ज्या गोष्टी त्यांना इम्प्लीमेंट करायच्या आहेत त्या इम्प्लीमेंट करत असताना आम्ही त्यांच एक वर्षाच कामकाज बघणार आहोत आणि याची वॉरंटी एक वर्षे आहे म्हणून पहील्यावर्षी आम्ही फक्त १६ लाख ११ हजारासाठीच मंजूरी देत आहोत. पुढच्या मेन्टेनन्सला मंजूरी देत नाहीत. त्यांचे एक वर्षाच्या कालावधीत हे काय काम करतात ते बघून काम व्यवस्थीतरीत्या झालेतर आम्ही पुढे देवू मुळ विषयाला मंजूरी आहे, पुढच्या मेन्टेनन्सच्या विषयाला आमची मंजूरी नाही, ही दक्षता घ्यावी. व १६ लाख ११ हजार ९०० च्या खर्चाला आमची मंजूरी आहे. तसेच माळीण गावासाठी २५ लाख व सदस्यांच एक महीन्याचे मानधन दयावे याला मंजूरी असावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५३०
दिनांक - ५/८/२०१४

विषय क्रमांक - १
विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ई-गव्हर्नन्स/५/कावि/१३/२०१४ दि.१५/०१/२०१४.
२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५६८१ दि.२८/०१/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.४९९ दि. ०५/०७/२०१४

पोलिस आयुक्त कार्यालय परिमंडळ-३ करीता बीट मार्शल व गुन्हे शोधपथक पेट्रोलींग ट्रॅकींग सिस्टीम या संगणक प्रणालीसाठी आवश्यक संगणक यंत्रणा खरेदी करणे बाबतचा खर्च र.रू.१६,११,९००/-(अधिक कर) सदर संगणक प्रणालीची वार्षिक देखभाल दुरूस्ती पहिले वर्ष पुर्ण झालेनंतर पुढील प्रत्येक वर्षांसाठी र.रू.३,५३,४००/- (वार्षिक) निविदा प्रसिद्ध न करता परंतू करारनामा करून थेट पद्धतीने मे.इन्फोटेक सॉफ्टवेअर अँन्ड सिस्टीम प्रा. लि. यांचेकडून करून घेणे तसेच मा.पोलिस उपायुक्त कार्यालय कामकाजाबाबतचे खर्चास धोरणात्मक बाब असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ६६ मधील अ.क्र.४२ नुसार व कलम ७३ अनुसुची प्रकरण ५ नियम २ (२) परंतुकेनुसार मान्यता देणेत येत आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यातील भीमाशंकरच्या पायथ्याशी असणारे माळीण गाव अतिवृष्टी झाल्याने व डोंगर खचल्याने पूर्णपणे गाडले गेले. त्यामध्ये गावांतील शेकडो रहिवासी मृत्यूमुखी पडले आहेत तर काही नागरिक अपघातग्रस्त झाले आहेत. निसर्गाच्या सानिध्यात असणा-या या गावावर संपूर्ण शोककळा पसरली आहे. या गावातील कुटुंबेच्या कुटुंबे या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडली आहेत. तर काही कुटुंबातील एखादी व्यक्ती जीवीत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. या दुर्घटनाग्रस्त नागरिकांना सहकार्य करणे ही मानवतेच्या दृष्टीने सर्वांची सामुहिक जबाबदारी आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने या भागात आपत्कालीन पथकही पाठविले शासन पातळीवर या दुर्घटनेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून सहाय्य करण्यात येत असल्याने घटनेत प्रत्यक्ष झालेली मानवहानी आणि वित्तहानी मोठया प्रमाणावर असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका नगरसदस्यांकडून याकामी एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहायता निधीस देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने सदर दुर्घटनाग्रस्त नागरिकांकरीता र.रु.२५ लाख मदत मुख्यमंत्री सहायता निधीस देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.भारती फरांदे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २

दिनांक - ५/८/२०१४

विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/०७/कावि/१५/२०१४ दि.०८/०१/२०१४.

**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७७३ दि.०७/०२/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०२ दि.०५/०७/२०१४

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडे आकारणी दर निश्चित करताना महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सबब, जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करणेत आली असल्याने मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी मा.आयुक्त यांनी आकाशचिन्ह व परवाना विभागाकडील जाहिरातकर व जागाभाडे दरामध्ये सन २०१४-१५ चे दरनिश्चितीसाठी विषय सादर केलेला आहे. विषयपत्राप्रमाणे जाहिरातकरामध्ये कोणतीही वाढ न करता जागाभाडे रक्कमेमध्ये १०० टक्के वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सहकारी, आयुक्तांचा जो मुळ प्रस्ताव आहे त्याला आमची मंजूरी आहे. त्यात दहा टक्के वाढ मागीतलेली आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये काही वेळेला अशी पण परस्थिती येते की ज्या ज्या ठिकाणी जाहीरात येते तेथे बघीतले जाते. १०० टक्के वाढवीलेतर ते उत्पन्न मिळेलच असे नाही. याबाबतीत आम्ही कुलकर्णी साहेबांशी चर्चा केलीतर ते म्हणाले एकदम १०० टक्के वाढ केलीतर ठेकेदार मिळेलच असे नाही. दहा टक्के वाढ केलीतर आपले सर्व पोल जातील आणि योग्य रितीने महापालिकेला उत्पन्नाचे साधन होईल, अनधिकृत बोर्ड कुठे कुठे लावले जातात हा सुध्दा सर्व्हे केला गेला पाहिजे. आता अशी परस्थिती आहे की ज्यांचे दवाखाने, दुकाने असतील तेवढेच बोर्ड काढले जातात परंतु जे जाहीरात करतात त्यांचेवर सुध्दा कारवाई केली पाहीजे, अनधिकृत बोर्ड काढले पाहीजेत. दहा टक्केचा मुळ प्रस्ताव मंजूर करावा शहरात कुठे कुठे अनधिकृत बोर्ड, जाहीरात आहेत ते काढले गेले पाहीजेत मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- आयुक्त यांचे मुळ प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत यावी.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर**- दहा टक्के वाढ करुन हा विषय मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ५३१ विषय क्रमांक - २

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/०७/कावि/१५/२०१४ दि.०८/०१/२०१४.

**२)** मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.५७७३ दि.०७/०२/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०२ दि.०५/०७/२०१४

सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडे आकारणी दर निश्चित करताना महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. सबब जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेप्रमाणे दरवाढ प्रस्तावित करणेत आली असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.साधना जाधव** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -५३२ विषय क्रमांक - ३

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ- १)** मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जनि/कावि/१०/३००/२०१४ दि.२४/०६/२०१४.

२) मा.स्थायी समिती सभा ठ.क्र.७१६६ दि.०८/०७/२०१४

महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९७४ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रात निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करुन त्यावर शास्त्रोक्त पध्दती ने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे तसेच पर्यावरण व वने मंत्रालय भारत सरकार मार्फत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० हे पर्यावरण (संस्था) अधिनियम १९८६ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणा-या नागरी घनकच-याची योग्य ती वर्गवारी करुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून घेतलेल्या अधिकार पत्राप्रमाणे त्याची व्यवस्था करणे जैव वैद्यकिय घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९८ नुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचे कार्यक्षेत्रातील जैव वैद्यकिय कचरा व्यवस्थापन उभारण्यासाठी योग्य ती उपाय योजना करणे बंधनकारक असल्याचे कळविले आहे व त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाने महापालिकेस खालील प्रमाणे अंतिम सुचना दिलेल्या आहेत.

अ. महानगरपालिकेचे सर्व सांडपाणी एकत्रित करुन त्यावर योग्य ती परिपुर्ण प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा बसवून शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.

ब. जो नागरी घनकचरा आपल्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होतो त्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण (जैविक विघटनशील/अविघटनशील) (Biodegradable / Non – biodegradable) आणि पुर्णनिर्माण घनकचरा (Recoverable waste) करुन त्याची विल्हेवाट सांडपाणी पुरवठा स्वच्छता विभाग मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय क्र. घकव्य-१००३/प्र.क्र./६७५/पापु-२२, दि. २६/८/२००३ प्रमाणे योग्य ती भुभरण जागा मान्यता मिळालेल्या ठिकाणी, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० मधील तरतुदीप्रमाणे मे. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठापुढे दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र. १७४०/१९९८ आणि इतर एकत्रित याचिका मधील दि. २/४/२०१३ च्या आदेशाप्रमाणे दिलेल्या विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक आहे.

क. त्यामुळे आपण परिपुर्ण सांडपाणी व्यवस्थापन व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी एकूण भांडवली खर्चापैकी २५% तरतूद करुन या प्रकल्पावर खर्च करावे. जेणेकरुन सदरहु यंत्रणा उभारण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद होऊन कायदेशीर पुर्तता पार पाडली जाईल

ड. सदर निर्देशपत्र महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती व मा. सर्वसाधारण सभेच्या निदर्शनास आणून देऊन त्यांच्या मंजूरीने पुर्तता अहवाल मंडळास ३० दिवसात सादर करावा.

सदर निर्देशपत्र अवलोकन करणेत येत आहे.

**मा.मंदा आल्हाट** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, विषय काय आहे ते समजू दयावा, याचा खुलासा करावा.

**मा.आंबादास चव्हाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडून भांडवली खर्चाच्या २५ टक्के खर्च हा जल प्रदुषण, वायू प्रदुषण, हवा प्रदुषण यासाठी व्हावा असे म्हणलेले आहे. हा अवलोकनार्थ विषय बजेट प्रोव्हीजनसाठी ठेवलेला आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, याच्यामध्ये काय करणार आहेत, विषय कशासाठी आणलेला आहे.

**मा.आयुक्त**- मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह याबाबतीत निदर्शनास आणतो की आपल्याकडे पोल्यूशन कंट्रोल बोर्डाने शहरातील घनकचरा व्यवस्थापन त्याचबरोबर अंडरग्राऊंड ड्रेनेजलाईन टाकून सिव्हेज ट्रिट करतो त्या ट्रिटमेंटसाठी हे जे दोन महत्वाचे विषय आहेत या दोन विषयाला प्राधान्य दयावे. त्या विषयावर एकूण बजेटच्या २५ टक्के खर्च करावा आणि

हाळूहाळू, टप्याटप्याने शहरातील नदयांच प्रदुषण कमी कराव त्यामुळे शहर, स्वच्छ राहील व कच-याची व्यवस्थीत विल्हेवाट लावली जाईल. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाची घनकचरा व्यवस्थापनाची जी नियमावली आहे त्याचा भंग होवू नये याची दक्षता घेण्यासाठीची ही महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्डाची सूचना आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की आपल शहर पर्टीक्यूलरली याच्यावर बराचसा खर्च करतो, पुर्वी हा खर्च १० टक्केच्या आत होता परंतु आता या मागच्या दोन तीन वर्षात १५ ते १६ टक्के खर्च करतो, त्यांना २५ टक्के खर्च करावा असे अपेक्षीत आहे. तोही खर्च कसा करता येईल हे आपण बघूयात. हे विषय महत्वाचे आहेत याला जास्त खर्च केला पाहीजे जेणेकरुन शहरातील नदया, पर्यावरण चांगले राहील. याबद्दलचा हा प्रस्ताव आहे त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की याची आता आपण फक्त नोंद घ्यायची आहे आणि ज्यावेळेला पुढचे बजेट आपण करु त्यावेळेला या १५ ते १६ टक्केमध्ये काही वाढ होवू शकते का, हे पुढे करता येईल. मी इन्डायरेक्टली सर्व सभागृहाला सांगू इच्छितो की आपल्याला सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट, अंडरग्राऊंड सिव्हेज आणि ट्रिटमेंट याच्यावर जास्त पैसे खर्च करता येतील अशीच महाराष्ट्र प्रदुषण बोर्ड व महाराष्ट्र शासनाची अपेक्षा आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझा विषयाला विरोध नाही. शहरासाठी हा चांगला विषय आहे. शहराचे प्रदुषण वाढत आहे. घनकच-याच्या माध्यमातून आपल्या शहरामध्ये अनेक गोष्टी मी दिर्शनास आणून देतो. कारण आपण पुर्वी कचरा हाटाव मोहीम घेतलेली होती. मला आपल्या निदर्शनास अणून दयायच आहे की महाराष्ट्र प्रदुषण बोर्डाचा जो विषय आलेला आहे त्या माध्यमातून कुदळवाडी ही प्रदुषणमुक्त कशी होणार किंवा आमचा काही परीसर आहे हा प्रदुषणमुक्त कधी होईल हा खुप मोठा प्रश्न आहे. दुसरा ड्रेनेज विषय आहे. गेली आठ ते दहा वर्षे पाहतो पाऊस आहे, वाडया-वस्त्यामध्ये, घरात पाणी गेलेले आहे त्याठिकाणी आपली यंत्रणा कमी पडलेली आहे. सर्व नागरीकांच्या घरात पाणी जाते त्या माध्यमातून आपल्याला विनंती आहे. आमचा भाग सखल आहे, लोकांचे जुने घर आहेत पुर्वी काही लोकांनी घर बांधलेली आहेत त्या घराची हाईटस् जी आहे ती रस्त्याच्या खाली गेलेली आहे. माझी आयुक्त साहेबांना अशी विनंती आहे आपण आदेश दिलेतर फार उत्तम हेईल. ती जी जूनी जशी घर आहेत ३१ मार्च २०१२ च्या अगोदरची घर आहेत त्या घरानां आहे त्याच स्थितीमध्ये खालचा मजला पार्कींग करुन किंवा डॅमेज करुन त्याला बांधण्यासाठी परवानगी दयावी. हे केले नाहीतर लोकांच्या घरात पाणी जाणार, आमचा भाग जो आहे तो ग्रामीण भाग आहे. जुने वाडे आहेत, आमची जी जूनी घरे आहेत ती पडणार आहेत. अनधिकृत बांधकाम करावे असे मी म्हणणार नाही. घराची जी साईज आहे त्याच्या करसंकलनमध्ये नोंदी आहेत, तेवढेच घर आहे त्याच जागेवर कुठलीही साईज न वाढविता आहे त्याच स्थितीमध्ये त्या व्यक्तीला बांधु दिलेतर चांगल होईल. लोक दुस-याच्या घरी राहण्यासाठी गेलेले आहेत. ड्रेनेजची घान आहे ती चोकअप झालेली आहे शंभर ते दिडशे घर अशी आहेत की त्याठिकाणी राहणं मुश्किल झालेले आहे. ग्रामीण भागाच्या वतीने माझी ही विनंती राहील. आपण अनधिकृत बांधकाम केले किंवा त्यांनी वीट, वाळू लावलीतर आपण अनधिकृत घोषीत करतो तरी अशा लोकांना वेगळा पर्याय म्हणून त्यांना आहे त्याच

स्थितीमध्ये वेगळ सिस्टमॅटीक पध्दतीने घर बांधु दिलेतर त्यांच्यावर आलेला प्रसंग दुर होण्याची शक्यता आहे. २००७ ला छोटी लाईन टाकलेली आहे. आता नागरीकरण वाढलेले आहे. त्या माध्यमातून प्रत्येक लाईन्स चोकअप झालेल्या आहेत व त्याचे सर्व बॅकवॉटरचे पाणी लोकांच्या घरात जाते. तरी आपण हा विषय आणल्यामुळे यामध्ये लक्ष घालावे, एवढं बोलून थांबतो.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महापौर साहेब, महाराष्ट्र प्रदुषण बोर्डाने आपल्याला काही सूचना अवलोकनार्थासाठी दिलेल्या आहेत अवलोकन करत असताना आपण आपल काम सुध्दा याठिकाणी सांगीतले पाहिजे. सर्व ठिकाणाहुन ओरड होते पिंपरी चिंचवडच्या दुषित पाण्यामुळे पुढच्या गावाना पाणी दुषित मिळते, त्याबद्दल मी माहीती घेतलीतर आपल्या अधिका-याकडून असं कळलं की आपल्याकडे ८० टक्के पाण्यावर आपण प्रक्रिया करतो आणि ते पाणी आपण नदीमध्ये सोडतो. म्हणजे एवढे आपले एसटीपी प्लान्ट आहेत. मग कुठलं दुषित पाणी नदीमध्ये जाते सर्वांनी विचार केलातर आपल्याला समजेल की एमआयडीसी आपल्या शहरात, एकाच भागात असं नाहीतर शहरात मधे मधे सुध्दा खुप उदयोग आहेत आणि त्या उदयोगधंदयाच व एमआयडीसीचे पाणी आहे. मोठमोठया कारखान्यामध्येच एसटीपी प्लान्ट आहेत त्यांचे सुध्दा पाणी आहे. परवा एसकेएफ कंपनीमध्ये मी अधिका-यांना घेवून गेले होते मा.कुलकर्णी साहेबांनी त्यांचे सहकारी पाठविले होते मी त्यांना घेवून गेले होते आणि ते पाणी चेक करुन आणले त्याच्यामध्ये सुध्दा दुषित पाणी सापडलेले आहे. त्याच्यात जे द्रव्य सापडले ते खरोखरच दुषीत पाणी आहे अशा अनेक कंपन्या आहेत की अशा अनेक कंपन्यांचे दुषित पाणी नदीला मिळते मग ती शेरेबाजी आपण का म्हणून घ्यायची, तो दोष आपल्यावर का? आपण अगोदर तीन कोटी दिले आहेत, मागच्या मिटींगमध्ये दुषित पाणी शुध्द करण्याचे यंत्र घेण्यासाठी जिल्हा परीषदेला खर्च देतो, हे आपण सहन का करायचे? एमआयडीसीच्या सोबत आपण संबंधीत अधिका-याशी चर्चा करुन त्यांच्याकडून हे घ्यावे. ना.मा.अजीतदादा पवार यांना सुध्दा आपण सांगूयात की आम्ही एवढे एवढे पाणी ट्रिटमेंट करुन नदीमध्ये सोडतोतर आम्ही का बरं हा भुर्दंड सोसावा? असे आपण ठामपणे सांगायला पहिजेत. साहेब, हे आपल्या लेव्हलला झाले पाहिजे. दुसरं असं की, १९९२, १९९४ व १९९६ च्या दरम्यान आपल्याकडे ड्रेनेजचे पाईपलाईन टाकलेले आहेत ते ब-यापैकी असतील परंतु जे चेंबर्स आहेत त्या चेंबर्सच्या आतले सर्व प्लॅस्टर गेलेले आहे त्यामुळे घुशीचा सुळसूळाट झालेला आहे व मातीचे ढिगच्या ढिग त्यामध्ये जमा होतात चाळीमध्येतर ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी त्याठिकाणी रोज दोन माणस ठेवावे लागतात. अंदाजपत्रकामध्ये आपण यासाठीचा निधी वाढविणार आहोत त्यामध्ये संपुर्ण शहरातील चेंबरचे आतून प्लॅस्टर केलेतर बाकी काम करण्यासाठी सूलभ होईल. याठिकाणी मी सांगीतलेला मुद्दा गांभीर्याने लक्षात घ्यावा आणि आपले काम जे आहे ते थोडसं उजळमाथ्याने होईल असं कराव ही विनंती.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. आयुक्त साहेब आपल्याला मी काल रस्त्याच्या ड्रेनेजच्या कामाच सांगीतलेल होतं, आपण राजन पाटील यांना सुध्दा आदेश दिलेले

होते, त्यांनी काल पासून काय कारवाई केली याचा खुलासा करावा. त्यांनी काल पासून काहीच केलेले नाही.

**मा.राजन पाटील** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. काल ताईनी तक्रार केलेली होती त्याप्रमाणे संध्याकाळी पाच वाजता मी माझे कार्यकारी अभियंता, उपअभियंता, कन्सलटंट आणि ठेकेदार यांच्या समवेत देहू-आळंदी रस्त्याची पाहणी केलेली आहे. पाऊस असल्यामुळे काम करता आलेले नाही. तरी त्याठिकाणी योग्य ते आदेश दिलेले अहेत. तेथील काम लवकरात लवकर करण्यात येईल. त्याठिकाणी थोडी असुविधा झालेली आहे हे मान्य आहे.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, त्याठिकाणी कुठलीच कारवाई झालेली नाही, आम्ही त्याठिकाणीच होतो. आरोग्याला इतक धोकादायक आहे की डेंग्यू, मलेरीयाची साथ चालू आहे. इन्डस्ट्रीअल ऐरीया पुर्ण खाली गेलेला आहे, त्यांना ड्रेनेज लाईन जोडण्यासाठी सुध्दा जागा नाही, शॉपमध्ये पुर्ण पाणी आहे. एमएसईबीचा काही प्रॉब्लेम झालातर त्यांना काम सुध्दा करता येत नाही, लाईट गेलीतर काय करणार, काही जिवीत हानी झालीतर काय करणार, याला जबाबदार कोण आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, यापुर्वी देहू-आळंदी रस्त्याच्या संदर्भात अनेकवेळा चर्चा झालेली आहे. मा.अजीतदादा पवार हे मोईच्या पुलाच्या उदघाटनावेळेस आलेले होते त्यावेळेस आदेश दिलेले होते त्याला एक महीना झालेला आहे. महिन्यानंतरही तीच परिस्थीती आहे. आता स्वाती साने यांनी सांगीतलेले बरोबर आहे, खरोखरच बेकार परिस्थिती आहे. त्याठिकाणी चिखली चौकामध्ये जे वरच पाणी आलेल आहे ते सगळ चौकातून सोडून दिलेलं आहे तेथून जाणारे येणारे नागरीक अक्षरश: नाका-तोंडाला हात लावून जातात एवढी वाईट परिस्थिती असताना मी अनेकवेळा सांगीतले आहे फक्त त्या चिखलीच्या मोईचा पुल ते शेलार वस्ती एवढाच टप्पा आमचा आहे. किती दिवसापासून तो रखडलेला आहे. त्याला काय प्रॉब्लेम आहे, त्याला निधी नाही का? कोणी आडवलेल आहे का? काय अडचण आहे. त्याठिकाणी ड्रेनेज लाईन नाही, साईड गटर नाहीत, रस्ते लहान केलेले आहेत. त्याठिकाणी अतीशय जाण्या येण्यासाठी त्रास होतो. राजन पाटील यांना अनेकवेळा हा विषय सांगीतलेला आहे. काल ते शंभरटक्के गेलेलेच नाहीत, ते खोटं बोलण्यात पोपट आहेत. ते तेथे आले होतेतर मग संबंधीत नगरसेवकांना का सांगू शकलेले नाहीत. ज्या नगरसेवकानी तक्रारी केल्या त्यांना हे का सांगू शकलेले नाहीत. आम्ही काही डोक्यात दगड घालणार होतोत का? परवा आमच्या गावात मयत झाली होती अक्षरश: तेथे जाण्यासाठी सुध्दा रस्ता नव्हता. तेथील वाहतूक कंट्रोल होईना आम्हांला शेवटी चार पोलीस मागवावे लागले. हा मेन चौक आहे सगळे लोक त्या चौकात येतात कुठलीही घटना घडली चांगली-वाईट तर त्या मेन चौकामध्ये लोक जमतात. याच्यावर आम्ही बोलणार नाहीत जे काही परिणाम होणार हे चुकीचे होणार आहेत.

**मा.आयुक्त** - मा.महापौर मॅडम, सन्मा.सभागृह. ही वस्तूस्थिती आहे की आपण देहू-आळंदी हा रस्ता देहू पासून आळंदी पर्यंत जवळपास १५ कि.मी. ३० मीटरचा करतो आहोत. त्यामध्ये जवळपास ७० ते ७५ टक्के काम झालेले आहे. सन्मा.सदस्यांनी सांगीतल्या प्रमाणे चिखली चौकामध्ये काम थोड अपुर्ण आहे, त्याठिकाणी पुल बांधतो आहोत तो पुलही एकत्रीत बांधता

येत नाही त्याचा अर्धा पार्ट अगोदर आपण पहील्या टप्प्यामध्ये करत आहोत म्हणजे त्याची दुसरीकडून वाहतूक सुरु हेईल हे काम पुर्ण झाल्यानंतर तेथील वाहतूक झालेल्या कामाच्या तेथून डायव्हर्ट करुन नंतर उर्वरीत पुल पुर्ण करायचा त्याला वेळ लागेल असे असलेतरी त्याठिकाणी तात्पुरते डांबरीकरण करणे शक्य आहे ते तात्काळ हाती घेवून पावसाळया पुर्वी हे करण्यास हरकत नव्हती. काल पाटील आणि त्यांच्या टिमला सूचना दिलेल्या होत्या ते जावून आलेले आहेत, त्यांनी आपल्याला सोबत घेवून जायला पाहीजे होते याबद्दल काही दुमत नाही. गुरुवारी आम्ही चिखली भागातील घरकुलाला भेट देणार आहोत त्यावेळेला मॅडम, आपल्या सोबत व त्या पथका सोबत मी स्वत: पाहणी करतो. मा.मुख्यमंत्री महोदयांचा कार्यक्रम लागलेला आहे त्यामुळे ती पाहणी गुरुवारी किंवा शुक्रवारी हेईल तरी त्याची वाट न पाहता पाटील साहेबानी तात्काळ त्याठिकाणी जे शक्य आहे ते खड्डे बंद करावेत. त्याठिकाणी चव्हाण आणि त्यांची टिम आहे. तेथील ड्रेनेज एसटीपीला जोडू शकलेलो नाही त्याचे कारण बीआरटीएसचे काम चालू आहे तो ड्रेनेजही करता येत नाही आपल कल्व्हर्ट पुर्ण होण्याची वाट बघावी लागेल. तरी चव्हाण साहेबांना अशी सूचना आहे, ठिक आहे आपले थोडे पैसे खर्च होतील, वाया जातील तरीही ते वाया गेलेले परवडेल आपण तूर्त साईडने ३० मी.वर पाईपलाईन टाकावी, आपण नंतर बघूयात फुटपाथ कसा करायचा आहे ते. परंतु तेही डायव्हर्ट करुन एसटीपीला घेवून जाण्याचा आपला प्रयत्न राहीला पाहिजे. आम्ही गुरुवारी किंवा शुक्रवारी पाहणी करु त्यावेळेला या दोन्ही खात्याने आमच्या बरोबर सोल्यूशनसह यावे अशी अपेक्षा आहे.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, पत्रकार. घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन या संदर्भातील महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार या सूचना अवलोकनार्थ याठिकाणी आलेल्या आहेत. अत्यंत महत्वाचे म्हणजे शहराचे पर्यावरण आणि एकंदरीत नागरीकांच्या आरोग्याच्या संबंधीत असलेला महत्वाचा प्रश्न याठिकाणी आलेला आहे. त्यापुर्वी मा.महापौर ताईना माझी महत्वाची सूचना आहे, यामागे सुध्दा महापौरांना मागणी केलेली होती की महापालिका सभेमध्ये जे प्रश्न विचारले जातात, सर्व नगरसेवक आपल्या भागातील, शहरातील प्रश्न उपस्थित करतात त्याचा निर्णय, निकाल लावण्यासाठी या सभागृहात पाठविलेले असते दुर्दैवाने प्रत्येक सभासद अत्यंत पोटतीडकीने प्रश्न मांडतो, सूचना मांडतो, केवळ याठिकाणी मिनीटस रेकॉर्डींग केले जातात परंतु त्याचा कुठल्याही प्रकारचा निर्णय, कुठल्याही प्रकारची पुढची झालेली अंमलबजावणी ही पत्राव्दारे त्या नगरसेवकाना सांगीतली जात नाही म्हणून जुनेच प्रश्न नव्याने, नव्या उमेदीने आणि उत्साहाने, रागाने, संतापाने पुन्हा एकदा सभागृहात विचारले जातात ही खेदाची गोष्ट आहे. पुन्हा सूचना करतो ज्या ज्या नगरसेवकांनी सूचना मांडलेल्या आहेत त्या सूचनांचे पुढे काय झाले किंवा नाही किंवा प्रोसेसमध्ये आहे हे पत्राने कळवावे अशी सर्व सदस्यांच्या वतीने विनंती करतो. असे केलेतर या सभागृहाचा वेळ कारणी लागेल, तसा आपण आदेश दयावा. संपुर्ण शहराचा कचरा व्यवस्थापन करण्यासाठी मोशी याठिकाणी कचरा डेपो सुरु आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे गेली सतरा वर्षापासून कचरा डेपो अनधिकृतपणे त्याठिकाणी सुरु आहे. त्याची कुठल्याही प्रकारची कायदेशीर परवानगी न घेता

कचरा डेपो सुरु केलेला होता. २००८ मध्ये कचरा डेपो आणि बफर झोन या विषयाचा जी.आर. जाहीर झाला त्याचा प्रस्ताव शासनाकडे अजून सुध्दा प्रलंबीत आहे. म्हणजे अजून सुध्दा मोशी मध्ये बेकयदेशीरपणे कचराडेपो सुरु आहे. त्यावर शासनाने निर्णय घेतलेला नाही. संपुर्ण शहराचा कचरा एकाच भागात, एकाच गावात, एकाच प्रभागात टाकला जातो म्हणजे त्याठिकाणचे नागरीक गेले अनेक वर्षे आरोग्याच्या प्रश्नाशी तोंड देतात. महापौरताई या निमित्तांनी मी एक सूचना करतो, ज्या पध्दतीने आपण आपल्या कामकाजा संदर्भात सहा प्रभागाची निर्मिती केलेली आहे. हे करत असताना आपण प्रभागनिहाय हे कचराडेपो सुरु करावेत कारण संपुर्ण शहराचा कचरा एकाच ठिकाणी टाकला जातो म्हणजे हा तेथील नागरीकांवर केलेला अन्याय आहे. तो रोखण्यासाठी, त्या लोकांना न्याय देण्यासाठी समान पध्दतीने कचरा डेपो प्रभागनिहाय सुरु करावा. पुनावळे मध्ये सुध्दा वन खात्यास पैसे भरुन त्याठिकाणी नवीन कचरा डेपो निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या अधिन आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण न येता हा कचरा शहरामध्ये संपुर्ण ठिकाणी ज्या परीसराचा कचरा आहे त्याच परीसरात व्यवस्थापन झाले पाहीजे, दुर्दैवाने ते होत नाही. विशिष्ट लोकांवर अन्याय केला जातो त्यामुळे या व्यवस्थापनामध्ये आपण अत्यंत कमी आहोत हे याठिकाणी सांगण अत्यंत गरजेच आहे आणि हा घनकचरा प्रकल्प राबवीत असताना मोशी कचरा डेपोमध्ये दरवर्षी कोटयावधी रुपये खर्च करतो परंतु तेथील कचरा डेपोचे जे पाणी आहे जो काही पाण्याचा निचरा आहे तो संपूर्ण इंद्रायणी नदीला आजही जातो. महापौरताई, आयुक्त साहेब आपण आताही चला, मी तुम्हांला दाखवतो की, मोठया प्रमाणामध्ये विषारी वायूमिश्रीत काळे पाणी आजही त्याठिकाणी इंद्रायणीमध्ये मोठया प्रमाणमध्ये जाते म्हणजे इंद्रायणीच प्रदुषण करायला आपण कुठेही मागे-पुढे पाहत नाहीत हे अत्यंत चुकीचे काम आपल्या महापालिकेकडून होतयं. आपण त्याठिकाणी जो खर्च करतोय तो खरंच कामाला येतो का? याची चौकशी झाली पाहीजे. त्या कचरा डेपोमध्ये बीव्हीजी संस्था काम करते. सगळा कचरा त्याठिकाणी एकत्रीत केला जातो. ओला, सुका कचरा, सर्व प्रकारचे साहित्य त्याठिकाणी नेलं जात. हॉटेलींगचा कचरा, सर्व प्रकारचा कचरा वर्गीकरण न करता एकत्रीत त्याठिकाणी पठवितो त्यामुळे त्या परीसरात मोठया प्रमाणात आरोग्याचे प्रश्न निर्माण होतात. पुण्याच्या कचरा डेपोमध्ये ज्याप्रमाणे कचरासंकलन केंद्र जागोजागी निर्माण केलेले आहेत, त्या कचरा संकलन केंद्रामध्ये बायोगॅस प्रकल्प निर्माण केलेले आहेत त्यामुळे आपण याठिकाणी आरोग्याच्या दृष्टीने कमी काम करतो पर्यायानं पर्यावरण खात्यानं याकडे लक्ष देवून या कामाला गती देण्याची गरज आहे. म्हणून आपण त्याठिकाणी बायोगॅस सारखे प्रकल्प, कचरा संकलन केंद्र, की ज्या ठिकाणी कचरा वर्गीकरण केला जातो आणि त्या त्या पध्दतीने कचरा त्याठिकाणी पाठविला जातो ती व्यवस्था केली पाहीजे. सांडपाण्याच्या व्यवस्थेबद्दल दत्ता साने यांनी सांगीतले. इंद्रायणी नदी आहे त्या नदीचे प्रदुषण करण्याची एकही संधी सोडत नाहीत अत्यंत दुर्दैवी म्हणजे आपण आळंदी तीर्थक्षेत्र मानतो आणि मोठया गमजाव करतो की महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र आमच्या हद्दीमध्ये आहे. परंतु परस्थिती किती गंभीर आहे आजही तेथील पाण्याबद्दल प्रदुषण नियंत्रण मंडळाने अनेक पत्र महापालिकेकडे पाठविलेले आहेत. जर आपण आपल पाणी त्याठिकाणचे थांबविण्याचे बंद केले नाहीतर महापालिकेवर फौजदारी करण्याचा इशारा दिलेला आहे तरी सुध्दा आपण डोळे उघडलेले नाहीत. हा कायदयाचा भाग

सोडला आणि एक नैतीकतेच्या दृष्टीने विचार केलातर हे आपले काम आहे. तळवडे, चिखली, मोशी या परीसरातून सर्व सांडपाणी त्याठिकाणी नदीमध्ये जाते आणि म्हणून ज्याठिकाणी असे पाणी जाते त्याठिकाणी छोटे छोटे एसटीपी प्लान्ट निर्माण केले पाहीजेत. त्या खात्याने हे काम केले पाहीजेत, त्याचा आराखडा तयार केला पाहिजे. दुर्दैवाने हे काम त्या खात्यातील कुठलेही माणस करत नाहीत. आपण आदेश दिले पाहिजेत. दुसर इंद्रायणी प्रदुषण होण्याच जे काम आहे ते हायसिंथ, मोठया प्रमाणात जलपर्णी त्याठिकाणी निर्माण होते परंतु दुर्दैवाने डिसेंबर महीन्यामध्ये पाणीप्रवाह शांत झाल्यानंतर डिसेंबरनंतर जलपर्णी वाढायला सुरु होते आणि प्रचंड रौद्र रुप धारण करुन उन्हाळयामध्ये मोठया प्रमाणात मच्छर तयार होतात व त्याठिकाणी आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. हे आरोग्याचे प्रश्न चिखली-तळवडे पासून मोशी च-होली पर्यंत निर्माण होतात. महापालिकेच्या वतीने आपण जे काही हायसिंथ काढण्याचे टेंडर देतो दुर्दैवाने ते टेंडर वेळेत काढले जात नाही पावसाळा तोंडावर आल्यानंतर जाणून-बुजून टेंडर काढले जाते आणि फक्त काम दाखविले जाते आणि उरलेली हायसिंथ पावसाच्या पुराच्या पाण्यामध्ये वाहून जाते व त्या ठेकेदारांचे बील दिले जाते. आयुक्त साहेब आपण सुध्दा या प्रकरणाची कसून चौकशी करावी, हे नेमक दरवर्षी आसं का घडतंय याची आपण चौकशी करा. या महत्वाच्या सूचना याठिकाणी करतो या माझ्या सूचनांचा विचार करावा आणि याचा संपुर्ण खुलासा करावा असे सांगतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.साधना जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कृष्णानगरमध्ये जलशुध्दीकरण केंद्र आहे त्यातून जे पाणी येते ते सर्व पाणी घरकुल योजनेतून नेवाळे मळा, डी.वाय.पाटील कॉलेज जवळ साठते व तेथील सर्व घरामध्ये पाणी जाते. दर पावसाळयामध्ये ही परिस्थिती चालू असते. या पाण्याची तुम्ही काय विल्हेवाट लावता. कृष्णानगर जलशुध्दीकरण केंद्रामधुन पाणी जे निघते त्याची आतापर्यंत काय योजना केलेली आहे. सर्व शेतीमध्ये पाणी साठलेले आहे. शेतक-यांचे हाल झालेले आहेत. माती वाहून गेलेली आहे, लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे. लोकांना घरातून बाहेर निघता येत नाही, याच्यावर काहीतरी करावे आणि कुदळवाडीमधुन जो रस्ता गेलेला आहे त्याठिकाणी विसावा हॉटेलच्या जवळ चेंबर आहे त्यातून पाणी चाललेले आहे रस्त्यामध्ये खडी टाकलेली होती ती पुर्ण वाहून गेलेली आहे. तेथून गाडी चालविण मुश्किल झालेल आहे. सर्व देहू-आळंदी रस्त्याचे ते पाणी ओढयामध्ये चालेले आहे. त्याठिकाणी काही घटना झालीतर ती पाहू शकणार नाहीत एवढी अवस्था झालेली आहे. यावर कार्यवाही लवकरात लवकर झाली पाहीजे व जल शुध्दीकरण केंद्रातून पाण्याचा निचरा कसा करता येईल हे बघावे.

**मा.शारदा बाबर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझ्या प्रभागामध्ये एक झोपडपट्टी असल्यामुळे तेथील जेवढे सांगावे तेवढे कमीच आहे. चेंबर, नाले तुडूंब भरुन वाहत आहेत. आतून घुशी जातात, ज्यांना आतून प्लास्टर करण्याचे काम दिलेले आहे त्यांच्या क्वॉलीटीची चौकशी करावी व घुशी कमी होतील हे बघावे. उघडया गटारावर औषध फवारणी करता येईल का याचा विचार करावा. आतून प्लॅस्टर चांगल्या क्वॉलीटीचे करावे अशा सूचना द्याव्यात, धन्यवाद.

**मा.आशा शेंडगे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पत्रकार बंधु. आपले जे बजेट आहे त्याच्या २५ टक्के खर्च घनकचरा व्यवस्थापनावर करावा हा चांगला विषय आहे. शहराचे प्रदुषण दिवसेंदिवस वाढते आहे, लोकसंख्या वाढते त्यामुळे पर्यायाने प्रदुषण वाढते. त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे परंतु आपण त्यामध्ये कुठेतरी कमी पडतोत. मागच्यावेळेस सांगीतल होत की आपल्या शहरामध्ये आपल्या येथे ५२ एस.आय.पद मंजूर आहेत व त्यातील ११ एस.आय. ची पदे भरलेली नाहीत. असे असेलतर कचरा उचलण्याची व्यवस्था कशा पध्दतीने करणार आहोत. ६४ प्रभाग आहेत व ३८ एस.आय. कसे काम करतील व त्यातील दोन ते चार एस.आय. गैरहजर असतात. तर ३० ते ३४ एसआय ६४ प्रभागाची व्यवस्था कशी करणार. अनेकवेळा कचराकुंडया ओसांडून वाहतात सध्या पावसाळयाचे दिवस आहेत, अशा वेळेसतर अत्यंत घाणीचे साम्राज्य शहरात पसरलेले असते. दुसरा महत्वाचा भाग म्हणजे ड्रेनेज व्यवस्था जी आहे ती पावसाळा आला की, तुमच विधान पेपरला वाचल पाऊसच एवढा पडला, अचानक पडला, असे म्हणणे योग्य नाही. पाऊस तुम्हां-आम्हांला सांगून पडणार नाही. आपली व्यवस्था अशी पाहीजे की काहीही झाल, आभाळ फाटलतरी ते आम्ही शिवल्यानंतर आमची व्यवस्था चांगली ठरेल. परंतु असं न करता तुम्ही जे पेपरमध्ये विधान केल की पाऊस एवढा पडत आहे परंतु यावर्षी पाऊसाची अवस्था फार पडला वगैरे असा विषय नाही. आपल्याला माहीती पंधरा दिवसापुर्वी पाणी नाही अशी आपली सर्वांची ओरड होती त्यामुळे खरंतर दिड महीना पाऊस उशिरा झाला असल्या कारणाने आपल्या अधिका-यांनी जे काही ड्रेनेज, सांडपाण्याचे व्यवस्थापन पाहतात त्यांनी त्यावेळेत हे व्यवस्थापन चांगले पहायला हवे होते. अनेक सदस्य याठिकाणी विचार मांडतात. चेंबरच्या आतून प्लास्टरचा विषय आहे दोन पाईपलाईन जोडले मध्ये चेंबर आहे त्यात घुशी जातात हा विषय आहे, सगळे सदस्य सांगतात त्यातले कही जुने आहेत त्यांचा अभ्यास आहे. परंतु अधिकारी जे आहेत ते वर्षभर त्याच ठिकाणच त्याच पध्दतीच काम पाहत असतात. त्यांना साध्या गोष्टी कळत नाहीत का, की चेंबरच्या आजूबाजूला चेंबरमध्ये गॅस निर्माण होतो. प्लॅस्टर निघते त्यास प्लॅस्टर केले पाहीजे. मग पर्यायाने सहा महीन्याला केले पाहीजे का वर्षाला केले पाहीजे त्यावर उपाययोजना शोधल्या पाहीजेत. शहरातील कोणत्याही भागात जा चेंबर्सचे झाकण उघडा त्याठिकाणी ७५ टक्के चेंबरची लाईन जी आहे ती मातीने किंवा कच-याने भरलेली असते. ड्रेनेज व्यवस्थापन केलेले आहे त्याची साफसफाई करण्याचे काम ज्या ठेकेदारांना दिलेले आहे त्यांच्याकडून योग्य पध्दतीने काम करुन घेण्याची जबाबदारी प्रशासनाची असते परंतु त्याकडे दुर्लक्ष केल जात ही शोकांतीका आहे. त्याठिकाणची घाण काढून घेण्याची जी मशीन असते किंवा जेट मशीनचा चांगल्या पध्दतीने प्रभावीपणे उपयोग करत नाहीत त्यामुळे ड्रेनेजच्या चेंबरमध्ये घाण साठलेली असते पर्यायाने घुस, झुरळ या सगळयाच साम्राज्य आपल्या शहरावरती राहत. चौकोनी चेंबर, गोल चेंबर याचे काय नाटक आहे ते अगोदर शोधा आणि आम्हांलाही सांगीतल पाहीजे नेमक काय केल पाहीजे. चौकोनी चेंबरवाले म्हणतात की गोलला जोडल्यामुळे बॅक पाणी मारत, त्यांनी म्हणायच की चौकेनी गोलला जोडल म्हणून आमची आठवण येते. त्याच्यावर सोक्ष मोक्ष लावावा. तुमचे परमीशन घेतल्या शिवाय ते जोडली जाते का? ड्रेनेजचे पाणी आणि घराचे सांडपाणी याचे एकत्रीकरण करतो. मैला सुध्दा शहरातल्या अनेक ड्रेनेज मधुन बाहेर आलेला असतो. बेस्ट सिटी ॲवॉर्ड घेतो ते घेत असताना या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

मागच्या स्थायी समितीला हा विषय झालेला होता की कच-याच्या बादल्या पुर्ण शहराला देणार त्या आजपर्यंत दिलेल्या नाहीत. त्या ठेवून ठेवून कुजवायच्या का, काय तुमच धोरण आहे. ट्रेनिंग देणार म्हणून सांगीतल होत. लोकांना सांगीतले पाहीजे ओला कचरा व सुका कचरा वेगळा करावा. विषय मंजूर होवून एक वर्ष झाले तरी आमच्या नागरीकांना या बादल्या का मिळालेल्या नाहीत याचा खुलासा करण्यात यावा. त्याचप्रमाणे कारखान्याचे जे पाणी आहे, आऊट लेट असत त्याच्यावर कंट्रोल कोणाचे आहे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे का अन्य कोणाचे आहे याचा खुलासा करावा.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. याठिकाणी आयुक्त साहेबांच पहील्यांदा अभीनंदन करतो, अभीनंदन याकरिता करतो की दोन तीन दिवसा पुर्वी खुप मोठया प्रमाणात पिंपरी चिंचवडला पाऊस झालेला आहे त्यामुळे ड्रेनेज व्यवस्था कोलमडून गेलेली होती आमच्या भागामध्ये अक्षरश: गुडघाभर पाणी लोकांच्या घरात होते. अक्षरश: लहान मुल असतील, महीला असतील ते त्या पाण्यात रात्रभर थांबलेल्या होत्या परंतु सुट्टीचा दिवस असून आयुक्तांना फोन केल्याबरोबर त्यांनी त्याठिकाणी फायरस्टेशनचे दोन पंप लावले व पाणी बाहेर काढण्यासाठी खुप मोठी मदत केली. रात्री ११.३० ते १२.०० वाजता जेसीबी उपलब्ध करुन दिला. दुस-या दिवशी सकाळी ६.०० वाजता मोठया प्रमाणात यंत्रसामुग्री उपलब्ध करुन दिली. त्याबद्दल त्या लोकांच्या वतीने, माझ्या वतीने आयुक्त साहेबांचे अभीनंदन करतो. आयुक्त साहेब याठिकाणी आपण चांगला विषय मांडला आहे एकूण भांडवली खर्चाच्या २५ टक्के रक्कम आपण या ड्रेनेज व्यवस्थेसाठी उपलब्ध करुन देतो. मला याठिकाणी असे सांगायचे आहे की एवढा खर्च आपण जो करतो तो योग्य रितीने व्हावा, त्याच कारण असं की ऐनवेळेस ड्रेनेजलाईन जाम झाल्या आणि त्याठिकाणी पाहीलतर घराची संख्या किती, पाईपलाईन टाकतो त्याची कपॅसीटी किती याचाही विचार केला पाहीजे. घराची संख्या खुप मोठया प्रमाणामध्ये आणि पाईपची साईज लहान असते. त्याची कपॅसीटी किती हे आपले अधिकारी चेक करतात का नाहीत हे माहीत नाही. चुकीचे पाईप टाकल्यामुळे हा प्रश्न गंभीरपणे निर्माण होतो. चौकोनी चेंबर, गोल चेंबर असे सांगीतले जाते व चुकीच्या पध्दतीने लाईन जोडल्या जातात. स्ट्रॉर्म वॉटरची लाईन ब-याच ठिकाणी नाही. पावसाळी गटरला ते जोडले जातात त्यामुळे ते भरले जाते. आपण साफसफाईची निवीदा काढतो त्याच्यामध्ये मोठा संशय वाटतो. ते लोक किती देतात त्याचे आपण पेमेंट करतो. झोपडपट्टीचा फार मोठा भाग आपल्याकडे आहे. त्याठिकाणी ठेकेदार उपलब्ध नसतो, अशा ठिकाणच्या ठेकेदाराला ब्लॅकलीस्ट टाकावे. याबाबत कार्यकारी अभियंता यांनाही फोन लावलेले आहेत, छोटया छोटया कामासाठी फोन लावावा लागतो. कुठेतरी त्या लोकांवर वचक असावा. प्रत्येक ठिकाणी फोन केलातर एक चर मारायचा असे चाललेले आहे. आम्ही पत्र दिलेले आहेत. पावसाळयापुर्वी सर्व ड्रेनेजलाईनची साफसफाई करावी परंतु ते झाले का नाही याकडे कोणीही लक्ष देत नाही. शेवटी पावसाळा आल्यानंतर आपली ही व्यवस्था कोलमडून जाते आणि सर्वच ठिकाणी हा ताण येतो. स्ट्रॉर्म वॉटरची लाईन पावसाळयापुर्वी केली पाहीजे. ऑलरेडी त्याठिकाणी पाईप आणून टाकलेले होते. रेल्वे अधिका-यांनी त्यांच्या हद्दीमध्ये येते म्हणून ते आडवीले होते त्याला चार महीने झाले. त्याची परमीशन

लवकरात लवकर मिळालीतर आपला पुढचा धोका कमी होऊ शकेल. तरी त्याबाबतीत आपल्या अधिका-यांनी त्याचा फॉलोअप करणे आवश्यक आहे. धन्यवाद.

**मा.भारती फारांदे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र पदुषण मंडळाचा जल आणि घनकचरा संदर्भात विषय आहे. हा विषय प्रत्येकाच्या जिव्हाळयाचा आणि खुपच चांगला आहे. घनकच-याचा जसा पुण्यामध्ये प्रॉब्लेम आहे की कचरा हा कोठे टाकायचा, प्रत्येक जण म्हणतो आमच्या हाद्दीमध्ये नको वगैरे चाललेल आहे. आपल्याकडे हा विषय योग्य वेळी आलेला आहे. नेहमीच येतो पावसाळा अस म्हणायला येथे वाव राहणार आहे. आताजर आपण योग्य प्लॅन केला, जस आता दत्ता काकानी सांगीतल आहे किंवा धनंजय आल्हाट यांनी सांगीतल आहे घनकचरा जो आहे, आता जसं आपण काही बांधकामाला परमीशन देतोत त्याच्यामध्ये कारपार्कींग घराच्या खाली करायच आणि ग्राऊंड प्लस वन, टू, थ्री याप्रमाणे प्लॅन पास करतो त्याप्रमाणे घनकचरा तुमच्याच जागेमध्ये एका बाजूला ठेवता आलातर त्याला जास्त उद्दूक्त करावे. त्यामुळे काय होईल आपल्या पिंपरी चिंचवडचा दहा ते वीस टक्केतरी कचरा त्या त्या सोसायटीमध्ये, त्या त्या बंगल्यामध्ये कसा जिरवता येईल किंवा इतर काही तत्सम प्लॅन करता येतील तेथे हे करावे आणि जे लोक असं करतील त्यांना टॅक्स मध्ये आपण कन्सेशन दयावे किंवा आणखी काही फॅसीलीटी देता आलीतर दयावी जेणेकरुन आपल्या पिंपरी चिंचवडचे लोक उद्दूक्त होतील. हा घनकचरा आपआपल्या घरातील भाजीचा असतो, नाराळाचा असतो तो आपआपल्या जागेमध्येच कसा जिरवता येईल याद्दष्टीने लोकांना प्रमोट करुन टॅक्समध्ये कन्सेशन देण्याचा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे सांडपाणी जे आहे ते आमच्या प्रभागामध्ये बिल्डींग खाली गेलेली आहे आणि रस्ते वर आलेले आहेत आणि तेथे पाणी खुप साठलेल आहे. खालच जे घर आहे तेथेच डीपी बॉक्स आहे त्यामुळे तेथील लोकांना पाण्याची मोटर लावून पाणी बाहेर काढाव लागत. आपण प्लॅन करणार आहोत त्यामध्ये हे सुध्दा घाला की, जसं काकानी सांगीतल की त्यांना वर बांधु दयायच आणि खाली पार्कींग करायची किंवा रस्ते खोदून हाईट कमी करता येईल का किंवा पार्कींग करता येईल का त्याद्दष्टीने बघावे. सर्व प्राधिकरणामध्ये सुध्दा ड्रेनेज ब्लॉक झालेले आहेत तरी त्याद्दष्टीने काय उपाययोजना करता येतील त्या कराव्यात, धन्यवाद.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, मा.सभागृह. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने ज्या सूचना दिलेल्या आहेत तो विषय आणलेला आहे. परवाच आमच्या वॉर्डात बोपखेलमध्ये डेंग्यूचा पेशंट सापडला म्हणून जो काही गोंधळ झाला तो आज आपण पाहीला असेल. आमची विनंती अशी आहे की आरोग्य विभागाचे जे लोक आहेत त्यांना माहीती असतं की पाणी कुठ साठलेल आहे, कुठं आपण औषध फवारणी केली पाहीजे. कुठे मोठे गटर आहेत, कुठे चेंबर्स आहेत, कुठे रिकाम्या जमिनी आहेत की जीथं दलदल झालेली आहे परंतु तीथं कार्यवाही होत नाही, त्याठिकाणी औषध फवारणी होत नाही. पुर्वीचे आयुक्त परदेशी साहेब असताना महापालिकेचे कामकाज अत्यंत काटकसरीने चाललेले होते ती काटकसर आता ठेवू नका अशी आमची विनंती आहे. औषध फवारणीचे जे प्रमाण आहे ते पावसाळयामध्ये वाढविले पाहीजे हे प्रमाण वाढविले तरच लोक आजारी पडणार नाहीत. औषधाचे प्रमाण वाढवित

असताना ब-याचशा रिकाम्या जागा आहेत, त्या खाजगी जागा आहेत परंतु त्या जागेमध्ये पाणी खुप साठलेले असते, दलदल असते, चिखल झालेला असतो आणि तो जागा मालक त्याठिकाणी काही करत नाही. ती जागा तशीच ओपन असते पण ज्या मालकाच्या जागा आहेत त्यांना पण नोटीस काढल्या पाहीजेत. त्या जागेचा तुम्ही बंदोबस्त करा ही जी दलदल झाली याला कारणीभूत कोण? हे पाहीले पाहीजे. आपण ड्रेनेज लाईन आणि ओपन गटर या एकत्र जोडल्या असल्यामुळे सर्व शहरात अडचणी निर्माण होतात. पुणे महापालिकेत पाहीलेतर गटर आणि ड्रेनेज लाईन वेगळया आहेत. परंतु आपल्या महापालिका हद्दीमध्ये ब-याचशा ठिकाणी ओपन गटार आणि ड्रेनेज लाईन एकमेकाला जोडलेल्या आहेत त्यामुळे ओपन गटारामधला कचरा ड्रेनेजमध्ये जातो आणि ड्रेनेजमध्ये तो कचरा साठतो व ती लाईन फुल होते आणि त्या ड्रेनेजमधीला कचरा पुढे जात नाही. त्याचे कारण त्याठिकाणी कचरा अडकून राहतो. माझ्या अगोदर सदस्यांनी सांगीतलेले आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे की, त्या ड्रेनेजलाईनमधल्या तारा निघालेल्या असतात. तारा निघालेल्या, अर्धे तुटलेले पाईप. मुळात ड्रेनेजची लाईन टाकत असतानाच पाईप टाकले जातात त्याच्या खाली काँक्रीट नसतं त्यामुळे घुशी जमिनीतून येवू शकतात त्या तारा कट केल्यानंतर मग कचरा पुढे जातो व तारा तशाच असतात. आतमधुन चेंबरला प्लॅस्टर नसतं त्यामुळे या ज्या गोष्टी आहेत या गोष्टी गांभीर्याने घेत नाहीत तोपर्यंत हा प्रॉब्लेम सुटणार नाही. तुम्ही इंजिनीअरवर, ठेकेदारावर कारवाई करा. एक वेळ कारवाई करा, तरच हे काम व्यवस्थीत होणार आहे. दोन महीन्यापुर्वी क प्रभाग मध्ये मिटींग घेतली त्यावेळेला हाच ड्रेनेजचा विषय होता आणि तुम्ही आम्हांला शब्द दिला होता की पावसाळयामध्ये कुठेही पाणी साठणार नाही, लाईन स्वच्छ करुन घेवू असे सांगीतले होते आणि आम्ही तुम्हांला सांगीतले होते की साहेब, असं होणार नाही, काटे साहेबांनी सांगीतल आहे. माझ्या वॉर्डात सुध्दा नदीच्या कडेचा जो भाग आहे तेथील ड्रेनेज मधुन पाणी घरात येते, ते बाथरुममधुन पाणी घरामध्ये येतं. ते घर अर्ध्या भींती पर्यंत ड्रेनेजच्या पाण्यान भरतं. त्यामुळे या लाईन वेगळया झाल्या पाहीजे. यासाठी दोन, तीन, पाच वर्षाचा कालबध्द कार्यक्रम ठरवावा. पहील्या वर्षामध्ये किती टक्के काम करायच, दुस-या वर्षामध्ये कुठल्या चाळी घ्यायच्या हे तुम्ही ठरवा आणि लोकांना सांगावे व पाच वर्षानंतर हा प्रॉब्लेम सुटला पाहीजे नदी किनारी भींत असली पाहीजे. माझी मागणी ब-याच वर्षापासून आहे, ते काम का थांबलेले आहे हे माहीती नाही. ते काम सुरु करावे. दरवर्षी तो एसएमएस आम्हांला येतो, एवढे एवढे क्यूसेक्स पाणी सोडले आहे तुम्ही जावून लोकांना सांगा. मग तेथील भींत बांधण्याचे काम केले पाहीजे हे सुध्दा काम महत्वाच आहे. शासनाच्या नियमानुसार आज सुध्दा चेंबरमध्ये त्या माणसाला उतरवून ती ड्रेनेजलाईन साफ करावी लागते. या अटी शर्ती आहेत परंतु वस्तुस्थिती अशी आहे की त्या चेंबरमध्ये उतरल्याशिवाय त्या लाईन्स क्लेअर होत नाहीत त्यामुळे त्याबाबत कायमचा असा उपाय करावा अशी विनंती राहील. मंगलाताई कदम महापौर असताना जर्मनीमध्ये आम्ही सगळे गेलो होतो तेथे †मस्टरडॅम या सिटीमध्ये त्या शहराचे सगळ पाणी, ड्रेनेजचे पाणी, शहराच्या बाहेर एकत्रीत ते जमा करत होते आणि त्या ठिकाणी मैला फक्त रहायचा तो मैला एका टाकीमध्ये होता, त्यानी आम्हांला टाकी दाखवली पाणी बाजुला काढले पण मैला टाकीमध्ये होता त्या शहरात ड्रेनेजचे पाणी वर आलेले जाणवत नाही, कुठही पाणी साठलेल दिसत नाही. त्या टाकीमध्ये फक्त मैला होता. त्या अधिका-यांनी

सांगीतले या टाकीमधील गाळ बाहेर काढून तो बघीतलातर ज्याच्या कुणाच्या बाथरुम मधील सेफ्टीपीन जरी पडलेली असेलतर ती याठिकाणी सापडते. म्हणजे इतक क्लिअर त्यांच काम आहे. त्या लाईन्स शहरात कुठेही डॅमेज झालेल्या नाहीत. जस आपण पिण्याच्या पाण्याच्या लाईनची काळजी घेतो ती कुठ लिकेज झालीतर ताबडतोब दुरुस्त करतो त्याप्रमाणे दुरुस्ती ड्रेनेजच्या लाईनची सुध्दा केली पाहीजे. त्या शहरात इतक सूंदर काम होऊ शकत मग आपल्या शहरात का होऊ शकत नाही. जरी हे शहर वाढणार असलंतरी ब-या पैकी अनधिकृत बांधकाम आता होत नाहीत. आपल्या शहराचा जो ऐरीया आहे ज्या झोपडपट्या आहेत ज्या कॉलन्या आहेत त्याचे सर्व्हे करुन तुम्ही कालबध्द कार्यक्रम आखावा व त्याच्यामध्ये हे ड्रेनेजचे प्रश्न असतील त्यावर आपण उपाय करु शकता. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे जी कचरा वाहतूक आपल्या शहरामध्ये होते, परवा माझ्या वॉर्डात कचरा गाडी आली, तीन दिवस एकाच ठिकाणी कचरा होता, कारण काय सांगीतलेतर त्या रस्त्यामध्ये वाळू पडली म्हणून गाडी आली नाही, ती वाळू कोणाची आहे, त्यांच्यावर कारवाई का झाली नाही, ज्यांनी कोणी टाकली त्यांच्यावर कारवाई करा. त्या तीन दिवसात तो कचरा लोकांच्या घरात गेला होता. त्या तीन दिवसामध्ये अनेक रोग तेथे निर्माण होऊ शकले असते. आयुक्त साहेब, तुम्ही काम करता, तुम्ही आम्हांला समजावून सांगता ते आम्हांला बरं वाटत परंतु आयुक्त म्हणून कडकपणा अधिका-यांवर पाहीजे, स्पेशल तुम्हांला सांगायचं म्हणजे आरोग्य विभाग आहे व दुसर म्हणजे ड्रेनेज विभाग आहे, ड्रेनेजच काम सुध्दा चांगल्या पध्दतीन पुर्ण करा अशी आमची विनंती आहे औषध फवारणीचे प्रमाण वाढवा अशी विनंती करते, धन्यवाद.

**मा.कैलास थोपटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सर्व नगरसेवक, नगरसेवीका व पत्रकार बंधु. आज याठिकाणी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने सूचना दिलेल्या आहेत, खरोखरच खुप चांगला विषय आहे. आपल्या शहरात वीस-पंचवीस वर्षापुर्वी ज्या ड्रेनेज लाईन झालेल्या आहेत, त्यावेळेसची लोकसंख्या बघीतलीतर त्याच्या दहा पटीने लोकसंख्या आता वाढलेली आहे म्हणून नेहमीच उन्हाळा, पावसाळयामध्ये त्या लाईन चोकअप होवून नागरीकांच्या घरामध्ये पाणी साठले जाते, टॉयलेटमध्ये पाणी साठले जातं, आमच्याकडे अनेक तक्रारी येतात. आम्ही अधिका-यांना सांगीतल्यानंतर आपण जे काही टेंडर दिलेले आहे, ते टेंडर दिल्यानंतर त्या ठेकेदाराकडे जे काही कर्मचारी असतात ते कर्मचारी कमी असतात. आज तक्रार केलीतर दोन ते तीन दिवस ती तक्रार पुर्ण होत नाही. प्रत्येक प्रभागाला कर्मचारी नेमून दिले पाहीजे. चार-चार प्रभाग मिळून तीन ते चार मजूर असतात आपण त्यांना तेवढी रक्कम देतो मग त्या पध्दतीने कर्मचारी ठेवले पाहीजे, त्या पध्दतीने त्यांच्या ज्या गाडया असतात त्या ठेवल्या पाहीजे. गाडीची मागणी केलीतर चार-चार दिवस मिळत नाही. मग ठेकेदार कशाला पोचायचे यावर आयुक्त साहेब आपण लक्ष दयावे व ती यंत्रणा लवकरात लवकर मिळेल याकडे आपण लक्ष दयावे. तसेच आपण ज्या काही जुन्या लाईन टाकलेल्या आहेत, आपण प्रत्येक वर्षी प्रत्येक प्रभागाला जास्तीत जास्त २५ ते ३० लाखाचे बजेट देतो. त्या बजेटमध्ये मेन्टेनन्स सुध्दा होत नाही. ज्येष्ठ नगरसेवीका शमीम पठाणताई यांनी सांगीतलेले आहे खरोखरच प्रत्येक चेंबर खोललेतर आतमधले सर्व विस्कळीत झालेले आहे. दोन-चार वर्षानी ड्रेनेजच्या यंत्रणेचे काय होईल टोटल सर्व शहरात ती विस्कळीत होणार आहे याकडे आयुक्त साहेब गांभीर्याने लक्ष

दयावे आणि त्या यंत्रणेसाठी जास्तीत जास्त निधी पुढच्या बजेटमध्ये उपलब्ध करुन दयावा व प्रत्येक ठिकाणचे ड्रेनेजचे चेंबर दुरुस्त केले पाहीजे. आज काही काही ठिकाणी ड्रेनेजचे चेंबर घुशीने उखडलेले असतात व त्यामध्ये माती पडून ते पुर्ण बंद होते जागेवर पाणी थांबते. त्याकरिता ज्युनि.ईंजिनिअर, डेप्युटी.ईंजिनिअरला फोन केल्यानंतर ते म्हणतात आमच्याकडे बजेट नाही, प्रत्येक वेळेस ही उत्तरे दिली जातात. पिंपरी चिंचवड शहरामध्ये इतर शहरापेक्षा कितीतरी पटीने लोकसंखेत वाढ होते. आमच्या परीसरामध्ये कमीत कमी ४०० ते ५०० फ्लॅटच्या सोसायटया आहेत त्याठिकाणी या पावसाळयामध्ये फिरलो, बघीतलतर पुर्ण सोसायटया मध्ये स्ट्रॉर्म वॉटरची सोय कुठेही केलेली नाही, आणि आपल्याकडे काही स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईन आहेत त्या जोडलेले नाही ते ड्रेनेजला जोडलेले आहे. आज संपुर्ण ड्रेनेजचे चेंबर्स ओपन केलेतर ते तुडूंब भरलेले आहे. चार-चार, पाच-पाच दिवसापासूनचे पाणी साठून राहते. आपण प्रत्येक सोसायटीवाल्यांच्या ड्रेनेजला स्ट्रॉर्म वॉटरचे पाणी जोडू दिले नाही पाहीजे. पावसाचे पाणी स्ट्रॉर्म वॉटर लाईनला जोडले पाहीजे अशी प्रत्येक सोसायटीला व अधिका-यांना सूचना देवून त्या लाईन जोडाव्यात हीच आपल्याला विनंती करतो, धन्यवाद.

**मा.आरती चौंधे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. पावसामुळे सगळीकडे ड्रेनेज भरुन वाहत आहे. आयुक्त साहेब आपण सुध्दा कस्पटे वस्तीला भेट दिलेली होती. त्याठिकाणी स्ट्रॉर्म वॉटरची, ड्रेनेजलाईन नाही, तेथे स्ट्रॉर्म वॉटर व ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी मी वारंवार मागणी करते. लोकांना आजार होतात, त्रास सहन करावा लागतो. कस्पटे वस्ती, मानकर चौक मनपा शाळा येथपर्यंतचा रस्ता येथे ड्रेनेज आणि स्ट्रॉर्म वॉटर लाईन लवकरात लवकर टाकण्यात यावी.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण आणि घनकच-याचा विषय आणलेला आहे तो विषय चांगला आहे. आयुक्त साहेब आपण थोडेसे लक्ष दिले पाहीजे. पिंपरी चिंचवडमध्ये सगळयात कमी बजेट ड्रेनेज विभागाला आहे ते वाढवून दिले पाहीजे. त्या बजेटमध्ये कोणतेही काम करु शकत नाहीत. प्रत्येक वॉर्डनिहाय बजेट दिले पाहीजे. यापुर्वी दोन-दोन, तीन-तीन वॉर्ड मिळून दहा ते बारा लाखाचे बजेट द्यायचे. आयुक्त साहेब आपण चेंबर रिपेअरींगचे टेंडर देतो. त्या ठेकेदाराकडे काळेवाडी, विजयनगर आणि तापकीरनगर हे तीन वॉर्ड मिळून त्या ठेकेदाराने फक्त चार कर्मचारी ठेवलेले आहेत. पावसाळा असल्याने आठ दिवसात तीन वॉर्डामध्ये पुर्ण पाणी साठलेले आहे. प्रत्येकजण कर्मचा-यांना फोन करतो. कर्मचा-याची अशी अवस्था झाली की यांच्या वॉर्डात काम करायला जाव का त्यांच्या वॉर्डात जाव. त्यादिवशी आम्ही प्रभाग मिटींगला सांगीतले होते काही कर्मचारी वाढवावे म्हणून तर त्या ठेकेदाराने एकच कर्मचारी वाढविलेला आहे. एक कर्मचारी वाढविला आणि लगेच दुसरा कर्मचारी आजारी पडलेला आहे म्हणजे ती संख्या जी आहे ती तेवढीच राहीली आहे. गेली आठ दिवस झाले कोकणेनगर भागामध्ये पुर्णपणे गुडग्याएवढे पाणी लोकांच्या घरामध्ये आहे. लोक तीन-तीन मोटारी लावतात तरी सुध्दा ते पाणी कमी होत नाही. त्याचे कारण असे आहे की आपल्या ज्या ड्रेनेज लाईन आहेत त्या व्यवस्थीत साफच केलेल्या नाहीत त्या पुर्ण चिखलानं, मातीन भरलेल्या आहेत.

एक चेंबर पुर्ण भरलेले असेलतर पुढचा चेंबर रिकामा असतो म्हणजे नक्कीच आपल्या ड्रेनेजलाईनमध्येच तो प्रॉब्लेम आहे. रोज गाडया येतात काम करतात पण त्याचा काहीच फायदा होत नाही. आपण हे नियोजन पावसाच्या अगोदरच केले पाहीजे. मे महीन्यामध्ये पुर्ण चेंबर रिपेअरींग झाले पाहीजे. आणि सर्व ड्रेनेजलाईन या स्वच्छ झाल्या पाहीजेत. स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईनीची खुप आवश्यकता आहे. माझ्या प्रभागामध्ये आता काही ठिकाणी स्ट्रॉर्म वॉटरलाईन गेलेली आहे, त्याचे काम चांगले झालेले नाही. त्या स्ट्रॉर्म वॉटरच्या चेंबरवरुन जर एखादी गाडी गेलीतर तो चेंबर लगेचच खचला जातो. आणि काही ठिकाणी आपल्या स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईनचे जे चेंबर आहेत ते एमएसईबीची जी अंडरग्राऊंड केबल जाते शेजारुन गेलेली आहे त्याच्यामुळे वारंवार त्या स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईन मधुन पाणी आलंतर लगेचच माझ्या वॉर्डात लाईट जाते. मागच्या आठवडयामध्ये तेथील लोकांना तीन दिवस सलग लाईट नव्हती. कारण आपल्या ज्या स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईनीमध्ये पाणी भरल गेल की त्यांची लाईन खराब होते आणि पाणी असल्यामुळे त्या लाईनमनला रिपेअरींग सुध्दा करता येत नाही. आपण अधिका-यांना अशा सूचना दयाव्यात की कोणतेही काम करताना त्याचे दुष्परीणाम पुढे काय होणार हे बघूनच काम करावेत. काही ठिकाणी स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईनला ड्रेनेज लाईन जोडलेली आहे ती कोणी कोणी लाईन जोडली त्याचा माझ्या वॉर्डात सर्व्हे सुध्दा झाला आहे पण त्याच्यावर आपल्या अधिका-यांनी आतापर्यंत काहीच ॲक्शन घेतलेली नाही. असे असेलतर आपल कर्तव्य आहे की ड्रेनेजलाईनला त्यांच ड्रेनेजच कनेक्शन जोडून दिले पाहीजेत. आज जर त्या भागात स्ट्रॉर्म वॉटर लाईन मोकळी असती कनेक्शन्स असतेतर घरात पाणी गेले नसते. तरी आयुक्त साहेब आपण या सूचना देवून हे सगळ व्यवस्थीत करावं अशी विनंती आहे

**मा.मंदा आल्हाट** - मा. महापौर साहेब, महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने जलशुध्दीकरण आणि घनकच-याचा विषय आणलेला आहे. माझ्या मोशी भागात बनकर वस्ती आहे. पुणे-नाशीक हायवेच्या साईडला ६१ मी.चे स्ट्रॉर्म वॉटरचे आयुक्त साहेबांनी टेंडर काढलेले होते ते ६१ मी. चे आहे म्हणून कॅन्सल केले. स्ट्रॉर्म वॉटरचे सगळे पाणी रस्त्याच्या साईडला बनकरवस्तीच्या साईडने जाते. अधिका-यांना सांगीतलेतर ते पाईप कुठून आणणार असे सांगतात. आदर्शनगर, तापकीरनगर अशा पाच ते सहा ठिकाणी पाऊस आला की पाणी वाहून जाते अधिका-यांना बोलवावे लागते पाणी येत आहे तुम्ही काहीतरी सोय करावी असे सांगीतल्यानंतर अधिकारी सांगतात आम्ही पाईप कुठून आणणार तरतूद नाही. हे पावसाळा आल्यानंतरच तुम्ही म्हणतात हे अगोदरच करायला पाहीजे परंतु प्रत्यक्षात काहीच कारवाई होत नाही. ड्रेनेज, स्ट्रॉर्म वॉटरचे झाकण ब-याच ठिकाणी उघडी आहेत, दोन ते तीन वेळेस सांगून सुध्दा त्याच्यावर काहीच कारवाई होत नाही. समाविष्ट गावात काहीच काम होत नाहीत. आम्हांला लोकांना तोंड दयावे लागते. तरतूद नाही असं सांगाव लागत, आता ड्रेनेजची तरतूद केलीतर एक वर्षात किती काम होणार आहेत.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा. सभागृह, पत्रकार बंधु. शास्त्रीनगर, दत्तनगर याठिकाणी रोज एक-दोन ड्रेनेज तूंबलेले असतात. चार-चार दिवस रस्त्याला पाणी वाहत असते त्यामुळे मच्छर, डेंग्यू वाढलेले आहेत, औषध फवारणी स्ट्रॉंग

करावी. आता औषध मारतात त्याचा उपयोग होत नाही. मच्छर वाढलेले आहेत, लोकांना डेंग्यू झालेले आहेत, आज बघीतलतर प्रत्येकाच्या घरचे चार-चार माणस आजारी पडलेले आहेत. स्ट्राँग औषध मारावे. ड्रेनेज मधुन झुरळ निघतात आणि घुशीने, उंदराने अक्षरश: ते पोखरलेल आहे. काही काही ठिकाणी झाकण नाहीत. बीआरटीएस रोडचे झाकण चोरीला जातात. काही काही ठिकाणी ठेकेदार पैसे मागतात. ५०० ते १००० रुपयाची मागणी केली जाते. नागरीकांच्या आरोग्याचे प्रश्न आपण सोडवीत नसूतर, काय उपयोग आहे. आम्ही नगरसेवीका वारंवार ड्रेनेज आणि आरोग्याबद्दल कायमच बोलत असतो पण त्याचा कुठेतरी प्रभाव पडला पाहीजे. ड्रेनेजच्या तरी तक्रारी कमीत कमी महीनाभर तरी यायला नाही पाहीजे. रोज सकाळी ड्रेनेजसंदर्भातील फोन असतात. रोडला पाणी वाहते, घरातून बाथरुममधून सुध्दा पाणी येते असे फोन असतात.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, या पावसाळयात अनेक ठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेज चोकअप झालेले अनेक सदस्यांनी सांगीतलेले आहे. मुळ कारण असं आहे की चाळीस वर्षे अगोदर हे अंडरग्राऊंड ड्रेनेज झालेले आहेत. आता लोकसंख्या डबल झालेली आहे त्यादृष्टीने पाण्याचे व ड्रेनेजचे डायमीटर वाढवायला पाहीजे, नवीन पाईपलाईन टाकले पाहीजे. यासाठी जे ठेकेदार नेमलेले आहेत त्यांनी कर्मचारी कमी ठेवलेले आहेत. प्राधिकरणामध्ये आख्खे सहा सेक्टर आहेत त्याठिकाणी फक्त तीन कर्मचारी आहेत. एका सबकॉन्ट्रॅक्टरने दुसऱ्याला, दुसऱ्या सबकॉन्ट्रॅक्टरने तीसऱ्या सबकॉन्ट्रॅक्टरला दिलेले आहेत. वरच्या माणसाला काही सुखदुख नाही. खालचा माणूस ५० ते १०० तक्रारी एका दिवसात पुर्ण करु शकत नाही त्यामुळे अंडरग्राऊंड ड्रेनेजचे पाणी लोकांच्या घरामध्ये घुसते. ज्यादिवशी तक्रारी येतात त्याच दिवशी त्या सुटल्या पाहीजेत. तक्रारी सुटे पर्यंत रात्रंदिवस काम केले पाहीजे असे होत नाही. येणारे कर्मचारी रात्री दहा वाजता येतात. दहा वाजता आल्यानंतर सुध्दा त्याचवेळेस ती तक्रार पुर्ण झाली पाहीजे. माझ्याकडे एलआयजीमध्ये, अबोली अपार्टमेंट आहे तेथे पाच दिवस झाले संडासचे पाणी काढू शकलेले नाहीत. पावसामुळे तेथील पाणी ९ इंच अंडरग्राऊंड ड्रेनेजमध्ये साठलेले आहे. स्ट्रॉर्म वॉटर ड्रेनेजच नाही, हे शहर म्हणून चाळीस वर्षे झाले तरी स्ट्रॉर्म वॉटर ड्रेनेज ९० टक्के ठिकाणी नाही त्यामुळे पाणी अंडरग्राऊंड ड्रेनेजमध्ये घुसते. माझ्याकडे पाच-पाच, दहा-दहा दिवस चोकअप काढत नाहीत, ज्युनि.ईंजिनिअर, डेप्युटी.ईंजिनिअरकडे सांगीतलतरी काही होत नाही शेवटी एक्झिक्यूटीव्ह इंजिनीअर पर्यंत जावे लागते तेव्हाच या तक्रारी सोडविल्या जातात बाकी नाही. डेंग्यूच्या केसेस वाढत चाललेल्या आहेत, प्रशासन काय करते. जिथं बघाव तिथं डेंग्यूच्या केसेस आहेत. तुमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर कमी आहे, एक स्प्रेकुली असतो. तक्रारी दहा ते बारा येतात. इतक्या डेंग्यूच्या केसेस येतात, आम्हांला पब्लिक समोर काहीतरी ॲक्शन घेतल्याचे दाखविले पाहीजे, महापालिकेनी दखल घेतलेली दाखवायला पाहीजे. प्रत्येक प्रभागामध्ये एक-दोन ट्रॅक्टर असते एक स्प्रेकुली एक प्रभागासाठी असतो आणि तो गैरहजर राहीलातर तेवढे दिवस स्प्रेकुली नाही. कम्प्लेन करायचीतर कोणाला सांगायचं. डेंग्यूच्या केसेस वाढतात, सण्डे दिवशी सांगीतले स्प्रेकुली पाठवातर स्प्रेकुली नाही म्हणतात, स्प्रेकुली बोलवा, ओव्हरटाईम दया, ओव्हरटाईम देत नाहीत, मनुष्यबळ वाढवत नाहीत, अनेकवेळा बजेट नसते. डेंग्यूच्या केसेस वाढलेल्या आहेत. लोक मरतात, डेंग्यू केसेस कितीप्रमाणात वाढलेल्या आहेत. लोक नगरसेवकांना फोन करतात, आमच्याकडे डेंग्यू झालेला

आहे असे सांगतात. हे इन्फ्रास्ट्रक्चर टेम्पररीतरी वाढविले पाहीजे. शासनाने आयुक्तांना डायरेक्ट परचेस, अपॉईन्टमेंटसाठी पॉवर दिलेल्या आहेत त्या वापराव्यात. आमच्याकडे डॉ.अय्यर साहेब होते, सीएमओ म्हणून होते ते आता रिटायर्ड झालेले आहेत, त्यांच्याकडे डेंग्यू केसेस होत्या. डेंग्यू केस आहे का नाही हे पाहण्यासाठी अधिका-यांना पाठविले पाहीजे तेही होत नाही. प्रॅक्टीकली इन्फ्रास्ट्रक्चर कमी आहे. चाळीस कर्मचारी ठेकेदारी पध्दतीने घ्यायचे असतीलतर चाळीस यायला पाहीजे हे आपण पाहत नाहीत व पंधरा ते वीस कर्मचारी येतात. याच्याकडे लक्ष दयावे. लोक मेलेतर त्याला जबाबदार आपणच राहणार.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एमआयडीसीमध्ये कुठेही अंडरग्राऊंड ड्रेनेज नाही, मलनि:स्सारण, जलनि:स्सारण नाही. एमआयडीसीकडे अनेकवेळा फॉलोअप केला. फार पुर्वीपासून त्यामध्ये त्यांनी काहीही केलेले नाही त्यामुळे आपल्याकडे एमआयडीसीमध्ये ५ टक्के असे उदयोग आहेत पेण्टींग मॅन्युफॅक्चरींग असेल, पेण्ट करण्याची फॅक्टरीज यामधुन जाणारे पोल्यूशन फार कमी प्रमाणात आहे. आपला झोन हा यांत्रीकी झोन आहे. यापुर्वी, मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचा मी अध्यक्ष असताना आयुक्त साहेबांच्या दालनात एमआयडीसीची मिटींग झाली परंतु आजपर्यंत हा प्रकल्प कार्यान्वित झालेला नाही. पोल्यूशनच्या बाबतीत सांगायचे झालेतर मी आपल्याला विनंती करेल की, मंत्रालय पातळीवर ज्यावेळेला बैठक होईल त्यावेळेला एमआयडीसी काम करत नाही असा मुद्दा उचलून धरावा. चाकण एमआयडीसीमध्ये सुध्दा ड्रेनेजलाईन टाकलेली नाही त्यामुळे इंद्रायणीचे पोल्यूशन होण्याच्या मार्गावर आहे. आपल्या भागातून जे पाणी जाते विशेषत कुदळवाडी येथे स्क्रॅप सेंटर जास्त आहेत, प्लॅस्टीकचा कचरा जास्त असतो. केमीकलचे बॅरेल नाल्यामध्ये धुतले जातात व त्याच पाणी इंद्रायणीमध्ये जात. स्क्रॅप सेंटर नाल्याच्या बाजूला आहेत. प्रथमत: कचरा, प्लॅस्टीक नाल्यात टाकून केमिकल्स, केमीकलचे वेस्टेज नाल्यात टाकले जाते. कुदळवाडी, जाधववाडी, मोशी येथे हा कचरा जाळला जात होता तो आता थोडयाप्रमाणात कमी झालेला आहे. त्यामुळे विषारी वायू निर्माण होतो, डोळे जळजळ होतात, घशाला त्रास होतो. मी पुन्हा एकदा विनंती करतो की एमआयडीसी पातळीवर हा विषय घ्यावा. ड्रेनेजचे झाकण जे आहे ते चार इंच खाली किंवा वर असते त्यामुळे टू-व्हिलरचे टायर फाटतात, घसरतात त्याकरिता टेक्नीकल ऍडव्हायजर नेमावेत. तसेच फार पुर्वी टाकलेल्या ड्रेनेजलाईन आहेत त्या बदलून ३०० एमएम, ४०० एमएम लाईन टाकावी कारण आताच सांगीतलेल आहे की लोकसंख्या वाढलेली आहे व त्या लाईन जून्याच आहेत. सर्व सोसायटयामध्ये ते शक्य नसलेतरी सेंट्रलाईज करुन किंवा डिव्हाईड करुन त्याप्रमाणे मोठी लाईन टाकणे आवश्यक आहे. ज्याठिकाणी शक्य असेल त्याठिकाणी ड्रेनेजलाईन मोठया प्रमाणात टाकण्याचे काम हातात घ्यावे. तसेच महापालिकेतर्फे सुध्दा स्क्रॅप सेंटरवर कारवाई करणे आवश्यक आहे. कारण यांच्या मार्फत होणारे पोल्यूशन अतीशय घातक आहे याची आपण नोंद घ्यावी.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेब आपले काम खुप चांगले आहे त्याबद्दल काही शंका नाही, आपण कामाच्या बाबतीत खुप पॉझीटीव्ह आहात. परंतु हे शहर वरतून वरतून सूंदर दिसतय ते आतून पुर्ण पोखरलेल आहे. कॉन्ट्रॅक्टररुपी ठेकेदारानी त्या ड्रेनेजला घुशी लावलेल्या आहेत. स्ट्रॉर्म वॉटरची लाईन ड्रेनेजला

जोडलेली आहे. रस्त्याची लेव्हल आणि चेंबरची लेव्हल खालीवर असते. काही ठिकाणीतर चेंबर दोन फुट वरती आहेत. सर्व नगरसेवकांनी आपआपल्या ड्रेनेजच्या समस्या याठिकाणी मांडलेल्या आहेत. माझ मत असं आहे की, ड्रेनेजचा खालचा जो पोर्सेन आहे त्याच्या साईडच स्ट्रक्चर इनलेट आणि आऊटलेट हे लोखंडी बनवलतर आता ज्या घुशी पोखरतात ते जर लोखंडी असेलतर घुशी त्यातून ते पोखरु शकणार नाहीत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे पावसाळयामध्ये काही दिवसापासून सर्व नगरसेवकांचा अनुभव आहे, आम्हांला स्वत:ला जावून उभे राहून काम करुन घ्यावे लागते. एकच ठेकेदार असतो, तोच ठेकेदार चार ते पाच वॉर्डोला असतो. त्यांचेकडे साफसफाई करणारे दोनच माणस असतात. तीन ते चार ठिकाणी जर समस्या आलीतर त्यांच्याकडे माणस नसतात या गोष्टी त्वरीत सोडविल्या पाहीजेत. त्यासाठी चार ते पाच तास थांबावे आणि बघावे तोपर्यंत पाण्याचा प्रवाह त्यांच्या संडासमधुन डायरेक्ट हॉलमध्ये यायला सुरवात होते. याची तत्पर्ता सर्वांनी लक्षात घ्यावी. आता मोठी समस्या आहे ती चेंबरच्या झाकणाची आहे. पावसामुळे चेंबरच्या झाकणाच्या बाजूला खड्डयाची रिंग तयार होते त्यामध्ये टू-व्हिलरचे चाक सापडून तो माणूस पडतो याचे गांभीर्य लक्षात घ्यावे. असा एक ॲक्सीडेंट काही वर्षापुर्वी चिंचवडला झालेला आहे. या सर्व गोष्टीच आपण गांभीर्य लक्षात घ्याव. आपलं शहर वरतून सूंदर दिसते तसं आतून सुध्दा व्हाव कारण आपल्याकडे लोक खुप अपेक्षेन बघतात. याकडेही लक्ष दयावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह विषय वेगळा व चर्चा वेगळी करतो. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम १९७४ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रात निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करुन त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे तसेच पर्यावरण व वने मंत्रालय भारत सरकार मार्फत नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० हे पर्यावरण (संस्था) अधिनियम १९८६ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणा-या नागरी घनकच-याची योग्य ती वर्गवारी करुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाक्डून घेतलेल्या अधिकार पत्राप्रमाणे त्याची व्यवस्था करणे जैव वैद्यकिय घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम १९९८ नुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांचे कार्यक्षेत्रातील जैव वैद्यकिय कचरा व्यवस्थापन उभारण्यासाठी योग्य ती उपाययोजना करणे बंधनकारक असल्याचे कळविले आहे व त्याप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण महामंडळाने महापालिकेस अंतिम सुचना दिलेल्या आहेत. याबद्दल आपण काही विचार केलेला आहे का. घरगुती संडापाणी एकत्रीत केलेले मला दिसत नाही. कारण मी १९८६ पासून प्राधिकरणात राहतो. याठिकाणी शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी सांगीतले जाते. या विषयामध्ये शास्त्रोक्त पध्दत अस्तित्वातच नाही असे वाटते. प्राधिकरणामधील जेवढे बंगले आहेत त्या बंगल्याचे सर्व पाणी ड्रेनेजला जोडलेले आहे. त्यामुळे ड्रेनेज आणि सांडपाणी एकत्रच चाललेलं आहे. ते शुध्द करण्याची वेगळी पध्दत आपण शासनाला कळविलेली आहे का. अशी काही शास्त्रोक्त समिती आपण नेमलेली आहे का? आता आपण काय करतो परवाना विभागाच्या अधिका-यांना ड्रेनेज मध्ये देतो, ड्रेनेज मधील अधिका-यांना नळकनेक्शनला देतो. त्यामुळे हा सर्व सावळागोंधळ महापालिकेमध्ये चाललेला आहे. सगळीकडे ड्रेनेज वरती-खाली

झालेले आहे. आपलेच लोक येथे आलेले होते, मी ड्रेनेजला दोन कनेक्शन जोडले होते. ड्रेनेजमधील संपुर्ण पाणी फास्ट चालले आहे, पाणी जाते कुठे? मला वाटल ती नाल्याला जोडलेली लाईन असावी. एक लाकूड बांधून त्या ड्रेनेजमध्ये सोडलंतर ते लाकूड वाहत जावून त्या नाल्यामध्ये निघालं. आपण लोकांना कॉन्ट्रॅक्ट दिलेल आहे. बीव्हीजी संपुर्ण महाराष्ट्रामध्ये काम करते, ते पिंपरी चिंचवड शहराचे काम करतेय, त्यांन स्वच्छते बाबतीत निर्णय घेतलाय कां. ज्या कॉन्ट्रॅक्टरला अनुभव आहे त्यांनाच काम दिले पाहीजे. त्या ज्या मशीन्स आहेत त्याला एका शिफ्टला १५ हजार, १८ हजार भाडे आहेत. गेल्या आठ ते दहा वर्षापासून मी बघतो एक वयस्कर महीला त्या गाडीवर काम करते तसेच दोन पुरुष व एक ड्रायव्हर त्या गाडीवर काम करतात. चार दिवसापासून पाऊस होता त्यांच्या डोक्यावर टोपी सुध्दा नव्हती, कपडे भीजत कुडकूड करत होते त्यांना बोलावल, चहा केला ती ८० वर्षाची म्हातारी होती. त्या गाडीवरच्या ड्रायव्हरने सांगीतले की बीव्हीजीवाल्यांना आम्हांला रेनकोट देण्यासाठी सांगावे. अक्षरश: पाऊसाच पाणी येवू नये म्हणून त्यानी प्लॅस्टीकची टोपी बनवली त्यातून पाणी गळतयं ती वयस्कर मंडळी आणि ती दोन मुल त्याठिकाणी कचरा वाहतात ही कसली पध्दत. करोडो रुपये आपण त्यांना देतोय. त्यानंतर मी बीव्हीजीवाल्यांना फोन केला याबाबत सांगीतले, त्यांना गमबुट नाही, ती महीला गुडग्याइतकी साडी बांधलेली, खालचे पाय रीकामे स्लीपर पायामध्ये असे सांगीतल्यानंतर त्यांनी ही कोणी कम्प्लेन्ट केली त्याची चौकशी करुन त्या ड्रायव्हरचीच त्यांनी बदली केली. तो ड्रायव्हर दुसऱ्या दिवशी माझ्याकडे आला व बदली केली म्हणून सांगीतली मी परत फोन करून सांगीतले, परत त्या ड्रायव्हरला त्या गाडीवर ठेवले. हे काय चालले आहे. महापौर साहेब, आयुक्त साहेब यावर आपण लक्ष देणे आवश्यक आहे. याठिकाणी जे ठेकेदार आहेत शंभर कोटी, दोनशे कोटीचे काम करतात त्या ठेकेदाराना बोलावून त्यांना कामाची पध्दत शिकवावी. प्रत्येक ठिकाणी घाण वरती येते. सगळी ड्रेनेजलाईन वरती आलेली आहे. काल पाऊस झाला त्यामुळे माझ्या तेथील लीफ्टमध्ये संपुर्ण पाणी भरले होते. मी कामगाराला त्या विषयी सांगीतलेतर ते पाणी लीफ्टमधे तेथील झाडातून गेले होते संपुर्ण रस्ते ढेपाळलेले आहेत, व पाणी मुरलेले आहे. हे कुठेतरी सुधारणा करणार का नाही. नुसते आम्ही बोलायचे, भाषण करायचे आणि शेवटीला मंगलाताई उभ्या राहणार आणि सांगणार. आस झाल पाहीजे, तसं झाल पाहीजे. आपण सुध्दा आरोग्याच्या बाबतीत सांगावे. ज्यांना बांधकामाची माहीती आहे त्यांना बांधकामच दया, ज्यांना एलबीटीची माहीती आहे त्यांना एलबीटीच दया, ज्यांना आरोग्याची माहीती आहे त्यांना आरोग्यच दया. ज्यांनी प्लॅन पास केलेला आहे त्यांना माहीती असते ड्रेनेज कुठे आहे ते. ड्रेनेजला आतून प्लॅस्टर केलेले नाही. पुणे महापालिकेमध्ये ड्रेनेजला आतून प्लॅस्टर केलेले आहे आपल्याकडे आतून सगळे पोखरलेले आहे, उंदीर, घुशी, झुरळ झालेले आहेत. सर्व बंगल्यामध्ये झुरळ आयुक्तांच्या नावाने फिरत असतात. तरी आपण या ठेकेदाराना सांगावे तसेच त्यांच्या कामगाराना रेनकोट, गमबुट, मास्क दयावे. सेफ्टीसाठी काहीतरी केले पाहीजे. सेफ्टीचे नॉर्म्स आहेत या विषया बाबत तांत्रीक चांगला माणूस घ्यावा शास्त्रोक्त पध्दतीने सांडपाण्याची विल्हेवाट लावावी. ही सर्व प्रक्रीया चांगली बनवावी जेणेकरुन आपल्या जनतेच आरोग्य धोक्यामध्ये येणार नाही. अशी अपेक्षा करतो जयहीन्द, जय महाराष्ट्र.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. महाराष्ट्र शासनाच्या प्रदुषण महामंडळाने आपल्याकडे अहवाल दिला अहे. से. २२ मध्ये जेएनएनयूआरएम मार्फत त्याठिकाणी प्रोजेक्ट करण्याचे प्लॅनींग चालू असताना दहा लाखाचे गर्डल त्याठिकाणी बसविले, हा नियोजनाचा अभाव आहे. त्या परीसरामध्ये कच-यची विल्हेवाट लावण्याच्या संदर्भात आपण स्वच्छ संस्थे मार्फत गाडया दिलेल्या आहेत त्यामुळे ब-याचशा प्रमाणात तक्रारी येत नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थेनी आपआपल्या महापालिका परिसरातील कच-याची विल्हेवाट लावणे यात आपलीच महापालिका एक नंबरला असेल, आपण याठिकाणी चांगल्या पध्दतीने विल्हेवाट लावते. आपल्या बाजूला देहूरोड कॅण्टोण्मेंट बोर्ड आहे त्यांचा कचरा से-२२ पासून ५०० मी.वर येवून पडतो. त्यांची वस्ती चार कि.मी.वर आहे. दोन कि.मी. वर त्यांच्या कॅण्टोण्मेंट बोर्डाची जागा मोकळी पडलेली आहे. त्याठिकाणी तो कचरा न टाकता आपल्या से.नं.२२ च्या वस्तीच्या जवळ आणून टाकतात आणि तो कचरा टोटल आपल्या परिसरात फिरतो स्व्च्छतेचे लोक काम करुन जातात आणि परत पाठीमागे वा-याने आलेला तो कचरा राहतो. हे सुध्दा त्यांना सांगणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, ड्रेनेजलाईनच्या संदर्भातील विषय आहे से.२२ हा अस्तित्वात माझ्यामते १९८६ साली आला. प्राधिकरणामार्फत जागा घेवून ती वस्ती त्याठिकाणी बसवली त्यावेळेला ती ड्रेनेजलाईन टाकली त्यावेळेला छोटीछोटी पाईपलाईन टाकली होती. नंतर रुपीनगर आपल्या शहरामध्ये आल्यानंतर त्या भागाचा स्लोप आपल्या भागात होता. तेथील ड्रेनेजलाईन आपल्याच अधिका-यांनी या पाईपलाईनला जोडली. चार इंच ड्रेनेजलाईनला आठ इंच पाईपलाइन लावली नंतर त्याठिकाणी गटर जोडले. आठवडयातून एक वेळेस ती लाईन चोकअप होते त्याठिकाणी मैला बाहेर येतो. तो चेंबर ओपन केला नाहीतर लोकांच्या घरातून पाणी येते, चेंबरमधुन येत नाही. गणपती मंदीरा समोर सगळा मैला येतो. वेळोवेळी तक्रार देवून सुध्दा ड्रेनेजचे काम करणाऱ्या माणसाला टेंडर दिलेले आहे. त्यांच्याकडे मशनरी मार्फत चोकअप काढणारे लोक आहेत. टेंडर पाहीलेतर ताबडतोब त्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्टला आपण टाकाल. चेंबर ओपन केलेतर आतमधील मातीने भरलेले आहे, गाळ साठलेला आहे, गाडी येत नाही, सदस्यांना विचारावे मशीन वगैरे काहीही नाही. एकच गाडी आहे. आपण टेंडर दिलेले आहे त्या माणसाला त्या गाडीने गाळ काढायचा त्यासाठी माणुस लागतो, गाडीने गाळ निघत नाही. ते माणस तक्रारी वाढल्यातर चेंबर ओपन करतात. पार आणतात, आसं आसं हालवतात व ती माती साईडला जाते आणि पाणी निघुन जाते. आठ इंचाचा चेंबर असेलतर त्यात सहा इंच माती अख्या पाईपलाईनीमध्ये साठलेली असते. अशी कुठलीजरी मशीन असलीतरी त्या मशीनमधुन ती माती निघाली पाहीजे ती निघत नाही. आपल्या लोकांच्या कामाची पध्दत, त्याठिकाणी सल्लागार असेल किंवा नसेल मला माहीत नाही. ज्या ज्या भागामध्ये रस्ते आहेत तेथे ही लाईन जोडावी असं म्हणलतरी जोडत नाहीत. दहा वर्षे झाले ते सांगून होत नाही. शुल्लक गोष्टी आहेत. हे ड्रेनेज जर रस्त्याच्या मधुन दिलेतर लोकांना सोपे होईल ते देत नाहीत. हे गांभीर्याने घेतले पाहीजे. स्ट्रॉर्म वॉटरची लाईन आतापर्यंत टाकलेली ती कधी साफ केलेली आहे का? त्याच्या आतमध्ये पुर्ण माती साठलेली आहे. चौकोनी चेंबर राहीलेले आहे. ठेकेदाराला ठेका देतो, सुधारीत मान्यता देतो परंतु जी काम व्हायला पाहीजेत ती होत नाहीत. स्ट्रॉर्म वॉटरच्या लाईनमध्ये ब-याचशा भागामध्ये माती साठलेली आहे त्यामुळे पाणी जात नाही. माझ्या भागात गेल्या महीन्यामध्ये काम झाले आहेत

त्याठिकाणच्या झोपडया काढून माझ्या भागात काही शिफ्ट केलेल्या आहेत, गुडग्या एवढे पाणी आहे. माळीण गावामध्ये जी दुर्घटना झाली तशी होईल. त्याठिकाणी जे पाणी उताराने येते ते डायरेक्ट लोकांच्या घरामध्ये जाते. कॅण्टोन्मेंट ऐरीयामध्ये पाणी साठते ते पाणी डायरेक्ट लोकांच्या घरामध्ये येते. त्याठिकाणी जुन्या बिल्डींग आहेत. त्यामध्ये पाणी शीरते. स्ट्रॉर्म वॉटर लाईन टाकून आठ वर्षे झालेले असेल. ते सर्व पाणी झोपडपट्टीमध्ये येते. त्यामुळे एखादी जीवीत हानी का नाही होणार, एखादी घटना का घडणार नाही. जेएनएनयुआरएम मार्फत बिल्डींग बांधलेल्या आहेत. तेथील ठेकेदारांनी काम केलेले आहे, त्यांनी ड्रेनेजलाईन टाकली असे सांगीतले, त्यांनी सुध्दा चेंबर बांधले परंतु आतून प्लॅस्टर केले नाहीत. ड्रेनेजलाईनच्या पाण्याचा स्लोप व्यवस्थीत नाही. बिल्डींगच्या डकमध्ये चोकअप झालेले आहे. कितीवेळा पैसे खर्च करणार आहात. आपण पैसे वाढवून दिलेतर त्याचे नियोजन नाही. लोकांच्या तक्रारीला वेळोवेळी सामोरे जावे लागते. अशा काही घटना घडतात की नंतर आम्हांला लोकांना फेस करावे लागते. तक्रारीचे निवारण करताना किरकोळ काम करता येत नाहीत. स्ट्रॉर्म वॉटर रस्त्यामधुन गेलेले आहे ट्रक गेल्यामुळे ते ढासळलेले आहे लोकांनी त्यामध्ये दगड टाकलेले आहेत, रिक्षा पल्टी झालेली आहे. या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक आहे, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, सर्व सहकारी, आयुक्त साहेब, अधिकारी वर्ग. ज्यावेळेला एवढे लोक बोलतात त्याचे कारण असे की, खरोखरच नागरीक यांच्याकडे समस्या मांडतात म्हणूनच हे याठिकाणी एवढया पोटतीडकीने बोलत असतात. विषय आहे अहवाल सादर करण्याचा, तुम्ही पहील्यांदा खुलासा केला म्हणूनच या विषयावर बोलायचे म्हणल्यानंतर पावसाळयामध्ये नागरीकांनी यांच्याकडे केलेल्या तक्रारी कोणाला सांगणार. जी.बी.मध्ये हे विषय मांडावे असे प्रत्येकाला वाटते म्हणून हे विषय मांडत असतो. जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी, वायसीएमएच, पिंपरी चिंचवड शहरामधील जेवढे हॉस्पिटल आहेत त्यामधे ऑपरेशन केल्यानंतर काही घटना असतील, जैव वैद्यकीय कच-याच्या विल्हेवाटीचा विषय आलेला आहे. वायसीएममध्ये हे मशीन्स बसविलेले आहे. तेथे फक्त पिंपरी चिंचवडसाठीच त्याचा वापर केला जात नाहीतर तेथे पुण्यामधील हॉस्पिटल कच-याचे व्यवस्थापन याठिकाणी केले जाते. बजेटच्या २५ टक्के, पाहीजे तेवढे घ्या परंतु कच-यासाठी, ड्रेनेजसाठी खर्च करायचा असेलतर नव्याने समाविष्ट झालेली गावे आहेत, शहरातील ड्रेनेजचे व्यवस्थापन व्हायला पाहीजे. दहा फुट, सात फुट खोल आपण लाईन खोदतो आणि त्याच्यावर रस्ता करतो परत परत आपल्याला खोदाव लागत म्हणून आख्या पिंपरी चिंचवडमध्ये नवीन आलेली गाव आहेत. ज्या ज्या ठिकाणी डीपी रोड आहेत त्याठिकाणी अगोदर या ड्रेनेजलाईन, पाण्याच्या लाईन टाकल्या पाहीजेत. झुरळ, उंदिर, घुशी हा विषय आहे. कामाची क्वॉलीटी तपासून बघावी लागेल. आयुक्त साहेबांना फोन करताना नगरसेवकांना आनंद होतो असे नाही. आमच्याकडे ड्रेनेजचे पाणी वाहते असे सांगणे हे तुम्हांला सांगण्यासारखे आहे का. परंतु नगरसेवकांना असं वाटत की नागरीकांनी मला सांगीतलेल्या तक्रारी, त्यांच्या अडचणी सोडविल्या पाहीजे म्हणून आपल्याला फोन करतात. एमआयडीसीची सुध्दा मिटींग लावली होती, त्या मिटींगमध्ये हा विषय होता. एमआयडीसीने ट्रिटमेंट प्लॅन्ट बांधणे आवश्यक आहे. आपणही प्रयत्न करतोय परंतु त्यादिवशी गगराणी साहेब गैरहजर होते. त्या गोष्टीला आता

पंधरा दिवस झाले आपण त्याचा फॉलोअप केला का? आपण पुढे पत्रव्यवहार केला का? त्यानंतर आपण पाठपुरावा केला का? त्यासाठी खास माणस नेमले गेले पाहीजेत. जेणेकरुन आज टी.व्ही.वर पिंपरी चिंचवड महापालिका झळकते, एमआयडीसी नाही. परवा खड्डा पडला. प्राधिकरणाच्या प्लॉटवर हे झाले होते, तो प्लॉट विकला. प्राधिकरणाने त्याचे पैसे घेतले, डीपी चार्जेस घेतले परंतु पेपरला नाव काय आल की, पिंपरी चिंचवड शहरामधील व्यवस्थापन व्यवस्थीत नाही. आणि ते कॉर्पोरेशनवर येत, आपलाच भाग आहे म्हणून आपण अंगावर घेतो. प्राधिकरणाने तो प्लॉट देताना विहीरीच्या तेथे आतमधुन तरी दयायला पाहीजे होता किंवा बाहेर दयायला पाहीजे. नाल्यावर प्लॉटींग केलेले आहे हे करत असताना एमआयडीसीची दुखनी आपण अंगावर घेतो, प्राधिकरणाची घेतो. आज आपल्याला प्राधिकरण थोडेसेजरी पैसे असलेतरी एनओसी देत नाही, पहीला पत्रव्यवहार करतात आम्हांला एवढे पैसे दया. आणि मग ते आपल्याला सांगतात आम्ही तुमची काम करतो परंतु त्यांनी काम करुन ठेवले त्याचे काय? स्पाईन रोडवर आपले काम चालले आहे, कृष्णानगरला शेवटच्या टोकापर्यंत जेवढे ओपन प्लॉट आहेत तेथे ड्रेनेजचे पाणी कंबरे इतके साठलेले आहे, ड्रेनेजचे झाकण आपोआप वर आलेले आहे. आम्ही समजू शकतो खुप पाऊस झालेला आहे, धरण सुध्दा भरलेली आहेत. आणखी दोन चार दिवस पाऊस पडलातर १०० टक्के धरण भरतील. नागरीकही समजू शकतात परंतु या व्यवस्थेसाठी बजेटच्या २५ टक्के नाहीतर तुम्ही पाहिजे ती रक्कम दया परंतु ही सर्व काम झाली पाहीजे आणि व्यवस्थीत झाली पाहीजेत. पर्यावरणमध्ये आणखी दोन माणस नेमावेत. बाहेरुन पर्यावरणाचा अहवाल तयार करुन घेतलातर तो माणुस मागचे पान पुढे ठेवून पुढचे व मागचे पान बदलतो. तुम्ही मागचा अहवाल वाचावा त्यात आणि आताच्या अहवालामध्ये काय बदल झाला. कन्सलटन्टला नुसतीच फी दयायची का? त्यांनी फक्त मागची पुढची पान बदलायची आणि तोच अहवाल रिपीट दयायचे चाललेले आहे. या सगळया गोष्टीचा विचार करावा. हे बजेट शासनाने कळवलेले आहे. तुम्हांला हा विषय समजला पाहीजे की नगरसेवकांना, नागरीकांना किती त्रास होतो हे समजले पाहीजे. आमच्या सारख्या सदस्यांनी विषय मांडलातर सगळयांना असे वाटते तुमच्याकडे असे तर इतर ठिकाणी कसे असेल. पावसाळी गटरची लाईन ड्रेनेजला जोडल्या गेलेल्या आहेत. अजेंठानगरचा ट्रॉन्झीट कॅंप आहे त्याच पावसाळी गटरच पाणी ड्रेनेजमध्ये येत आणि लोकांच्या घरामध्ये जातं. याची सुध्दा कम्प्लेन कितीवेळा केलेली आहे. थरमॅक्स चौकामध्ये शॉपींग आहे त्याठिकाणी पाणी घुसते. या गोष्टी मी जर बोललेतर सगळयांना आसं वाटल की मंगलाताई तुमच्याकडे अशी परस्थिती असेलतर बाकी शहरात कशी असेल. म्हणून माझ्या एकटया भागासाठी बोलायच नाहीतर शहरासाठी ही गंभीर गोष्ट आहे. हा विषय मंजूर करावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.वैशाली काळभोर**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३ दि.०३/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०४ दि.०५/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मिळकत वाटप नियमावली २०१३ प्रस्तावासोबत नमुद केलेप्रमाणे (प्रारुप) तयार करणेत आलेली आहे त्यास तसेच मनपा मिळकत वाटप नियमावली २०१३ मधील भाग-५ मध्ये मिळकत विनियोगाचा प्राधान्यक्रम ठरविणेत आला आहे. तथापि सदर नमुद १ ते ७ प्राधान्य वर्गासाठी जाहिर निविदेव्दारे काही वर्गासाठी निविदा प्राप्त न झालेस किंवा कमी संख्येत प्राप्त झाल्यास इतर आरक्षीत वर्गासाठी त्या मिळकती वाटप करणेचे अधिकार मा.महापालिका सभेला असतील. यामध्ये ज्या आरक्षीत वर्गासाठी शासन निर्णय / आदेश असतील त्याला बाधा न येता मा.महापालिका सभेस निर्णय घेता येतील यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मागच्यावेळेस सुध्दा हा विषय आलेला होता त्यावेळेला माहीती मागीतली होती. पिंपरी चिंचवड शहरातील सगळया प्रकल्पामध्ये कोणकोणत्या गोष्टी आहेत, माहिती अपुर्ण होती म्हणून विषय तहकूब ठेवलेला होता त्याची माहिती दयावी.

**मा.प्रशांत खांडकेकर (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मिळकतवाटप नियमावलीचा हा विषय आहे त्याबाबत खुलासा करतो. आपल्या ज्या एकंदरीत प्रॉपटर्या आहेत त्याचा आमच्याकडे डाटाबेस आहे. एकूण ६८७ मिळकती आहेत त्या वाचून दाखवितो. एकंदरीत २५ व्यापारी संकुलन आहेत व त्यात गाळयाची संख्या ७५४ आहे त्यात निरनिराळे गाळे २९३ आहेत, मासीक भाडयाने देतो असे गाळे १९४ आहेत, मनपा वापरात असलेल्या गाळयांची संख्या ११८ आहे. त्याचप्रमाणे भाजीमंडईची संख्या एकंदरीत १७ आहे त्याच्यामध्ये ८७१ गाळे आहेत, भाडयाने दिलेले ५३३ आहेत, रिक्त ३३८ आहेत. मच्छी, मटन आणि बीफ मार्केट जे आहे ते एकंदरीत १० आहेत, त्याच्यामध्ये गाळयांची संख्या १४८ आहे, भाडयाने दिलेले ९६ आहेत, मनपा वापरात ८ आहेत, रिक्त ४४ आहेत त्याचप्रमाणे सांस्कृतीक केंद्र, समाजमंदीर, विरंगुळा केंद्र याच्याविषयी आपण

माहीती चेक केली होती ते एकंदरीत ५५ आहेत त्याची भुमि आणि जिंदगी विभागाकडे नोंद घेतलेली होती. यामध्ये सर्वच आमच्याकडे हस्तांतरण झालेले आहे असे नाही. आमच्याकडे जे हस्तांतरण झालेले नाही ते हस्तांतरणासाठी कार्यवाही करत आहोत. त्याचप्रमाणे मागच्या वेळेस थकबाकीचा विषय निघाला होता. वसुलीसाठी काय केले जाते. कोर्टात केसेस आहेत त्याची माहिती देतो. डी.वाय.पाटील प्रतिष्ठान समाज विकास केंद्र, समाज विकास संस्था अशा दोन मोठया कोर्टकेसेस आहेत त्यामध्ये अंदाजे ४ कोटी पर्यंत रक्कम गुंतलेली आहे तसेच अप्पूघर वॉटर पार्क याच्यामध्ये १ कोटीच्या वरती रक्कम गुंतलेली आहे.

**मा.दत्तात्रय साने** - मा.महापौर साहेब, ही मागच्या वेळेसच्या मिटींगला सर्व यादी सर्व सदस्यांना देण्यात यावी असे सांगीतलेले होते. आकडेवारी वाचतात ती आम्हांला लिहीता येत नाही आणि समजणारपण नाही तरी पुढच्या मिटींग वेळेस आकडेवारीसह सर्व विषय सदस्यांना दयावा तोपर्यंत विषय क्रमांक ४ तहकूब करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर-** याची सर्व माहीती लेखी स्वरुपात सर्व नगरसदस्यांना पुढच्या मिटींगपर्यंत दयावी तोपर्यंत विषय तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचने प्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -५३३ विषय क्रमांक - ४

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजि/१/कावि/३४८/२०१३ दि.०३/०९/२०१३

२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३१ दि.१२/११/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२४ दि.१८/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०४ दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक ४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -५३४ विषय क्रमांक - ५

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.नगररचना/१७/२७९/२०१३ दि.०८/१०/२०१३
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३५ दि.१२/११/२०१३
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४२५ दि.१८/०१/२०१४
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५०५ दि.०५/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करणे कामाच्या रक्कम रुपये २.५५ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी पिंपरी चिंचवड मनपाचा जूना व नविन मंजूर विकास आराखडयातील सर्व आरक्षणे तसेच सर्व रस्ते सर्व नद्यांबाजूची निळी व लाल पुर रेषा सर्वेक्षण करणे व अनुषंगीक कामे करणेच्या कामास र.रु.४००००००००/- (अक्षरी र.रु.चार कोटी) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.अनुराधा गोफणे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.अजीत गव्हाणे** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. या विषयाच्या अनुषंगाने एक गोष्ट निदर्शनास आणतो की, नगररचना विभागाकडून अभीप्राय दिला जातो आणि हा मोजणीशी संबंधीत विषय असल्यामुळे अभीप्राय देत असताना सिटी सर्व्हेची मोजणी आणि आपल्या नगररचना विभागाची मोजणी ही शक्यतो जूळतच नाही. त्यामुळे प्लॅन पास करायला माणूस येत असतो परंतु सिटी सर्व्हेचा व आपल्या नगररचना विभागाचा मोजणी नकाशाच जुळत नाही त्या दृष्टीकोनातून आयुक्त साहेब आपण लक्ष घालावे. कारण आज अनधिकृत बांधकाम करु नये अशाप्रकारचे आदेश आहेत, आपण सर्वाना सांगतो, कार्यवाही करतो परंतु दुसऱ्या बाजूने सर्वसामान्य नागरीक किंवा कोणीही प्लॅन पास करायला येतो, मोजणी नकाशे घेवून येतो तेव्हा मुळात नकाशे जूळत नाहीत. हे नकाशे जुळत नाहीत त्याची माहिती आपण व्यवस्थीत दयावी. अभिप्राय घेतो तो माणूस प्लॅन पास करतो, बांधकाम सुरु करतो बांधकाम सुरु केल्यानंतर अभीप्राय घेतला जातो त्यानंतर प्लीन्थ चेकिंगला जात असतो, त्याचे जर चुकले असेलतर ते पाडावे लागते. माझी याबाबतीत अशी विनंती आहे की ज्यावेळेस माणूस बिल्डींग सुरु करत असतो त्याच वेळी डिपार्टमेंटकडून मार्कींग करुन दिलीतर मला वाटत नागरीकांचे खूप मोठे नुकसान वाचेल जो जो माणूस प्लॅन पास करतो त्याला या अडचणीला सामोरे जावे लागते. त्यामुळे ही अत्यंत महत्वाची बाब आहे त्यामध्ये आपण लक्ष घालावे. दुसरी गोष्ट म्हणजे सिटी सर्व्हेचा नकाशा आणि नगररचनेचा नकाशा मॅच झाला पाहीजे. माझी विनंती राहील की संपूर्ण शहराचे नकाशे विसंगत आहेत. ते जर आपण व्यवस्थीत मॅच करुन घेतलेतर नागरीकांना फायदा होईल व अधिकृत घरे बांधले जातील. अनेक नागरीकांच्या तक्रारी अशा आहेत की आमच्या जागेमध्ये १०० टक्के आरक्षण पडलेले आहे, असे खूप नागरीक आहेत. चऱ्होलीमध्ये, चिखलीमध्ये १०० टक्के रिझर्व्हेशन मध्ये प्लॉट गेलेले आहेत. आता शेतकऱ्यांना पैशाची गरज लागते तो म्हणतो आरक्षण ताब्यात घ्या

त्यावेळेला आपण म्हणतो तुमचे आरक्षण आताच आम्ही ताब्यात घेवू शकत नाहीत. त्या शेतक-यांना त्याच्या घरात अडचण निर्माण झाल्यास त्याला ती जागा विकल्याशिवाय पर्याय नसतो आणि आपण सांगतो आताच आम्ही ताब्यात घेवू शकत नाहीत, हा त्या शेतक-यावर अन्याय केला जातो. नगरसेवकांची अशी अपेक्षा आहे प्रत्येक नगरसेवकांना वॉर्डात गार्डन, प्लेग्राऊंड व्हावे असे वाटते. सर्वच नगरसेवक सांगतात आरक्षण डेव्हलप व्हावे. एवढे वर्षे झाले म्हणावे असे आरक्षण विकसीत झालेले नाही. त्याबाबत याठिकाणी प्रायोरीटी लिस्टच्या संदर्भात भूमिका घ्यावी. भूसंपादन करण्यासाठी आपल्याकडे निधी नाही, म्हणून टिडीआरच्या माध्यमातून जागा ताब्यात घेतो. परंतु नगरसेवकांची, नागरीकांची मागणी टॉप प्रायोरीटीवर एखादे गार्डन विकसीत व्हावे असे असेलतर ती मागणी आपण मान्य करावी. किमान प्रत्येकाच्या वॉर्डामधील दोन-दोन आरक्षण डेव्हलप केलेतर तीथला जो टॅक्सपीअर आहे, नागरीक आहे त्याला समाधान वाटेल की या नगरसेवकांच्या काळामध्ये या पाच वर्षामध्ये हे आरक्षण विकसीत झाले. या अत्यंत महत्वाच्या बाबी आहेत. आज जुनी गाव पाहीलीतर मला वाटते तेथील ५० टक्के सुध्दा डीपी प्लॅनची आपण अंमलबजावणी करु शकलो नाहीत. आज टिडीआरचा कन्सेप्ट आहे, नागरीकांच्या जागा अशाप्रकारच्या डेव्हलप केल्यामुळे फायदा होईल. प्लॅन पास झालातर प्लिंथ चेकींग लगेच केलीतर नागरीकांचे नुकसान होणार नाही.

**मा.आश्विनी चिंचवडे -** मा.महापौर साहेब, हा विषय पुररेषा सर्वेक्षण संदर्भात आहे. या विषयाला अनुसरुन चिंचवड गावातील रेडलाईन संदर्भातील माझा विषय होता. पुर्वी मी पुररेषेसंदर्भात प्रश्न विचारले होते, प्रश्नोत्तराच्या तासाला काही कारणास्तव मला उपस्थित राहता आले नाही. तो विषय तसाच राहून गेला. चिंचवड गावातील जी काही बांधकाम आहेत, जुने वाडे आहेत त्यांचे ब्ल्यू लाईनमुळे बांधकाम रखडलेले आहे माळीणगावा सारखी दुर्घटना होण्याच्या अवस्थेमध्ये वाडे आहेत. तरी लवकरात लवकर या विषयाला मंजूरी देवून त्या त्या विभागाला सूचना देवून हा विषय लवकरात लवकर निकाली काढावा अशी मी विनंती करते.

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ब-याचशा वर्षापासून हा रेंगाळलेला प्रश्न आहे. लाल पुररेषा, निळी पुररेषा यामध्ये अनेक जागामालकाचे खुप मोठयाप्रमाणावर नुकसान होते. हे सर्वेक्षणा बाबत आपल्यामार्फत किंवा महानगरपालिकेच्या माध्यमातून तशा प्रकारे काही गाईडलाईन देता आल्यातर त्याचा विचार करावा. निश्चितपणे याच्यामध्ये मोठयाप्रमाणात जागेवर रेडलाईन, ब्ल्यू लाईनचे डिस्टन्स वाढणार आहे. डिस्टन्स हा फिक्स केला पाहीजे. या सगळयांचा विचार करुन मंजूरी दयावी. दोन्ही बाजूने समान लाईन असाव्यात याचाही विचार करावा. अनेक प्रभागामध्ये भरपूर आरक्षण पेन्डीग आहेत. मध्यंतरी प्रभागवाईज मिटींग सुध्दा घेतलेल्या होत्या त्याच्यामध्ये प्रभागवाईज फोटो काढलेले होते त्यामध्ये प्रायोरीटी लिस्ट आहे. त्यामध्ये कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. दोन ते आडीच वर्षामध्ये कुठल्याहीप्रकारचे चांगले आरक्षण याठिकाणी घेता आलेले नाहीत. आडीच वर्षे आमचे वाया गेले असे वाटते. याठिकाणी चांगले डेव्हलपमेंट झालेले आहे असे कुठल्याही प्रकारचे सांगण्यासारखे झालेले नाही. गेल्या वेळेस आम्ही आरक्षणाच्या बाबतीत एक पत्र दिलेले आहे, कामाच्या बाबतीत पत्र दिलेले आहे ते आपल्याकडून याला उत्तर दयावे म्हणून विवीध विभागाला सुध्दा गेले. तुम्ही पत्र पाठविलेले आहे त्याची झेरॉक्सप्रत सुध्दा आलेली

आहे. कुठलीही मागणी केलीतर व्यवस्थीत उत्तर आपल्याकडून येत नाही. जे पत्र तुम्हांला दिलेले आहे त्याचीच प्रत आमच्याकडे येते. आमचे अडीच वर्षे वाया गेलेले आहेत. पुर्णपणे अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये आम्हांला सांगण्यासारखे काहीही नाही. गेल्या तीन-चार महीन्यामध्ये आपण सांगीतलेले होते की दर दोन तीन महीन्याला प्रभागामध्ये मिटींग घेवू असे आपण म्हणलेले होते, परंतु तशा नंतर मिटींग सुध्दा झाल्या नाहीत त्यामुळे प्रामुख्याने आरक्षण घेवून कार्यवाही करावी अशी विनंती करतो.

**मा.संपत पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह व अधिकारी. आयुक्त साहेब आपण स्वत: येवून जागेची पाहणी करुन पुररेषा निश्चित करावी. नदीकिना-यापासून पुररेषेचे अंतर किती असावे. आमच्याकडे नदीनाल्यापासून पुररेषा गेलेली आहे. २२ एकर आमच्या पवार फॅमिलीची जमिन आहे. तीन एकर जमिन पुररेषेच्या बाहेर जाते. तुम्ही स्वत: येवून पाहणी करुन पुररेषा ठरवावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सदस्य. माझ्या प्रभागामध्ये मासुळकर कॉलनीत ७७ व ७९ नंबरचे असे दोन आरक्षण आहेत. बेघरासाठी घरे असे आहे व २००९ पासून ते ताब्यात आहेत त्याठिकाणी प्रायव्हेट गाडया उभ्या राहतात त्यामुळे लोकांना त्रास होतो. ते आरक्षण डेव्हलप का करत नाहीत. दुसर एक आरक्षण आहे ते गार्डनसाठी आरक्षण आहे व ते आरक्षण अजून पर्यंत ताब्यात घेत नाहीत मी दोन वर्षापासून नगरपालिकेला पत्रव्यवहार करते, आरक्षण ताब्यात घ्या म्हणून सांगते ते घेतले जात नाही. तसेच ७३, ७४, ७५ व ७६ असे चार आरक्षण आहेत. पोस्ट ऑफीस, वाचनालय, दवाखाना, पार्कींगसाठी आहेत ते बीओटी तत्वावर डेव्हलप करण्यासाठी दिलेले आहे पण अजून पर्यंत त्याठिकाणी डेव्हलपींग काहीच झालेले नाही, त्याला शासनाची मान्यता आहे का**?** याचा खुलासा करावा.

**मा.अतुल शितोळे** - मा.महापौर साहेब, स्न्मा.सभागृह. जुना व नवा डीपी प्लॅन अगोदरच मंजूर झालेला आहे त्यातील आरक्षण विकसीत होणेही तेवढेच आवश्यक आहे. आपल्या शहरात तीन नदया वाहत असून यापुर्वीची ब्ल्यू लाईन टाकली त्यावेळेस तेथील स्थानीक लोकांना, स्थानीक नगरसेवकांना, पदाधिका-यांना कोणालाही विश्वासात घेतलेले नाही. त्या अधिका-यांनी मेरी या संस्थेनी ब्ल्यू लाईन आखली असे सांगीतले. परंतु ती आखताना त्यांनी ऑफीसमध्ये बसून ब्ल्यू लाईन आखलेली आहे. मधुबन कॉलनी ती सोडून मिलीटरीच्या भींतीपर्यंत त्यांनी ब्ल्यू लाईन केलेली आहे. माझ्याकडे आपण व्हीजीट केली तेथे आपण बघीतलेले आहे ९० टक्के भींत पुर्ण झालेली आहे. तसा पुराचा धोका पण कमी झालेला आहे. माझी एवढीच विनंती आहे की ही ब्ल्यू लाईन कमी करावी आणि हा विषय मंजूर करावा.

**मा.शत्रुघ्न काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आरक्षणे तसेच निळी आणि लाल पुररेषा व नदीचे सर्वेक्षण करण्यासाठी ४ कोटी प्रायव्हेट संस्थेला देतो. प्रायव्हेट संस्था सर्वेक्षण करत असताना मालकी हक्काच्या यादीतील रेकॉर्ड सिटी सर्व्हेला मॅच होणार नाही, कारण माझ्या वॉर्डामध्ये मोनार्च या संस्थेने सर्व्हे केलेला होता. त्या संस्थेच्या रेकॉर्ड प्रमाणे आणि सिटी सर्व्हेच्या रेकॉर्डप्रमाणे त्यामध्ये कमीत कमी

तीन ते चार मी.चा फरक पडलेला आहे. आपण ज्या संस्थेला काम देतो त्या संस्थेनी सिटी सर्व्हेच्या रेकॉर्डशी टिपण करुन केले पाहिजे. आपण ४ कोटी या संस्थेला देतो खरेतर ती संस्था काम करुन जाते. नगररचना विभागानी खुलासा करावा की अशा किती केसेस आपल्याकडे आहेत की ओव्हर लॅम्पींग झालेल्या आहेत. टाऊन प्लॅनींग सांगते सिटी सर्व्हेला जा, सिटी सर्व्हे सांगते त्यांच पत्र घेवून या तरी आपण यावर लक्ष दयाव.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सर्व सन्मा.सभागृह. आपल्याला याच्या पाठिमागचा सगळा इतिहास ब्ल्यू लाईन, रेडलाईनचा माहिती असेल किंवा नसेल. परंतु कुठेही अख्या महाराष्ट्रात किंवा पुण्याच्या आपल्या जवळच्या महानगरपालिकेमध्ये अशाप्रकारची कुठलीही लाईन आतापर्यंत आखली गेलेली नाही. परंतु तत्कालीन आयुक्तांच्या मागणीवरुन याठिकाणी ब्ल्यू लाईन आखण्याचे ठरले. याच्यापुर्वी दोन वेळेस सर्वेक्षण झाले त्यावेळेला काही पैसे खर्च झालेले आहेत. त्यावेळेला जो अहवाल तयार झालेला आहे तो अहवाल याठिकाणी सभागृहात आलेला नाही. किती घर त्यामध्ये बाधीत होतात, मी कुठल्याही बांधकाम व्यावसायीकांच्या संदर्भात बोलणार नाही. आश्विनीताईनी सांगीतले चिंचवड गावातील जुने घरे आहेत ती घर गेली कित्येक वर्षापासून त्यांची साधी भींत जरी पडलेली असेलतर, बांधकाम करण्यास परवानगी नाही. या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला कुठली साडेसाती लागली का. कुठल ग्रहण लागल हे माहीती नाही. आधी परवानग्या दिल्या गेल्या, मग ते बफर झोन असू देत आधी परवानग्या महापालिकेनी दिल्या व नंतर बफर झोन आले, रेडझोनच तसच झाल अगोदर परवानग्या प्राधिकरणाने दिल्या व नंतर रेडझोन प्राधिकरणावरती आले. ब्ल्यू लाईन, रेडलाईनच तसच झाल लोकांनी घर बांधली आणि आता तुम्ही नियम करता. या सर्वसामान्यांच्या घरासाठी वेगळा विषय झाला पाहिजे. मला एक शंका येते, शंका म्हणून सांगते महापौरासगट बरेचसे पदाधिकारी बाहेरच्या देशामध्ये फिरुन आलेले आहेत. आम्ही सुध्दा जावून बघुन आलेलो आहोत समुद्रात हॉटेल आहे. मुंबईमध्ये मंत्र्यांचे बंगले आहेत, त्यांना कुठ रेड, ब्ल्यू लाईन नाही आणि आपल्याला का खाजून अवदान आणण्याची गरज आहे हे मला समजत नाही. प्रत्येक गोष्ट अंगावर घेवून काम करण्याने महापालिकेचा विकास खुंटलेला आहे. हा विषय निश्चितपणे तुम्ही मंजूर करा किती दिवसही तहकूब ठेवलातर प्रश्न सुटणार नाही हे आम्हांला सगळयांना कळतयं परंतु यामध्ये जे विषय असतील ते प्रश्न मार्गी लागत नसतीलतर सर्वसामान्य नागरीकांचे बाबतीत कुठलातरी निर्णय घेतला पाहीजे. दुसरी एक शंका अशी येते की हा विषय लवकर नाही सुटलातर अशाप्रकारे जागेचे भाव पाडायचे, किंवा सर्वसामान्य लोक घर विकून दुसरीकडे निघून जातील आणि मग लाईन बदल करायची आणि त्याच्यामध्ये घुसायचं असा काही प्लॅन आहे की काय अशी शंका पण हाळू हाळू येवू लागलेली आहे. नाहीतर त्याच्याशिवाय अजून एक काम करता येईल ही जी तीनशे साडेतीनशे घर आहेत त्यांचे पुनर्वसन करुन दया. मराठीत एक म्हण आहे “आई जेऊ घालत नाही आणि बाप भिक मागू देत नाही” तुम्ही त्यांना काहीही करुन देत नाहीत, त्यांना त्यांच्या घरामध्ये कुठलीही सुविधा उपलब्ध करु देत नसालतर त्यांच्यावर खुप मोठा अन्याय आहे. सर्व प्रकारचे कर त्यांचेकडून घेत असताना त्यांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा देवू शकत नाहीत. त्यांची काहीच चुक नाही, नंतर ती लाईन आलेली आहे. तुम्ही कुठलातरी निर्णय घेतला पाहिजे

त्यासंदर्भात त्या लोकांची मिटींग घेतली पाहिजे, त्यांना जावून विचारल पाहिजे की तुमच्या काय अडचणी आहेत. या सभागृहाने निर्णय घ्यायचा आणि त्यांच्यावर लादायचा अशाप्रकारचा अन्याय त्या लोकांवर होवू नये अशी माझी विनंती आहे.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह विषय अवघड करुन ठेवला आहे, याच सन्मा.सभागृहाने. “आ बैल मुझे मार” तशी ही लाल, निळी, पिवळी, काळी सर्वच रेषा आखुन घेतलेली आहे आणि ज्यांनी आपल्या काळजाचे तुकडे, ज्या गावक-यांनी तीथे आलेल्या, स्थलांतरीत झालेल्या लोकांना दिले, विकले आज तेच लोक ज्या घरामध्ये राहतात त्या भींतीचेच पाणी व्हायची वेळ आलेली आहे. दोन-दोन, तीन-तीन फुट भींती आहेत आणि अशा वाडयामध्ये ते राहतात. काही कारणामुळे त्यांची शेती विकून आता तरुण मुल उदयोजक झालेली आहेत, त्यांची ईच्छा आहे की गावातील घर बांधावीत, काय चुक आहे त्यांची. त्यांनी घर बांधायच तर नाही, पण ते दुरुस्त सुध्दा करु देत नाहीत. मी ज्या भागात राहते त्या चिंचवड गावातील हा प्रॉब्लेम आहे. आमचे संपुर्ण गाव पुरनियंत्रण रेषेमध्ये आहे. मी अनेकवेळा बोललेले आहे आता आश्विनीताई चिचवडे त्याठिकाणच्या नगरसेवीका आहेत पुर्वी ९२ ते ९७ ला मी त्याठिकाणच नेतृत्व करत होते मा.आजीत दादा आले होते त्यादिवशी एक मुलगा खुप चौताळून आला आणि त्यांन विचारल की, काय झाल चिंचवडगावच, काय केल चिंचवडगावच तुम्ही, फक्त लाल आणि निळया रेषेमध्ये आम्हांला ठेवलेलं आहे. आयुक्त साहेब तो पुन्हा तुमच्याकडे आलेला होता, तुम्ही त्याचा नंबर घेतला होता. तरुण मुल चिडलेली आहेत त्याच एक उदाहरण मी तुम्हांला दिले. याठिकाणी याच राजकारण नाही. मी सुलभाताईना सांगते हा विषय मंजूर करायचे सर्वच पक्षान ठरविलेले आहे आणि तो आजच मंजूर करायचा आहे, त्यात आनंद आहे. आणि याच्यातही आनंद आहे की जी लाल आणि निळी पुररेषा आहे ती आता खुप कमी होणार आहे, खरं म्हणजे ती नकोच होती. पुण्यात खडकवासला सारख धरण फुटल खुप मोठा पुर आला आणि त्याचे अजून शंभर वर्षे झालेली नाहीत. म्हणजे शंभर वर्षे जिथं पाणी आलं तिथ ती लाल रेषा आहे. आता त्यांच्याकडे लालही नाही आणि पिवळीही नाही. अगदी जवळच मला वाटत शंभर-दोनशे फुटावर शनिवारवाडयाच्या तेथून जर पाहीलतर आगदी उंच भींत बांधलेली आहे. तेवढाच नदीचा आणि पुररेषेचा संबंध आहे त्याच्या शेजारी रोड आहे आणि रोडच्या पलीकडे घर आहेत. कुठलेही कुठल्या रेषेत नाही काही ऑब्जेक्शन नाहीत. उंच उंच इमारती तेथे उभ्या आहेत म्हणजे आपण थोडातरी त्याबाबतीत विचार करायला हवा. अर्थात आता तो सर्व वनवास या विषयामुळे संपणार आहे असं मला वाटत परंतु त्यासाठी आवश्यक असणारी ईच्छाशक्ती या प्रशासनाकडे पाहीजे. १९६७ साली जिल्हाधिकारी लेआऊट झालेला आहे आणि त्याठिकाणी असलेले जे आरक्षण आहे, ओपन स्पेस ठेवलेले आहे त्यावर आरक्षण आहे. १९९९ ला तेथे टेंडर काढलेले होते, कंपौंड बांधले गेले, उरलेला एक प्लॉट आहे, नगररचना विभागात गेलेतर ते म्हणतात ती जागा ताब्यात नाही, कायदा विभागात गेले, एकजण कोर्टात गेले होते तो कोर्टाचा निर्णय आणलेला आहे तो महापालिकेच्या बाजूने लागलेला आहे. तरीही आजतागायत त्या प्लॉटला कंपौंड घालण्याचे काम झालेल नाही. स्थापत्य म्हणते आमच्या ताब्यात नाही, नगररचना म्हणते आमच्या ताब्यात नाही. म्हणजे करायचं काय, अर्धा प्लॉट तुम्ही घेतला आहे. अर्ध्यासाठी सुध्दा आम्हांला या विभागात फिरावे

लागते. त्या प्लॉटच टेंडर काढलेले आहे तो प्लॉट आपल्या ताब्यात आहे म्हणूनच टेंडर काढलेले होते नां. मग आता तो परत कसा जातो. त्यानंतर त्याठिकाणी नगररचना विभागाच्या उपसंचालक मा. भदाणे मॅडमला सुध्दा हे सांगीतलेले आहे की तो प्लॉट बिल्डरच्या घशात कसा गेलेला आहे. माझ्या कॉलनीतील लोकांचा हा खुप मोठा प्रश्न आहे, मुलांना खेळायला जागा नाही. माझ्या प्रभागामधील स.नं.१९५ मधला १९० हा एक हेक्टरचा प्लॉट आहे तो महापालिकेच्या अधिका-यांनी ताब्यात घेतलेला आहे. साहेब, या अधिका-यांना तुम्ही बडतर्फ करायचय. मुलांच्या खेळाच्या मैदानावर त्यांनी अतिक्रमण करुन पत्राशेड बांधले त्यांचा संपुर्ण कार्यभार संपलेला आहे. मी तुम्हांला आल्यापासून सांगते, हे पत्राशेड काढून टाका कारण त्याठिकाणी अनधिकृत लोक राहतात. अनधिकृत घर पाडायच या अधिका-यांना कळतयं, आणि मग लोक वसवतात कसे? सगळया बाबतीत हेच अधिकारी दोषी आहेत ज्या लोकांना हे काम जमत नाही त्यांनी काम सोडून दयावे. त्याठिकाणी काय परस्थिती आहे हे रात्री फोन करते आणि सांगते मी. मी यानंतर तुमच्याकडे व्हॉटस् †पवर फोटो पाठवित जाईल. रोडवर फिरतात त्यावेळेला फोटो पाठवेल म्हणजे तुमच्या लक्षात येईल. त्या अधिका-यांना रात्री तेथे फिरायला पाठवा. तेथे पाणी पिण्यासाठी लोक टाकी वापरत नाहीत ती कशाला वापरतात आणि नळाखाली कसल माप लावतात त्यासाठी त्या अधिका-यांना म्हणा तेथे जावुन या, नाहीतर साहेब तुम्ही कोणालातरी पाठवाव. अशा भयानक अवस्थेमध्ये असे प्लॉट आहेत. याची महापालिकेनी सुध्दा जबाबदारी घेतली पाहीजे. आयुक्त साहेब, हे हजार वेळेस मी सांगीतलेले आहे यानंतर मी त्या अधिका-यांना सांगणार नाही. पाण्याच्या बाबतीत धो धो पाऊस पडतो आणि माझे लोक टेरेस वरुन पडणारे पाणी वापरत होते साहेब. अक्षरश: साहेब, डोळयामध्ये पाणी येत होतं. तुम्हांला सांगीतलतरी तुम्ही ऐकल नाही तुम्ही त्यांना सांगीतल तरी मी सांगेल तेवढेच पाणी दयायच. ते स्वत: तेथे टाकीवर जावून वॉलमनला भेटले. साहेब, आमचा त्यांचा काही वाईटपणा नाही. बोलण्यास सुंदर गोड बोलतात पण वॉलमनला जावून सांगीतले मी सांगेल तेवढेच पाणी दयायचे. आयुक्त साहेब आपण फोन केल्यानंतर आज आम्हांला पाणी व्यवस्थीत आलं. रेल्वेलाईन सोडलीतर तर पाणी भरपूर आहे आणि आमचे लोक रेल्वेलाईन ओलांडून पाणी आणतात. मला हे सांगायच आहे की आमच जे आरक्षण आहे ते त्यातून सोडवा आणि मुलांना मोकळा स्वास घ्यायला, खेळण्यासाठी ती जागा रीकामी करुन दया. त्यानंतर दुसर असं आहे साहेब, की जी निळी, लाल पुररेषा आहे ती आता कमी होणार आहे. मा.आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रयत्नाने तीन बंधारे फोडलेले आहेत आणि त्यामुळे आता आपोआपच बंधारे फोडल्यामुळे जो पाण्याचा फुगवटा येवून जी पुररेषा दुरपर्यंत गेलेली होती ती पुर नियंत्रण रेषा आता आपोआपच कामी होणार आहे. या विषयाला मंजूरी आम्ही देतोयं परंतु नगररचना विभागाने त्वरीत कार्यवाही करुन आरक्षण ताब्यात घ्यावीत तीन्ही ताब्यात घ्यावीत आणि कार्यवाही करावी ही विनंती.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता–

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ६

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.भाऊसाहेब भोईर मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २१४ दिनांक १०/०२/२०१४
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१७ दि.०५/०७/२०१४

श्री.अनिल एम.मेंगशेट्टी हे महाराष्ट्र शासनाच्या भूकंप पुनर्वसन प्रकल्पामध्ये दि४ डिसेंबर १९९५ रोजी रुजू झाले. भूकंप पुनर्वसन प्रकल्पामध्ये त्यांनी ४ डिसें. १९९५ ते ३० एप्रिल १९९८ या दरम्यान काम केले असून त्यांना उत्कृष्ठ अभियंता म्हणून विशेष गुणवत्ता प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन महाराष्ट्र शासनाने गौरविले आहे. प्रकल्प संपल्यानंतर दि.१८ एप्रिल २००२ मध्ये शासनाकडून पिं.चिं.मनपामध्ये कनिष्ठ अभियंता पदावर रुजू झाले. सन १९९५ ते २००२ म्हणजे एकूण ७ वर्षे सेवा जेष्टता कालावधीचे त्यांचे नुकसान झाले आहे. तसेच ७ वर्षाचे वेतनवाढीचे (Increment) नुकसान झाल्यामुळे त्यांचे सेवाजेष्टता व आर्थिक असे दोन प्रकारे नुकसान झाले आहे. श्री.अनिल मेंगशेट्टी यांचे पिं.चिं.मनपातील कामकाज चांगल्या प्रकारचे असल्यामुळे त्यांची सेवा जेष्टता न डावलता त्यांना ४ डिसेंबर १९९५ ची मानिव दिनांक देऊन त्यांना आर्थिक लाभ देणेत यावा. तसेच सेवा निवृत्तीसाठी ४ डिसेंबर १९९५ ही तारीख ग्राहय धरावी अशी शिफारस महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभाग मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, हे १९९५ रोजी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने रुजू झालेले आहेत आणि समजा कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने रुजू झालेल्या लोकांची सेवा जर आपण आपल्या या सेवेमध्ये ॲड करुन घेतलीतर, ग्राहय धरलीतर आमच्याकडे १९९७ मध्ये ३७२ घंटागाडी कामगार घेतलेले होते. आशा होती, त्याही लोकांना की आपण परमनन्ट होऊ परंतु आमच्याकडे एक असे अधिकारी होते की त्यांनी कामगारच्या ऐवजी कॉन्ट्रॅक्टर, ठेकेदार म्हणून त्यांना घेतल आणि त्या लोकांना कॉट्रॅक्ट पध्दतीन घेतल असं सांगीतल्यामुळे आजतागायत १९९७ मध्ये घेतलेले कॉन्ट्रॅक्ट मधले कामगार आजतागायत ते परमनन्ट झालेले नाहीत ही शोकांतीका आहे. त्यातले शंभर ते दिडशे मेले सुध्दा असतील. साहेब, कुत्रा मेलातर तेच लोक उचलून नेतात, आपले परमनन्ट कामगार हात लावत नाहीत. काहीही झालेतरी कितीही घाण काम असू दयात ते करतात. कोणीच नसतीलतर रात्री येवून हे लोक काम करतात. त्यांची सेवा ग्राहय धरली नाही कारण ते कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर आहेत म्हणून. परवा पक्षनेत्यांच्या सभागृहामध्ये हा विषय फेटाळण्याचे ठरलेले होते. हा विषय बदलून नंतर कोण फेरसादर करणार आहेत. आयुक्त साहेब आपण फेर सादर करणार आहेत का? शक्यच नाही. यांना मागच्या महिन्यात मेमो मिळालेला आहे तो काय मिळाला हे आम्हांला कळाव. आणि यांना तुम्ही फेर मेमो देणार आहेत का फेर

सादर करणार आहेत याचाही खुलासा करावा. आमच्याकडे कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने कामाकरीता वॉलमन आहेत तेच लोक कित्येक वर्षापासून काम करतात. पाण्याच्या टाकीवर मजूर म्हणून लोक काम करतात. कित्येक वर्षापासून ते काम करतात या सगळया लोकांचीही सेवा ग्राहय धरा व त्यांनाही परमनन्ट करा. तरी फेरसादर केल्यानंतर तुम्ही आम्ही कसा काय समाचार घ्यायचा आहे  हे घेवू यात.  हा विषय कोणाच्यातरी मेहरबानीने आणलेला असेलतर हा विषय दप्तरी दाखल करावा अशी मी विनंती करते.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी  प्रत्येक कमिटीत वेगवेगळे विषय येत असतात. आम्ही सर्वपक्षीय काम करतो, सर्व सहकारी आहेत. विधी समिती मधुन विषय आलेला आहे आणि म्हणूनच आम्हांला विधी समितीचा अपमान करायचा नाही. विधी समिती मध्ये आमचे सहकारी आहेत त्यांच्याकडून विषय आलेला आहे. भाऊसाहेब भोईर असतील, शितोळे असतील हा विधी समितीमधून विषय आलेला आहे. त्यादृष्टीने हा विषय प्रशासनाला योग्य वाटलेतर प्रशासनाने रितसर आणावा. म्हणजे त्यात कोणाच्याही मनामध्ये किन्तू परंतु असायचं कारण नाही. हा विषय योग्य असेलतर प्रशासनाकडून आणावा.  प्रशासन मान्य करणार असेलतर सभागृहामध्ये विचार करु. आम्हांला याच्यामध्ये  कुठल्याही सभासदाचा किंवा कमिटीचा अपमान करायचा नाही म्हणून हा विषय प्रशासनाकडे पाठवितो, प्रशासनाला योग्य वाटलेतर हा विषय आणावा.

**मा.शमीम पठाण** - मा.आयुक्त साहेब, आपण हा विषय मांडू शकतो का? तुमच्या नियमात बसतो का?  प्रशासनाकडून हा विषय येवू शकतो का?

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. हा सदस्य प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव विधी समिती मार्फत आलेला आहे. आयुक्तांनी ठेवलेला नाही. प्रश्न असा आहे की सन्मा.सदस्य भाऊसाहेब भोईर यांचे नाव त्यामध्ये आहे. ते काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आहेत त्यांनी प्रस्ताव ठेवलेला आहे. हा विषय दप्तरी दाखल करणार आहोत परंतु दप्तरी दाखल केल्यामुळे अधिका-यांवर अन्याय होत असेलतर  त्याबाबतची शहनिशा प्रशासनाने करावी. त्यांना विषय आवश्यक वाटलातर आणावा अन्यत: दप्तरी दाखल करावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.उल्हास शेट्टी** -  मा. महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक -५३५ विषय क्रमांक - ६

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.भाऊसाहेब भोईर मा.शैलजा शितोळे यांचा प्रस्ताव.

२) मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक २१४ दिनांक

१०/०२/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१७ दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक ६ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत चाकण, देहू, आळंदी, हिंजवाडी, म्हाळुंगे मोई, मारुंजी व इतर परिसराचा समावेश करणेबाबत शासनास मनपाचे अभिप्राय सादर करणेपूर्वी सर्व पदाधिकारी यांची बैठक दि.३०/०८/२०१३ रोजी मा.आयुक्त यांचे कक्षात घेण्यात आली. सदर बैठकीत मनपा हद्यीच्या उत्तरेकडील १४ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील ६ गावे मनपा हद्दीत समावेश करणेबाबत सविस्तर चर्चा करणेत आली आणि सदर हद्दवाढीचा प्रस्ताव मा.शहर सुधारणा समिती मार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर करणेबाबत चर्चा झाली तथापि सद्य:स्थितीत मनपा हद्दीला लागून असलेली गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणे योग्य होईल. त्यानुसार खालील नमुद मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई, निघोजे, देहू, विठ्ठलनगर आणि मनपा हद्दीच्या पश्चिमेकडील गहुंजे, जांबे, मारुंजी, हिंजवाडी, माण, नेरे, सांगवडे ही मनपा हद्दीला लागून असलेली एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ५३६ विषय क्रमांक - ७

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दि.०४/०९/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४७ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५८ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५१९ दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या उत्तरेकडील आणि मनपा हद्दीला लागून असलेली ७ गावे आणि मनपा हद्दीच्या पश्चीमेकडील ७ गांवे अशी एकूण १४ गावे मनपा हद्दीत समाविष्ट करणेबाबत प्रस्ताव मान्यतेकामी पुढील प्रमाणे आहे. मनपा हद्दीत समाविष्ट करावयाचे गांवे- मनपा हद्दीच्या उत्तरे कडील ७ गावे- आळंदी, चिंबळी, कुरुळी, मोई,निघोजे, देहू, विठ्ठलनगर.

मनपा हद्दीच्या पश्चीमे कडील ७ गांवे- हिंजवडी, जांबे, माण, मारुंजी, नेरे, गहुंजे, सांगवडे वरीलप्रमाणे प्रस्ताव पत्र क्र.नरवि/कावि/१०/५९२/२०१३ दिनांक ४/९/२०१३ अन्वये मा.शहर सुधारणा समितीमार्फत मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला आहे. प्रस्तुत विषयी मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांनी दि.१०/०९/२०१३ च्या पत्राने खेड तालुक्यातील आळंदी, चाकण, मोई, कुरुळी, निघोजे, चिंबळी, केळगांव, सालुंब्रे, महाळुंगे, खराबवाडी, नाणेकरवाडी, मेदनकरवाडी, कडाचीवाडी या गावांचा पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत समावेश होणेबाबत विरोध केला असल्याचे आणि सदर गांवे मनपा हद्दीत समावेश करु नये असे नमूद केले असून त्यासोबत ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत जोडली आहे. प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर केलेला असल्याने या विषयासोबत मा.आमदार श्री.दिलीप मोहिते यांचे पत्र व त्यासोबतचे सहपत्रे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५३७ विषय क्रमांक - ८

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. नरवि/कावि/१०/५९८/२०१३ दि.०७/१०/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.४८ दि.१८/१२/२०१३

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४५९ दि.२०/०१/२०१४

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२० दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक ८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले

-----

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशासन/८/कावि/१७५/२०१४ दिनांक २५/०२/२०१४

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.४८९ दि.०५/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने क्षयरोग तपासणीसाठी आणलेले मशीन वापराविना पडून असलेबाबत विधानमंडळ सन २०१३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र. ३७९२० व विधानसभा तारांकित प्रश्न क्र.१०६१६७ उपस्थित झालेले आहेत. याबाबत मा.मंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये दिलेल्या अश्वासनानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाने दि.२०/०३/२०१३ रोजीच्या पत्रान्वये विनावापर मशीन पडून राहण्यास जबाबदार असणा-या अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करणेबाबत आदेश दिलेले आहेत. सदर प्रकरणी द्विसदस्यीय समितीने सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories क्षयरोग तपासणी उपकरण खरेदी निविदा प्रक्रियेमध्ये व मशीनच्या किंमतीबाबतचे कामकाजात गंभीर स्वरुपाची अनियमितता आढळून आल्याने दिनांक २३/०४/२०१३ चे आदेशान्वये श्री.लोखंडे तानाजी मन्याबा भांडारपाल व श्री.गराडे ज्ञानदेव नामदेव उपलेखापाल या कर्मचा-यांना सेवानिलंबित करुन खातेनिहाय चौकशीकामी आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

द्विसदस्यीय समितीने सादर केलेल्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार

१. BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories क्षयरोग तपासणी उपकरण खरेदीच्या निविदा प्रक्रिया कामकाजात आढळलेल्या अनियमित बाबीस डॉ.नागकुमार कुणचगी निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी व डॉ.राजशेखर अय्यर निवृत्त वैद्यकीय संचालक

२. सदर उपकरणाच्या किंमतीबाबतचे कामकाजात आढळलेल्या अनियमित बाबीस डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी

३. BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories क्षयरोग तपासणी उपकरण विनावापर बंद राहणेस डॉ.नागकुमार कुणचगी निवृत्त

आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.राजशेखर अय्यर निवृत्त वैद्यकीय संचालक डॉ.आनंद जगदाळे निवृत्त वैद्यकीय अधिक्षक वायसी.एम.एच.

हे अधिकारी जबाबदार असल्याचा प्राथमिक निष्कर्ष प्राप्त झालेला आहे.

तरी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम 1982 मधील 27 (2) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्तहोण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही, अशी तरतुद आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम 45 मधील तरतुदीनुसार आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची "नियुक्ती प्राधिकारी" महापालिका ही आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, डॉ.राजशेखर अय्यर, निवृत्त वैद्यकीय संचालक व डॉ.आनंदराव जगदाळे, निवृत्त वैद्यकीय अधिक्षक हे महापालिका सेवेमधून निवृत्त झालेले असून प्राथमिक चौकशी अहवालानुसार BACTEC® MGIT™ 960 System for Micro Bacteria Testing with Accessories या क्षयरोग तपासणी उपकरण प्रकरणातील अनियमित बाबी व सदर उपकरण विनावापर बंद रहाण्यास त्यांची सकृत दर्शनी जबाबदारी निश्चित होत आहे. यास्तव प्रकरणी डॉ.नागकुमार कुणचगी, निवृत्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी, डॉ.राजशेखर अय्यर, निवृत्त वैद्यकीय संचालक व डॉ.आनंदराव जगदाळे, निवृत्त वैद्यकीय अधिक्षक यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदींच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे -** मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, सभागृह व पत्रकार बंधु. क्षयरोग तपासणीसाठी आणलेले मशीन वापराविना पडून असलेबाबत विधानमंडळ सन २०१३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानपरिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्यामध्ये तीन वैदयकीय अधिकारी व दोन कर्मचारी या कर्मचा-यांना सेवानिलंबित करुन खातेनिहाय चौकशीकामी सभागृहात विषय आलेला आहे. असा विषय दोन-दोन वर्षानी खातेनिहाय चौकशीसाठी येतो. सदर मशीनसाठी निवीदा क्र. ७ नुसार २०११-१२ मध्ये जाहीरात देणेत आली होती. सदर मशीनची किमंत १७,२०,२२४/- इतकी असून ती ३५ लाखावर गेलेली असताना पुन्हा किमंत वाढवली पुन्हा वाढवून सुध्दा ५०,६६,७००/- रुपये

मंजूर केलेले आहेत ही किमंत वाढविण्याचे कारण काय? सदर मशीनच्या निवीदेतील अटि व शर्ती बाबत तत्कालीन आयुक्त यांनी शंका घेतली असताना सुध्दा त्यांच्या शंकेचे निरसन न करता ती खरेदी करण्यात आलेली आहे. सदर मशीन आयात केलेली तारीख ४/२/२०१२ असताना जकात पावती दि. २/३/२०१२ ची कशी? सदर मशीनचे निवीदेतील चुकाबाबत तत्कालीन मा.आयुक्तांनी शेरा मारलेला असताना त्याबाबतीत चौकशी करण्याचे का टाळलेले आहे. त्यामध्ये पारदर्शकता असणे गरजेचे होते. दक्षता विभागाने खरेदी प्रक्रिया छाननी करण्याचे का टाळले, राज्याच्या मुख्य ऑडीट विभागाकडून ऑडीट होत असताना देखील ही निवीदा ऑडीटपासून लपविण्यात आली ते लपविण्याचे कारण काय? व कशासाठी. संपुर्ण खरेदी प्रक्रिया सदोष व संशयास्पद असून त्याबाबतचा खुलासा होवून दोषीवर कडक कारवाई होणे आवश्यक आहे. आयुक्त साहेब, वायसीएम मध्ये असे प्रकार होत असतीलतर, ३१ जुलैला, पेपरमध्ये आलेले आहे उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत, असा कारभार महापालिकेतून होत असेलतर महापालिका बरखास्त करावी. वैदयकीय अधिकारी, आयुक्त, महापौर यांनी वायसीएमकडे लक्ष देणे आवश्यक आहे. असे प्रकार झालेतर महापालिका बरखास्तीची वेळ येवू नये. असे झालेतर आमच्या सारखे नवीन सदस्य आहेत काहींच्या दोन-दोन, तीन-तीन टर्म झालेल्या आहेत परंतु आमच्यासारख्या नवीन सदस्यांची मान पण जाईल व गळी पण जाईल. म्हणून त्यासाठी सर्वानी मान जाऊ नये यासाठी या विषयावरती जास्त लक्ष देवून ही महापालिका बरखास्त व्हायला नको यावर लक्ष दयायला पाहिजे. आपल्या महापालिकेमध्ये काय काय घोटाळे चालतात याकडे लक्ष दयावे. या विषयाची चौकशी करावी. वायसीएममध्ये असे प्रकार होत असतात त्याच्याकडे लक्ष दयावे व चांगल्या प्रकारे चौकशी करावी.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मायक्रो बॅक्टेरीया टेस्टींग मशीन पाच वर्षे वापरलेले नाही ते वायसीएम मध्ये पडून होते. या बद्दल विधानपरीषदेमध्ये तारांकीत प्रश्न उपस्थित झाला त्यावेळेला मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले होते. याबद्दल चौकशी होणार आणि ज्यांनी चुक केली त्यांच्यावर कारवाई होणार. त्या नंतर मंत्रालयातून चौकशी संदर्भात पत्र आले, त्यामध्ये मेन्शन केलेले आहे. या मशीनची अनियमीतता आहे व पाच वर्षे पडून होती याबद्दल तीन डॉक्टरांना दोषी ठरविलेले आहे. ते डॉक्टर काही आपले दुष्मन नाहीत आपले मित्र आहेत परंतु चुक केली आहे, चुक केलेल्या माणसाला असे सोडलेतर पब्लिक आपल्याला माफ करणार नाही. पब्लिकने आम्हांला निवडून दिलेले आहे. माणूस कोण आहे ते आपल्याला बघायच नाही, मला माहिती आहे डॉ.नागकुमार हे आजारी आहेत, डॉ.अय्यर हे माझ्या वॉर्डात राहतात ते माझे मतदार आहेत. पण ज्या अर्थी इन्क्वॉयरी कमिटी सांगते, ते तुम्ही नजरअंदाज करु शकत नाहीत. अतीक्रमणसाठी १५५ पद भरण्याबाबत गेल्यावेळेस विषय होता, मी सांगीतलेले होते कोर्टाने आदेश दिलेले आहेत हा

विषय पास करावाच लागेल पण तो विषय तुम्ही फेटाळला. काय झाले, असे कामकाज चालत असेलतर पिंपरी चिंचवड महापालिका बरखास्त करु असे कोर्टाने सांगीतले. आता तो ठराव २३ तारखेच्या अगोदर पास करावाच लागेल. एकतर दप्तरी दाखल झालेला ठराव तीन महीने घेवू शकत नाही आता तो ठराव १ के खाली घेवून तो ठराव करावा लागेल अन्यत: हायकोर्ट आपल्याला बरखास्त करणार. बरखास्त करुन घ्यायच का ? येथे अनेक नवीन नगरसेवक निवडून आलेले आहेत. असाच विषय आहे, कोणीतरी पीआयएल म्हणून गेले आणि हायकोर्टाचे आदेश आणले. येथे कमिटीने इन्क्वॉयरी केलेली आहे त्याच्यावर कारवाई करण्यासाठी आयुक्त परवानगी मागतात, नाही दिलीतर आपण भ्रष्टाचाराला सात देतो असा अर्थ होतो. मला सभासदांना विनंती आहे हा ठराव न फेटाळता आयुक्तांना पुढील कारवाई करण्यासाठी परवानगी दयावी. कारवाईमध्ये काय होणार आहे त्यांना काही फाशी लागणार नाही. त्यांच्याकडून वसुली होईल दुसर काय होणार आहे मग का परवानगी देत नाहीत. आपण परवानगी दिली नाहीतर आयुक्त हे करु शकणार नाहीत का? आपल्या माहीतीसाठी सांगतो, कमीशनरांना आपण केलेला ठराव रद्द करण्याचा सुध्दा अधिकार आहे. तरी माझी विनंती आहे हा विषय दप्तरी दाखल करु नका आयुक्तांना पुढील कारवाई करण्यासाठी परवानगी दयावी व हा विषय मंजूर करावा.

**मा.अजीत गव्हाणे** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त साहेब व सन्मा.सभागृह. याठिकाणी आर.एस.कुमार व राजेंद्र जगताप यांनी या विषयासंदर्भात भूमिका मांडत असताना सांगीतले हा विषय दप्तरी दाखल करु नये. हा विषय तसा फार गंभीर स्वरुपाचा आहे परंतु दुसऱ्या बाजूने पाहिलेतर सभागृहात गेली अनेक वर्षे आपण काम करतो या सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यकालामध्ये खुप चांगल काम या महापालिकेमध्ये केलेले आहे. मग वायसीएम असेल किंवा आरोग्य डिपार्टमेंटमध्ये डॉ.अय्यर असतील, डॉ.जगदाळे असतील यांनी खुप चांगल काम महापालिकेमध्ये केलेले आहे. सर्वसामान्य नागरीकांचे नगरसेवक म्हणून आम्ही सांगीतले नंतर मदत करण्याचे काम त्यांनी केलेले आहे. वायसीएममध्ये नागरीकांवर उपचार करण्यासाठी नेहमीच या लोकांनी चांगले काम केलेले आहे आणि म्हणून सभागृहाला असे वाटते या अधिकाऱ्यांवर अशी कठोर कारवाई होवू नये. दुर्दैवाने त्यांच्याकडून नजरचुकीने, कळत न कळत अशी घटना घडलेली आहे त्याच्यावरती चौकशी झाली त्यामध्ये ते दोषी दिसतात यासंदर्भात जेव्हा विधानसभेमध्ये आणि विधानपरिषदेमध्ये तारांकीत विषय मांडला, खुलासा केला. मा.मंत्री महोदयानी आदेश दिले त्यानंतर हा विषय प्रशासनाच्या माध्यमातून आलेला आहे. आम्हांला सर्वांना असं वाटतं की, शंभर टक्के चुक झालेली आहे याच्याबद्दल दुमत नाही. या अधिका-यांना त्यांचे म्हणणे मांडण्याचा खुलासा करण्याचा अधिकार आहे. हा विषय सभागृहापुढे आलेला आहे सभागृहाने संबंधीत अधिका-यांकडून खुलासा घ्यावा, चुकले असेलतर शासन झाले पाहिजे,

चुकले नसेलतर त्यांच्यावर नाहक अन्याय होवू नये. डॉ.जगदाळे यांना शेवटच्या दिवशी अशी ऑर्डर दिलेली होती. नौकरीच्या शेवटच्या दिवशी डॉ.जगदाळे यांच्यावर अन्याय झाला अशी आमच्या सगळयांची भावना होती. एकदम टोकाचा निर्णय आपल्याला कदाचित घेता येणार नाही. प्रशासनाकडून आपण खुलासा घ्यावा आपल्या सगळयांना वाटतं की त्या अधिका-यांना मदत व्हावी परंतु ते करत असताना महापालिकेच्या सभागृहाची सूध्दा अडचण हावू नये. त्यामुळे जर पहिल्यांदा प्रशासनाकडून खुलासा केलातर आणि नेमक आपल्याला काय करता येईल त्यासंदर्भात सांगीतलतर निश्चितपणे आपल्याला पुढील निर्णय घेणे सोपे होईल. याच्यावर खुलासा व्हावा म्हणजे राजेंद्र जगताप आणि आर.एस.कुमार यांचेही समाधान होईल आणि मग एकमताने आपण निर्णय घ्यावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह मी प्रथम सन्मा. राजेंद्र जगताप, सन्मा. आर.एस.कुमार यांना सांगतो की कोणत्याही परिस्थितीमध्ये मला विरोध करायचा नाही किंवा कोणाचा अवमान करायचा नाही. मला असे नमूद करायचे आहे की या प्रकरणामध्ये ज्यावेळेला तारांकीत प्रश्न केला गेला त्यावेळी आपले त्यावेळचे आयुक्त मा. श्रीकर परदेशी यांनी त्यांच्या स्वाक्षरीने तात्काळ दि.१४/३/२०१३ रोजी लेखी उत्तर शासनाला दिलेले आहे. त्या उत्तरामध्ये त्यांनी असे नमुद केलेले आहे की, सदर मशीन खरेदी करण्यासाठी नियमानुसार निवीदा प्रक्रिया राबवून जास्त खपाच्या वृत्तपत्रामध्ये दै.टाईम्स ऑफ इंडीया व दै.इंडीयन एक्सप्रेस या वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती. तसेच सदरची नोटीस मनपाच्या वेबसाईटवर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने आलेल्या निवीदांपैकी लोएस्ट दराच्या ठेकेदाराची सक्षम समितीची मान्यता घेवून निवीदा प्रकिया पुर्ण केलेली आहे. त्यामुळे सदर विचारलेले प्रश्नामधील उल्लेख खरा नाही अशाप्रकारचे मा.आयुक्त हे उत्तर देत असतीलतर आणि तद्नंतर एखादया वर्तमानपत्रामध्ये छापून आल्यानंतर शंकर भगवानांचा तीसरा डोळा उघडतो तसा परदेशी साहेबांचा तीसरा डोळा उघडला आणि त्यानंतर शहनिशा सुरु केली. स्वत: लेखी उत्तर दिलेल आहे मग त्यानी विधानसभेमध्ये सर्वांची चेष्टा केली का? महाराष्ट्र शासनाला त्यांनी फसवल का? एखादया जबाबदार आयुक्तांनी असं उत्तर देण्यापुर्वी त्याची शहनिशा का केलेली नाही? हे सगळ झाल त्यावेळेला याठिकाणी ती समिति होती, स्थायी समिती होती, त्यावेळेचे चीफ ऑडीटर होते, त्यावेळेचे एमओएच होते, त्यावेळचे मा.आयुक्त होते, त्यावेळचे सर्व संबंधीत अधिकारी होते. त्याच्या पलीकडे जावून सर्वांना सांगतो की हा जी.बी.चाच अधिकार आहे म्हणून आपल्या समोर विषय आलेला आहे. आपल्याला निर्णय घेण्याचा अधिकार आहे. कोर्टात कोणाला जायचे असेलतर तो नंतरचा विषय आहे. त्यात कायदयाची अजून एक तरतूद आहे. कोणतेही असे प्रकरण त्या तारखेच्या चार वर्षे जूने असेलतर ते नियमाने घेता येत नाही हे सुध्दा प्रोव्हीजन

आहे.फायनान्स डिपार्टमेंटचे १९८२ चे ते नोटिफिकेशन आहे. त्यात स्पष्ट म्हणलेले असताना २००७ मधील प्रकरण २०११ मध्ये असे चार वर्ष पुर्ण झालेले आहे. अजीत गव्हाणे यांनी उल्लेख केलेला आहे त्यामध्ये प्रशासनास विचारु शकतो. डॉ.जगदाळे यांना शेवटच्या दिवशी दोन तास असताना आयुक्तांना असं वाटलं. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब त्यावेळेला प्रशासनाचा चार्ज टेकाळे साहेब यांच्याकडे नव्हतातर अमृतराव सावंत यांच्याकडे होता. त्यावेळेला प्रशासनाने आयुक्तांना दिलेली सात सुध्दा चुकीची आहे, प्रशासनाने सुध्दा खोडसाळपणा केलेला आहे चुक केलेली आहे. जो माणूस शेवटच्या क्षणाला रिटायर्ड होणार त्यांना नियम आठ लागू करता येतो का? याचा खुलासा टेकाळे साहेबांनी करावा नंतर बोलण्यास परवानगी दयावी.

**मा.टेकाळे (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आता जो विषय आलेला आहे तो सन्मा.सदस्यांनी सांगीतले त्याप्रमाणे अपॉईटींग †थोरेटी महापालिका आहे. सेवानिवृत्ती झाल्यानंतर अपॉईटींग †थोरेटीच्या परवानगीनेच कार्यवाही सुरु करता येते त्यामुळे या परवानगीसाठी हा विषय आलेला आहे. कलम आठची कारवाई सेवानिवृत्तीच्या बाबतीत करता येते का? असे विचारले त्यासंदर्भात ज्यावेळेला डॉ.जगदाळे रिटायर्ड झाले त्या शेवटच्या दिवशी कार्यरत असताना त्यांच्यावर कार्यवाही सुरु केलेली आहे.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, कार्यवाही म्हणता येत नाही. नियम आठ व्यवस्थीत वाचावा. अशाप्रकारच चार्जशीट जरी दयायच असेलतर कलम २७ खाली दयायला पाहिजे. तुम्ही २७ खाली न करता कलम आठ खाली जे केलेले आहे ते एकदम चुकीच आहे. २७ नियम रिटायर्ड माणसाला लागतो, कर्यरत असताना दोन तास. साहेबांच परिपत्रक तुम्ही वाचून बघा त्यामध्ये परवानगी न घेता सिस्टर लोकांच्या बदल्या केल्या, याच्यामध्ये कुचराई केली त्यावेळेला नियम आठ लावता येत नाही. एक पत्र दिल म्हणजे काय कार्यवाही सुरु झाली का? चार्जशीट दिले नाही, कारवाई निश्चित करण्यापुर्वी जी.बी.ची परवानगी का मागीतली नाही? दोन महीन्यानंतर चार्जशीट दिले. डॉ. जगदाळे जानेवारीमध्ये रिटायर्ड झाल्यानंतर चार्जशीट दिलेल आहे मार्च महीन्यामध्ये. चार्जशीट देतांना समजा आयुक्तांना वाटले खुप मोठा भ्रष्टाचार झाला, समाजाची लूट झाली, महापालिकेची लुट झाली, खुप त्यामध्ये भयंकर झालेतर जनरल बॉडीमध्ये महीनाभरातच विषय आणायला पाहिजे होता. तुमच्या मनाचा कारभार आहे का? जनरल बॉडीला तुम्ही झिरो बॉडी समजता का? आता तुम्हांला कसं कळलं की जनरल बॉडी समोर यायचं. डॉ. जगदाळे यांची डिपार्टमेंटली इन्क्वॉयरी चालू केली ती कोणाच्या परवानगीने केली? जी.बी.पुढे महीनाभरात का आलेले नाही? हे सर्व हेतुपूरस्सर केलेले आहे. पुढचा विषय कपिलेबाबतचा तसाच आहे. त्यावेळेला परदेशी यांना जाताना त्यांना प्रसिध्दी मिळवायची

होती त्यामुळे त्यांनी रात्रभर बसून याच पुराण काढ, त्याच पुराण काढ अस करुन त्यांना त्यांची बदली रोखायची होती. मी किती चांगल काम करतो, आणि मला बाहेर पाठवता हे दाखवायच होतं. केवळ त्यांनी प्रसिध्दीसाठी हे केलं. कपिलेची  एका टेंडरला स्वाक्षरी नाही, त्यांना फक्त तीन लाखाचे अधिकार आहेत आणि त्यांना घरी बसविलं. अरे, वाचा जरा वाचा, कोणीतरी अधिका-यांनी हिम्मत करा की, आयुक्तांना खरं काय आहे ते सांगायची, एकमेकाचे नरडे दाबण्यासाठी बसलेले आहेत.  डॉ.नागकुमार यांनी चांगली सेवा केलेली आहे. हां, एक निश्चित मान्य करतो की, एवढं महागड हे मशीन पडून राहीले त्यामध्ये दुर्लक्ष केले गेले हे मी मान्य करतो त्यामध्ये त्यांची कसुराई आहे. हे मशीन घेतल गेल त्याच्या मागची पार्श्वभूमी सुध्दा आपल्याला सांगतो की वायसीएम हॉस्पिटल माझ्या वॉर्डात आहे. माझे नेहमी तेथे येणे-जाणे असते. वास्तविक पाहता हे मशीन घेताना ते तालेरा हॉस्पिटलसाठी घेतलेले होते कारण पुर्वी टि.बी.चे सर्व काम तालेरा हॉस्पिटलमध्ये व्हायचे.  डॉ. अय्यर यांनी सर्व प्रपोजल दिलेले होते आणि मशीन आल्यानंतर सर्व डॉक्टर एकत्र बसले आणि ते म्हणाले की हे छोटस आहे त्याच्या रिक्वॉयरमेंट रुमप्रमाणे ते जास्त असेल, हाय प्रेशरच रुम लागत त्याच प्रोव्हीजन आपण नंतर करु आणि  डॉ.मोकाशी हे एकमेव मायक्रोबायोलॉजीस्ट आपल्याकडे  होते त्याना काम करायचे नव्हते त्यामुळे त्यांने मला चार मशीन पाहिजे, मला चार टेक्निशियन पाहिजे, मला तीन रुम पाहिजे, मला हाय प्रेशर रुम पाहिजे, अशी मागणी केली. आज ससूणमध्ये जावून बघावे त्याठिकाणी सुध्दा हाय प्रशेर रुम नाही. त्याला टि.बी. होईल म्हणून भीती होती म्हणून मोकाशीन काम केलेल नाही. वास्तविक पाहता या डॉक्टर लोकांनी त्या डॉ.मोकाशीवर कारवाई करायला पाहिजे होती. यांच्याकडून हलगर्जीपणा झालेला आहे तो आम्ही मान्य करु. पण त्यावेळच्या आयुक्तांनी सही केली त्यांची चुक नाही का? चीफ ऑडीटरनी सही केली त्यांची चुक नाही का?  ज्या डॉक्टरांनी मान्यता दिली त्यांची चुक नाही का? आणि भांडारपाल आणि लेखापाल या गरीबाना तुम्ही सस्पेन्ड केलं आणि ते सुध्दा २००७ मधल्या प्रकरणात. बंड साहेबांच्या काळात अशा किती खरेदी झाल्या. आयुक्त साहेब हे प्रकरण आपण नीट वाचून घ्यावं  तुम्हांला दया येईल, हे हेतुपूरस्सर काम केलेल आहे. आता आयुक्त साहेबांना जर वाटल तुकडे तुकडे होतात आपण फिलप करु,  टर्न की काढलेले आहे, गजानन बाबर, आझमभाई पानसरे यांच्या मिटींगमध्ये मी स्वत: उपस्थित होतो. त्यांनी सांगीतल की ताबडतोब मला हायटेन्शन हालवून पाहिजे. त्यावेळेला साहेबांनी सांगीतल हे टर्न कीच काम आहे एक्झिक्यूटिव्ह इंजिनीअरला तीन लाखाचे अधिकार आहेत.  सिंग साहेब वारले, बंड साहेब रिटायर्ड झाले. मेला  बीचारा कपिले, का बरं, काय चुकल कपिलेचं.  कामाचे तुकडे कोणी केले, तुकडे कामाचे होते, अयुक्तांनी क्लब करायला सांगीतले कारण टर्न की करायची. बंड साहेबांच्या वेळेला अशी अनेक काम जी झाली ती टर्न की मध्ये झालेले

आहेत मग ती सिव्हीलच काम असेल किंवा इलेक्ट्रीकच काम असेल. कारण काम वेगान करता येत, मशीनरी लावता येते, महापालिकेचे पैसे वाचतात, वेळ वाचतो. त्यांच्यावर दुसरा आरोप असा होता की त्यांनी ठेकेदाराला मुदतवाढ दिली. समजा मी एक ठेकेदार आहे व मला तुम्ही काम साठ लाखाच, दहा कोटीचे दिलेल आहे आणि आर्थीक तरतूद समजा ८० लाखाची आहे, मी काही मुर्ख ठेकेदार आहे का? ८० लाखाची तरतूद असताना दहा कोटीच्या कामाच तुम्ही मला डीलींग केल आणि बंड साहेबांनी हे सगळ केल्यानंतर सगळया सभागृहाला माहिती आहे इतके पैसे खर्च झाल्यानंतर ज्यावेळेला आशिष शर्मा यांनी चार्ज घेतला त्यावेळेला महापालिकेची आर्थीक परिस्थिती खुळखूळी झालेली होती, आशिष शर्मानीं सर्व विभागाच्या एचओडीला बोलावल आणि सांगीतल जर दिलेल्या तरतूदीपेक्षा जास्त पैसे खर्च केलेतर तुम्हांला पैसे भरावे लागतील मी कुठल बील पेड करणार नाही. अशा परिस्थितीमध्ये जर मी निवीदा फ्लोट केलेली आहे मला तुम्ही काम दिलेल आहे त्या आर्थीक वर्षामध्ये जर तुम्ही तरतूदच ठेवली नाहीतर त्या ठेकेदारावर कारवाई कशी करायची? जर पैसे असतीलतर तो काम करेल नां. केबलचे पैसे भरुन घेतले, सगळे करुन घेतले. साहेब, तुम्हांला सभागृहाच्या वतीने माझी विनंती आहे की, आम्ही म्हणणार नाही की तुम्ही भ्रष्टाचाराला पाठिशी घाला, तो विषय नाही परंतु याच्या पुढचा विषय जो आहे तो तुम्ही नीट बघा. त्यामध्ये कपिले यांची पुर्ण फाईल वाचा, आम्हांलाही दहा मिनीटे दया, त्यावर चर्चा करा आपण बघावे काहीही कारण नसताना त्यांना बळीचा बकरा केले आहे. अशा परिस्थितीमध्ये माझी विनंती आहे की, हा आपला अधिकार आहे या डॉक्टरांनी चांगली सेवा केलेली आहे. त्याला कायदेशीर मुद्दा असा आहे की २००७ मधील हे प्रकरण आहे चार वर्षा पुर्वीचे प्रकरण आहे त्यामुळे हे डिबार झालेले आहे त्यामुळे महापालिका सभागृहाला असलेल्या अधिकारमध्ये हा विषय आम्ही दप्तरी दाखल करत आहोत.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, चार डॉक्टरांनी एक कोटीचे मशीन पावणेतीन कोटीला घेतले, त्याबद्दल या जनरल बॉडीमध्ये चर्चा पाहीजे का? ज्या कमिटी आयुक्तांनी निर्माण केल्या होत्या त्यामध्ये भोसले साहेब, इंगळे आणि डॉ.कनोज होते या कमिटीने निर्णय दिलेला आहे, आयुक्त साहेब त्याच्यावर †क्शन का घेत नाहीत. त्यामध्ये क्लेअर मेन्शन केलेले आहे की या मशीनची किमंत एक कोटी पेक्षा कमी आहे. ज्या माणसानी एक कोटीच मशीन पावणेतीन कोटीला घेतले त्याला दया कशाला दाखवायची. त्यानंतर डीपर्टमेंटला इन्क्वॉयरी झाली कमीटीचे जे रिपोर्ट आहेत ते आयुक्त साहेब दाखवत नाहीत, तुमच्याकडे दोन महीने झाले रीपोर्ट आहेत व अजूनही कारवाई करत नाहीत. ऑपरेशन टेबल दोन लाखाचे, तीन लाखाचे ते नऊ लाखात खरेदी केलेले आहेत, †क्शन घेतली नाही. बावीस वर्षे जगदाळे सुप्रीन्टेंडन्ट असताना इतर अनेक भ्रष्टाचार सभागृहा समोर आणलेले आहेत तरीही सभगृहाने †क्शन घेतलेली नाही श्रीकर परदेशी यांनी पहिल्यांदा †क्शन

घेतली आहे. या केसेस बायपाससाठी रुबी मध्ये पाठविलीतर यामध्ये ५० टक्के हे घेत होते. एका ऑपरेशनच्यामध्ये ५० हजार यांना मिळत होते. आपल्याला उदाहरण देतो आपलाच इंजीनिअर बापू गायकवाड, जे.ई. त्याला रुबी हॉलला बायपासला पाठविले होते त्यांनी दुस-या डॉक्टरांचे ओपीनियन घेतले म्हणून तो वाचला. दिड महीना कॅप्सूल घेतल्या आणि डांबरीकरणामध्ये बारा बारा तास काम करतो. शेवटी परदेशी साहेबांनी वायसीएमला व्हीजीट केली या जगदाळेनी रातोरात एक कोटीचे मशीनची एक्सपायरी डेटबाय केली. त्याचा फोटो सुध्दा कमीशनरानां आलेला आहे. आपण येथे महापालिकेचा फंड प्रोटेक्ट करण्यास आलो आणि त्या माणसाबददल चर्चा करायची का? कमिटीने दिलेले रिपोर्ट, एक कोटीचे मशीन पावणेतीन कोटीला घेतलेले आहे, तुम्ही प्रोसीजर बघा, त्या मशीनसाठी पहील्यांदा आपण डिस्ट्रीब्यूटर अपॉईंट केला. त्या मशीनसाठीच पॅकेज नाही] तरी आपण डॉक्टरांना सपोर्ट करायचा का? आता कपिलेबददल उल्लेख झाला, कपिले दोषी आहेत का कोण दोषी आहे हे प्रशासनाने ठरवावे. २००७ मध्ये दोन कोटीच टेंडर निघते, दोन महिन्यानंतर दहा कोटी तुम्ही वाढवून देवू शकता, टेंडरशिवाय उपसूचनेव्दारे वाढवून दिले, दहा कोटी वाढवून दिले. आणि पाच वर्षानंतर ६२ लाखाचे वाढीव दिलेले आहे हे कुठल्या कायदयामध्ये बसते. ७० कोटीचे ठराव पिंपरी ते निगडी डांबरीकरण ७२ कोटी केलेले आहे. कुठल्या कयदयाच्या आधारे केले. भ्रष्टाचार, भ्रष्टाचार, भ्रष्टाचार. माने म्हणून पार्टीचे नाव आहे वर्कऑर्डर ३६ कोटीची होती व उपसूचना ३६ कोटीची केली आणि ती उपसूचना वाचली गेली नाही. तीच उपसूचना सभावृत्तांतामध्ये घुसडल गेल मी ऑब्जेक्शन घेतले काहीही झाले नाही. इन्क्वॉयरी लागली चीफ ऑडीटरने इन्क्वॉयरी केली त्यांन निल, निल रिपोर्ट केला त्याना सांगीतल, तुम्हांला पगार बंड साहेब देतात का महापालिका देते. ते म्हणाले मी काय करु कुमार साहेब, मला माफ करा मी जर बंड साहेबांच्या विरोधात रीमार्क दिलातर मला कुठतरी गडचिरोलीला पाठवतील. भ्रष्टाचाराला सपोर्ट करु नका. ओपनली भ्रष्टाचार दिसतो, कमीटी भ्रष्टाचार असेलतर भ्रष्टाचर लिहीतं. भ्रष्टाचार आहे म्हणून कन्फर्म करतयं. मग कशाला अशा माणसाचा सपोर्ट घ्यायचा, तुम्ही कशाला सपोर्ट करता. दोन कोटीचे दहा कोटी होते का? कपिले, सुरगूडे रिस्पॉन्सीबल आहेत. दोन कोटीच्या टेंडरला दहा-वीस लाख वाढवून देवू शकतो परंतु दहा ते वीस कोटी नाही आणि ज्या अर्थी इन्टरनल ऑडीटरने सांगीतल ६५ लाख रुपये वसुली आहे, कमीशनर स्वत: म्हणतात ६५ लाख रुपये वसुली आहे ते चुकीच म्हणतात का? का तुम्हांला सिस्टीम मध्ये इन्ट्रेस्ट आहे. तुम्हांला सिस्टम नको का? असं नहीयं. कमीशनर साहेब जेवढी इन्क्वॉयरी श्रीकर परदेशी साहेबांनी केली त्याला तुम्ही डायलुट केलेतर सभागृह तुम्हांला माफ करणार नाही आणि सभागृहाने माफ केलतर स्टेट गव्हर्मेंट तुम्हांला माफ करणार नाही. या महापालिकेमध्ये अनेकवेळा भ्रष्टाचार झालेला आहे आणि त्या भ्रष्टाचारावर वारंवार आवाज

उठविलेला आहे ज्यांनी भ्रष्टाचार केला आहे त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. कपिलेनी भ्रष्टाचार केला नाहीतर, सुरगूडेनी केला का हे बघायचे काम तुमचे आहे पण भ्रष्टाचार झालेला आहे.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, चौकशी संदर्भात समिती नेमली गेली. त्यांनी जो अहवाल दिला, मला असे वाटते की सभागृहाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. कारण मा.मंत्री महोदयानी दिलेले आदेश, त्यातील अडचण, हे सेवानिवृत्त झाल्यानंतर सभागृहाची परवानगी घेण्याचे कलम, त्यानुसार प्रशासनाने केवळ सभागृहाची परवानगी घेण्यासाठी हा विषय ठेवलेला आहे. चित्र एकदम स्पष्ट आहे की जर त्या समितीने संबंधीत अधिका-यांना दोषी ठरविलेले असेलतर, त्याच्यामध्ये भ्रष्टाचार झालेला हे सिध्द झालेले असेलतर मला वाटत सभागृहाने या प्रकरणाकडे कानाडोळा करु नये आणि जर कानाडोळा करायचा असेल, त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होत असेलतर अप्रत्यक्षरित्या या भ्रष्टाचाराला याठिकाणी खतपाणी घालण्याचा सभागृहाकडून प्रयत्न होतो असे वाटते. एक सभासद आणि शिवसेना पक्ष या नात्याने याठिकाणी आम्ही सांगू इच्छितो की, या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेवून पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठवावा, त्याला मान्यता दयावी, दप्तरी दाखल करु नये असे आमचे मत आहे. हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे त्यामुळे इतर सभासदांनी सुध्दा दुधाचे दुध व पाण्याचे पाणी होवून जाऊ दयावे. आयुक्तांना याठिकाणी निर्णय घेवू दयात, त्याठिकाणी गुन्हे दाखल करु दयात. त्याचा निकाल जो लागायचा आहे तो लागेल. हा विषय नामंजूर करण्याच्या विरोधात आम्ही आहोत, त्यामुळे आमचं मत याठिकाणी नोंदवून घ्याव अशी आम्ही विनंती करतो आणि हा विषय मंजूर करावा.

**मा.अनंत को-हाळे** - मा.महापौर साहेब, या सभागृहात आम्ही अडीच वर्षापुर्वी आलेलो आहोत. आम्ही नगरसेवक नवीन तरुण आहोत. नक्की आमच्या समोर कुठला आदर्श आपण ठेवणार आहात. जर हा विषय विधानसभेत जातो तेथे सिध्द होतो, की भ्रष्टाचार झालेला आहे, अधिक-यांवर कारवाई करणे गरजेच आहे. जी.बी.मध्ये विषय येतो तो विषय मंजूर झालाच पाहिजे. सर्वसामान्य माणस आज आपल्याला टॅक्स देतात, आपण त्यांना शास्ती लावली, आपण त्याचा जीव घेतोय आणि तो आपल्याला टॅक्स देतोय आणि तो टॅक्स या डेव्हलपमेंटसाठी वापरतो आणि या डेव्हलपमेंटमध्ये अशा पध्दतीन भ्रष्टाचार होणार असेलतर जनतेला काय उत्तर देणार आहेत. आज आपण कायदेशीर भाषा वापरतो. २००७ च्या अगोदरच प्रकरण असेल वगैरे वगैरे पण ही कायदेशीर भाषा सर्वसामान्य नागरीकांना माहिती आहे का? त्यांना फक्त एकच गोष्ट माहीती की हा भ्रष्टाचार झाला आहे आणि हा भ्रष्टाचार झाला असेलतर निश्चितपणे जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर शासन झाले पाहिजे. आणि जर अशा पध्दतीने आपण त्या भ्रष्टाचार करणा-या अधिका-

यांना पाठीशी घालणार असाल किंवा कायदेशीर पळवाटा काढणार असातर ते चुकीचे आहे आमच्या समोर एक चांगला आदर्श ठेवावा. महापौर साहेब, आमची विनंती आहे की कोणीही अधिकारी असो, मीतर त्याच्या पलीकडे जावून सांगतो की नगरसेवक, नगरसेवक सुध्दा काही चुकीच्या गोष्टी करत असतीलतर त्यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहिजे. एक चांगला आदर्श जर आपण प्रस्थापीत केलातर निश्चितपणे राजकारणात चांगले लोक येवू शकतील कारण यामुळेच राजकारण्याकडे लोकांचा बघण्याचा दृष्टीकोन किळसवाणी झालेला आहे, तरी हे आपल्याला मिटवायच आहे. कोणतेही अधिकारी असो, कधीचाही भ्रष्टाचार असो, हे पैसे नागरीकांचे आहेत, त्याच रक्षण करण्यासाठी आपण आहात. आमचा देखील आल्हाट साहेबांनी सांगीतले त्याप्रमाणे हा विषय नामंजुर करण्यास विरोध आहे हा विषय मंजूर झाला पाहिजे. जे कायदेशीर प्रोसेस आहे ते झाले पाहिजे. त्यांना शासन झाले पाहिजे. येथून पुढचे अधिकारी असेच म्हणतील की चार वर्षे झाले, मीटतयं आता हा दृष्टिकोन झाला नाही पाहीजे. चार वर्षे होवू किंवा दहा वर्षे होवू शासन झाल पाहीजे तरी निश्चितपणे आपण यात लक्ष घालावे, आणि चांगला न्याय मिळावा यासाठी प्रयत्न करावेत.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, डॉ.नागकुमार यांच्या एका प्रकरणामध्ये जो स्पेशल सी.एस. १४/६७/१२ फाईल केलेला आहे ते मी वाचून दाखवितो. (इंग्रजी कायदा वाचन केले) इतका क्लेअरकट कायदा आहे आणि हा सर्व अधिकार आपला आहे. त्यामुळे एकतर २००७ मधील ती खरेदी होती त्याला चार वर्षे होवून गेलेले आहेत आणि आयुक्त साहेबांनी स्वत: लेखी दिलेले आहे. की हे रुल रेग्यूलेशन फॉलो करुन हे परचेस झालेल आहे. त्यामुळे हा भ्रष्टाचार एक कोटीचा दिड कोटीचा असं काही नाही त्यावेळेस श्रीकर परदेशी यांनी जे आक्षेप ठेवलेले आहेत त्या आक्षेपामध्ये सुध्दा असंच म्हणलेले आहे की एचबीओटीचे मशीन जे आहे ते फक्त एका माणसासाठीची घ्यायला पाहिजे होती ती चार माणसासाठीची का घेतलेली आहे. ते चार माणसासाठीच घ्यायला फक्त जगदाळेच कारणीभूत होते का? बंड साहेब नव्हते किंवा त्यावेळेस आशिष शर्मा साहेब नव्हते, का त्यावेळेस नागकुमार नव्हते का. कै.प्रा. रामकृष्ण मोरे यांनी त्यावेळेला वायसीएम हॉस्पिटल केले ७५० बेडेडच केल त्यावेळेस खुप मोठ वादळ उठल, तिजोरी मोकळी केली, पैशाची उधळपट्टी केली, आवश्यकता नसताना केले, पांढरा हत्ती पोसतो असे म्हणत होतो आज काय पांढरा हत्तीची अवस्था आहे. डिलव्हरी करायला महीला भगीनीना आज खाली जमीनीवर झोपाव लागतं, ऍडमीट करुन घ्यायला वायसीएममध्ये जागा आहे का तेथे. आहो, हाच हेतू ठेवून, तसं म्हणलतर मला एक उत्तर दयाल का संततुकारामनगर मध्ये आचार्य अत्रे प्रेक्षागृह महीन्यात किती दिवस मोकळ असतय हो, लांडगे नाटयगृह महीन्यात किती दिवस मोकळ असतय हो,, प्रा.रामकृष्ण मोरे नाटयगृह महीन्यात किती दिवस मोकळ असतय हो, तरी

सुध्दा तुम्ही बांधले आहे आता प्राधिकरणामध्ये उदघाटन केलच नां? सांगवीमध्ये परत नाटयगृहाच नियोजन करतोच नां? मग कशाला खर्च करायचा, भ्रष्टाचार होतो, नवीन कमीशनर आले की करा इन्क्वॉयरी, अरे, ही काय पध्दत आहे कोणती पध्दत आहे. हे इन्टेंन्शननी करु नका. एचबीओटी मशीन एका माणसा ऐवजी चार माणसाची घेतलेली आहे. एक कोटीत कोण मशीन आणून देतो, पाच वर्षाच मेन्टेनन्स दिलेले आहे तुम्ही , काहीही बोलायचे, काहीतरी सिध्दता करुन दाखवावी. माझे म्हणणे असे आहे की, हा अधिकार सभागृहाचा, जी.बी.चा आहे. अपॉईटींग †थोरेटी जनरल बॉडी आहे, हा विषय दप्तरी दाखल करावा.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृह. याठिकाणी चर्चा चाललेली आहे थोर मंडळीनी या विषयावर चर्चा केलेली आहे. साधा आणि सोपा विषय आयुक्तांनी मांडलेला आहे तीकडे दुर्लक्ष करुन खालीपीली आपल्या सगळयाचा वेळ घेण्याच काय कारण आहे. येथे काही कोणी कोणाचे वकीलपत्र घेवून आलेले आहे का? येथे साधा प्रश्न विचारलेला आहे. चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत सूचना दयावी. अधिकारी नियुक्ती करु दया नां आणि त्यांना काय बोलायचे आहे ते बोलू दयावे तुम्ही कशाला बोलताय. त्यांना त्यांचे प्रश्न मांडू दयावे. तुमचा काय इन्ट्रेस्ट आहे, कशाकरीता अधिका-यांना पाठीशी घालता, आपण नगरसेवक जनतेच्या हितासाठी येथे बसलेलो आहोत, अधिका-यांनी कुठं काय केल, चोरी कोणी केली हे बघण्यासाठी बसलेलो नाहीत. प्रश्न साधा आणि सोपा आहे फक्त याठिकाणी अधिकारी नियुक्त करण्याचा विषय आहे. आहो येथे मर्डर केल्यानंतर खालचे कोर्ट शिक्षा देतयं, पुढचे कोर्ट जन्मठेप देतयं, सुप्रीम कोर्ट फाशी देतयं परंतु त्यानंतरही त्याला राष्ट्रपतीकडे अपिल करण्याचा अधिकार आहे नां. राष्ट्रपतीकडे त्यांना पाठवा दयेचा अर्ज करण्यासाठी ते सोडतील त्यांना. तुम्ही कशासाठी एवढ पोटतीडकीन बोलतायं. हे चुकीच आहे याठिकाणी काहीतरी शिजल्यासारखे वाटते. मगाशी कपिले विषयी विचारल आहे, कपिले यांना पाठीशी घालू नका. निगडी येथील अशाच एका ट्रान्सफॉर्मरची चोरी झालेली होती. निगडी पोलीस स्टेशनला मी गेलो होतो, तो ट्रान्सफॉर्मर झोपडपट्टीमधला होता तो नादुरुस्त होता त्या ठेकेदारला तेथून तो काढायला लावला व तोच हींजवडीला लावला त्यावेळेला पोलिस केस दाखल झाली. त्यावेळेला तेथे कार्यकारी अभियंता थोरात होते. मला एकच विनंती करायची आहे की तुम्ही अधिकारी नेमण्यासाठी परवानगी दयावी ही विनंती आहे.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय सभागृहाच्या समोर गाजतो आहे त्याचे कारण काय आहे. व्यक्ति विरोध म्हणून आपआपल्यात वाद होणे

चुकीची गोष्ट आहे.  पण महापालिकेचा कारभार विश्वस्त म्हणून चालवत असताना  आठ वर्षानंतर त्या प्रकरणाची चौकशी होते. निर्णय काय घ्यायचा हा अधिकार सभागृहाचा असेलतर शंभर टक्के आपण आपले अधिकार वापरले पाहिजेत असं शंभर टक्के माझ ठाम मत आहे.  योगेश बहल यांनी ज्या पध्दतीने सांगीतले, कलम ८ कुठल्या पध्दतीने वापरल आहे, कलम २७ कुठल्या पध्दतीने वापरले पाहीजे, त्या पध्दतीने ते वापरले गेले का? विधी मंडळा मध्ये काय झाले, विधी मंडळातून आल्यानंतर काय केलं, चौकशी कशा पध्दतीने केली, आयुक्तांनी कशाप्रकारे उत्तर दिले, मग याठिकाणी खालच्या दर्जाचा कर्मचारी किंवा अधिकारी अशाप्रकरच्या गुन्हयामध्ये कितपत पात्र होऊ शकतो याची सुध्दा चौकशी झाली पाहिजे. ही चौकशी कोणाची व्हावी किंवा न व्हावी हा शंभर टक्के त्या विभागाचा किंवा आयुक्तांचा अधिकार आहे. आपल्याला नक्कीच यातून जाणवले असेल की अशाप्रकारची मान्यता देत असताना सभागृहाला सुध्दा कित्येक प्रकारच्या  अडचणी येतात. अनेकांच्या नजरा वेगवेगळया आहेत कोण म्हणते, का तुम्ही यांची बाजू घेता, कोण म्हणते भ्रष्टाचार झाला भ्रष्टाचारामध्ये तुम्ही सामील आहेत का, नाहीत याची शहानिशा झाली पाहीजे. अधिका-याची बाजू आपण घेता कामा नये सगळया बाजू बरोबर असल्यातरी प्रशासन आणि आपण प्रतिनीधी हे या दोन्ही बाजूने एकत्रीत चाललो नाहीतर हा गाडा व्यवस्थीत चालू शकणार नाही. आज कपिले साहेब असतील, डॉ.नागकुमार असतील, डॉ.अय्यर असतील या सभागृहातील प्रत्येक व्यक्ती, अधिकारी या सगळयाशी संबंधीत आहे. डॉ.नागकुमार, डॉ.अय्यर, डॉ.जगदाळे या तीघांच्या बाबतीत प्रत्येकाला वैयक्तिक इतके फायदे झालेले आहेत, आर्थीक स्वरुपाचे फायदे शंभर टक्के नाहीत. आज ती लोक जरी नसलीतरी त्यांची जागा डॉ.रॉय चालवतात, डॉ.साळवे चालवतात, डॉ.देशमुख आहेत, डॉ.भगत आहेत हे लोक प्रत्येकाला मार्गदर्शन देतच असतात. तुमच्या आमच्या जीवनात जर काही अडचणी आल्यातर या लोकांनी  प्रत्येकानी प्रत्येकाला सहकार्य केलेले आहे. परंतु ते करत असताना या सर्वानी चुकीचे काम करावे असा कोणाचाही आपला बीलकूल हेतू नाही. परंतु त्यांचेकडून काही चुक होते हे निदर्शनास येत असेल चौकशी अंती सिध्द होत असेलतर, आपण आपल्या सभागृहाचा अधिकार त्याठिकाणी वापरायचा असेलतर तो वापरला गेला पाहिजे. अनेक महीने हे प्रकरण प्रलंबीत असताना हे प्रकरण चार वर्षानंतर निघू नये. चार वर्षानंतर या प्रकरणाचे व्हॅल्यू शुन्य राहते असं योगेश भाईनी पण सांगीतल. नियमामध्ये तशाप्रकारची तरतूद असेलतर तसा निर्णय आपण घेतला पाहिजे. आपण याठिकाणी विशिष्ठ निर्णयावर येवून याप्रकरणी डॉ.नागकुमार असतील, डॉ.जगदाळे असतील, डॉ.अय्यर असतील, कपिले असतील यांचे वेगवेगळे विषय क्रमांक असलेतरी हा अधिकार मात्र सभागृहाचा आहे. विषय दप्तरी दाखल करावा या निर्णयापर्यंत याव आणि या विषयाला पुर्णविराम दयावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५३८ विषय क्रमांक - ९

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -** १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशासन/८/कावि/१७५/२०१४

दिनांक २५/०२/२०१४

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.४८९ दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक ९ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/कप्र/११७/२०१४

दिनांक २६/०३/२०१४

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.४९४ दि.०५/०७/२०१४

सौ.निर्मला विजयराव तापकिर यांनी पिं.चि.मनपा निवडणुक २०१२ मध्ये निवडुन आलेल्या सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री. नितीन प्रताप काळजे यांचे अनाधिकृत बांधकामाबाबत दि.२९/१२/२०१३ रोजी अर्ज दाखल केला होता. त्या अनुषंगाने त्यांनी सौ.विनया प्रदीप तापकीर व श्री.नितीन प्रताप काळजे यांचे विरुद्ध मा.उच्च न्यायालयात याचिका क्र. ३११७/२०१२ व ६२६५/२०१२ दाखल केल्या होत्या. त्यातील मा.कोर्टाच्या आदेशाप्रमाणे संबंधीत अनाधिकृत बांधकामाबाबतचा निर्णय न्यायालयाच्या कार्यकक्षेत असलेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०/१ (ड), ११ व १२ च्या तरतुदीच्या अनुषंगाने सौ.विनया प्रदीप तापकीर यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१२/२०१४ दि.१०/२/२०१४ व श्री.नितीन

प्रताप काळजे यांना नोटीस क्र. स्था/इक्षे/१४/२०१४ दि. १०/२/२०१४ नुसार अनधिकृत बांधकामाबाबत खुलासा मागविणेत आला होता.

सौ.विनया प्रदीप तापकीर यांनी दि.२४/२/२०१४ रोजी सादर केलेल्या खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे माझे सास-याचे असले तरी ते माझ्यावर अवलंबून नाही व मी अनाधिकृत बांधकाम केलेले नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड) च्या तरतुदी मला लागु होत नाही, असा खुलासा सादर केला आहे.

श्री.नितीन प्रताप काळजे यांनी आपले दि.२४/२/२०१४ रोजी आपले खुलास्यामध्ये सदरची मालमत्ता/बांधकामे ही माझे वडीलांचे मालकीची असून त्या मिळकतीशी माझा काहीही संबंध नाही. माझे वडील माझेवर कोणत्याही प्रकारे अवलंबीत नाही, त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १०(१) (ड), ११ व १२ च्या तरतुदीनुसार माझे विरुद्ध कोणतीही कार्यवाही प्रस्तावित करु नये असा खुलासा सादर केला आहे.

सन्मा.सदस्यांनी सादर केलेल्या खुलाशानुसार अनधिकृत बांधकामामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ चे कलम ११ व १२ मधील तरतुदी अन्वये सदस्यांचे अर्हतेबाबतचा प्रश्न निर्माण झाल्याने मा.न्यायाधिशांकडुन निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे व त्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ कलम १२ मधील तरतुदी नुसार असा संदर्भ मा.न्यायालयाकडे करण्यासाठी मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.तानाजी खाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार (दिनांक २०/११/२०१४) माहे नोव्हेंबर २०१४ चे सभेत करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५३९ विषय क्रमांक - १०
दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. स्था/कप्र/११७/२०१४ दिनांक २६/०३/२०१४
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.४९४ दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक १० चा विचार (दिनांक २०/११/२०१४) माहे नोव्हेंबर २०१४ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२४ दि.०५/०७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये कासारवाडी येथे मनपामार्फत मैलापाणी शुद्धीकरणासाठी टप्पा क्र. १,२ व ३ असे एकुण तीन Sewage Treatment Plant आहेत. सदर प्लॅन्टमध्ये सद्यस्थिती सर्वसाधारण ७४ ते ८० एम.एल.डी. मैलापाण्यावर प्रक्रिया केली जाते. सद्यस्थितीत प्रक्रियायुक्त पाण्याचा पुर्नवापर काही प्रमाणात मनपाचे उद्यानासाठी करणेत येतो व उर्वरित पाणी नदीपात्रामध्ये सोडणेत येते. CME येथे कासारवाडी STP पासून पंपिंगद्वारे पाणी पुरविणेच्या कामाचे अंदाजपत्रक तयार केले असून सदर कामाची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम २,४७,४८,२११/- इतकी येत असलेबाबत, त्यांना यापूर्वी कळविलेले आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक २५/०७/२०१३ रोजीचे पत्रानुसार सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम मनपाकडे डिपॉझीट म्हणून जमा करणेची, तसेच या रक्कमेतून काम पूर्ण झालेनंतर देखभाल, दुरुस्तीकामी प्रति महिना आवश्यक ती रक्कम देणेची संमती दर्शविलेली आहे. तसेच सदरचे काम त्यांनी त्वरीत पूर्ण करुन देणेबाबत कळविलेले आहे. परंतु सदर कामासाठी CME यांचेकडून सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकानंतर (म्हणजे २५ जुलै २०१३ रोजी) पत्र मिळाले असून या विभागामार्फत सदर कामाचे खर्चासाठीची तरतुद या वर्षाच्या मनपाच्या अंदाजपत्रकामध्ये करणेत आलेली नाही. परंतू सदर कामासाठी आवश्यक असणारी रक्कम CME कडून मनपाकडे जमा होणार असलेने त्या रक्कमेतून सदर काम मनपामार्फत करुन घेणेस येणारे अंदाजे सुमारे र.रु.२,४८,००,०००/- चे रक्कमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५४० विषय क्रमांक - ११

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ-** १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/१०/कावि/८५४/२०१३ दि.१९/१०/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४० दि.१८/०१/२०१४

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.५२४ दि.०५/०७/२०१४

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.प्रशासन/८/कावि/४९६/२०१४ दि.१६/०६/२०१४

१. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडील क प्रभाग दिघी बोपखेल व कासारवाडी कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणात अडथळा करणारे व धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरीता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्या विभागाने पुरवठा केलेल्या केबल वापरुन हलविणे बाबतच्या निविदा क्र.१२/६-०७/०८ बाबत मुख्य लेखा परिक्षक व दक्षता व नियंत्रण कक्ष यांच्याकडील अहवालानुसार पुढील प्रमाणे अनियमितता आढळून आलेली आहे.

तत्कालिन आयुक्त यांचे दि. ०८/०६/२००७ चे मान्य प्रस्तावात विविध कामांना प्रशासकीय मान्यता घेणेकामी लागणारा कालावधी विचारात घेता प्रशासकीय मान्यता मिळेल या उमेद मान्यतेवर ३२ कामांची निविदा मागविणेस मंजूरी दिलेली होती. परंतू या कामांसाठी निविदा प्रसिद्धीपोटी एकत्रित केलेल्या ५ कामांपैकी त्यामध्ये निविदेमध्ये एकत्र केलेल्या ४ कामांचा समावेश ३२ कामांची निविदा मंजूर केलेल्या यादीमध्ये आढळून आलेला नाही. निविदा प्रसिद्ध करताना विविध वॉर्ड व प्रभागातील ५ कामे एकत्रित करुन र.रु.२१००१७२१/- ची निविदा दि.२५/७/२००७ रोजी प्रसिद्ध केल्याचे दिसून येते व तदनंतर विभागाने पाचही कामांना विधी समितीची वेगवेगळ्या ठरावान्वये मान्यता घेतलेली आहे. त्यानुसार स्वतंत्रपणे निविदा प्रसिद्ध करणे अपेक्षीत असताना तशी कार्यवाही केलेली नाही. र.रु.५० लाखावरील निविदा विषयक कामांना विधी समिती मार्फत मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. तसेच प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांची नावे व प्रत्यक्षात निविदा प्रसिद्ध केलेल्या कामाची नावे यांत तफावत दिसून येते. ठेकेदाराकडून मुदतवाढीबाबत कोणताही पत्रव्यवहार नसताना विलंबाने वेळोवेळी मुदतवाढीचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले असून तशा मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. मुदतीत काम पुर्ण न केल्याने निविदा अटी शर्तींचा ठेकेदाराने भंग केलेला असतानाही ठेकेदारावर कारवाई प्रस्तावित केलेली नाही.

२. विद्युत विभागाकडील क प्रभाग मनपा भवन रस्ता रुंदीकरणात अडथळा करणारे व धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरिता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब वीज वाहिन्या विभागाने पुरवठा केलेल्या केबल वापरुन हलविणे बाबतच्या निविदा क्र.१२/४-०७/०८ बाबत मुख्य लेखा परिक्षक व दक्षता व नियंत्रण कक्ष यांच्याकडील अहवालानुसार पुढीलप्रमाणे अनियमितता आढळून आलेली आहे.

एकाच प्रभागातील कामाचे तुकडे करुन निरनिराळ्या वॉर्डांकरीता विधी समितीची वेगवेगळ्या ठरावान्वये मान्यता घेतली असून त्याप्रमाणे प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा मागविणे आवश्यक होते. परंतु खात्याने सर्व प्रशासकीय मान्यता एकत्रित करुन मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे टाळून संबंधित ठेकेदारास ररु.२१००१७२१/- चे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. जादा कामाचे बाबतीत येणारा खर्च विचारा घेता नव्याने निविदा मागविणे आवश्यक असताना विकास अभियंता यांची सदर कामाच्या वाढीव खर्चास सुधारीत तांत्रीक मान्यता घेण्यात आली आहे. महापालिका व विधी समिती ठराव तसेच प्रत्यक्ष कामाचे आदेशावर नमुद केलेले कामाचे ठिकाण व कामाचे स्वरुप / व्याप्ती यांत गंभीर तफावत असल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येते. स्थापत्य विषयक कामास लागणारा कालावधी विचारात घेता निविदा प्रसिद्ध करुन निविदा मागवून काम करुन घेणे सहज शक्य झाले असते. स्पर्धात्मक दर प्राप्त न होऊन ठेकेदारास ५% जादा दराने काम दिल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येते. देखभाल व

दुरुस्तीचे कामाकरीता भाववाढ फरक देय होत नसताना ठेकेदारास भाववाढ फरक अदा केलेला आहे. निविदा अटी शर्तींमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना असताना त्यास आयुक्तांची मंजूरी घेतलेचे दिसून येत नाही. ठेकेदाराने मनपाकडून घेतलेले साहित्य कामावर वापरलेनंतर शिल्लक साहित्य मनपा कोठारात जमा केलेची खातरजमा केलेली नाही. निविदा कामकाजासाठी कमाल मर्यादेपेक्षा जादा होणा-या खर्चास मा.महापालिका सभेची सुधारीत प्रशासकीय मंजूरी व खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही.

उपरोक्त प्रमाणे विद्युत विभागातील अनियमितते प्रकरणी प्राथमिक चौकशी मध्ये श्री.कपिले मिलिंद भागीनाथ कार्यकारी अभियंता (वि.) हे जबाबदार असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना आदेश क्र. प्रशा/८/कावि/१२५/२०१४ दिनांक १०/०२/२०१४ अन्वये निलंबीत करुन खातेनिहाय चौकशी करण्याचा आदेश देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ चे अर्थांतर्गत, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ४ नुसार नियुक्ती प्राधिका-यापेक्षा खालच्या दर्जाच्या प्राधिका-याने निलंबनाचा आदेश काढला असेल त्याबाबतीत अशा प्राधिकरणाने ज्या परिस्थितीत प्रस्तुत आदेश काढला असेल ती परिस्थिती ते प्राधिकरण नियुक्ती प्राधिका-याला कळवील अशी तरतुद आहे. त्यानुसार श्री.कपिले मिलींद भागीनाथ, कार्यकारी अभियंता (वि) यांचा निलंबन आदेश व निलंबनाची कारणे अवलोकन करणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.निता पाडाळे** - मा.महापौर साहेब, सस्पेन्ड केले आणि शिक्षा नाही. आयुक्त साहेबांनी खातेनिहाय चौकशी सुरु केलेली आहे ती चौकशी पुर्ण होऊ दया ते निर्दोष असतीलतर कामावर येतील. २ कोटीचे टेंडर १२ कोटीपर्यंत गेलेले आहे आणि त्याची भाववाढ ही ६४ लाख पर्यंत गेलेली आहे. विदयूत विभागात माझ्या माहितीप्रमाणे आज पर्यंत भाववाढ दिलेली नाही, चौकशी होवू दयावी.

**मा.झामाबाई बारणे**- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक -५४१ विषय क्रमांक - १२

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.प्रशासन/८/कावि/४९६/२०१४ दि.१६/०६/२०१४

विषय क्रमांक १२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.भूजि/कावि/६//१७९/२०१४ दि.१/७/२०१४

मनपा हद्दीत थेरगाव स.नं.९ येथे मनपा व दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांचे वतीने संयुक्त क्रिकेट अकादमी प्रकल्प कार्यान्वित आहे. सदर ठिकाणचे वीजवापरापोटी एकूण र.रु.९०८९६४/- इतके बील थकीत होते. त्यामुळे तेथील क्रिकेटचे मैदानावरील हिरवळ व विकेट खराब झालेली असून पाण्याअभावी खराब होण्याची शक्यता होती. याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक होते.

दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांनी सदरचा प्रकल्प मनपा बरोबर संयुक्त प्रकल्प असल्याने व सदर ठिकाणी उत्पन्नाचे स्त्रोत नसल्याने सदर ठिकाणचे विद्युतबील मनपाने भरणेबाबत pcmc s varroc vengsarkar cricket Academy यांचे दि.२९/३/२०१४ रोजीचे पत्रान्वये विनंती केली होती.

सदर ठिकाणी खेळाडूंना मोफत क्रिकेट प्रशिक्षण देणेत येत असून कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला घेत नसलेने सदरची सर्व प्रशिक्षणार्थी मुले मनपा परिसरातील असल्याने तसेच संस्थेची आर्थिक परिस्थिती पाहता मनपाच्या मालकीच्या इनडोअर स्टेडियमला असलेल्या विद्युत मीटर बिल (थकीत व पुढील काळातील) मनपाने भरणेत यावे. तसेच सदरच्या संस्थेबरोबर यापूर्वी झालेला करारनामा दुरुस्तीसाठी योग्य त्या बदलासह मंजुर करणेबाबत मा.नगरसदस्य पारित स्थायी समिती ठराव क्र.६३४० दि.२८/२/२०१४ अन्वये मान्यता मिळाली आहे.

प्रस्तुत विषयाची तातडी पाहता सदर थकीत विद्युतबिल ररु.९०८९६४/- मनपामार्फत भरणेबाबत दि.११/३/२०१४ रोजीच्या आयुक्त यांचे बैठकीमध्ये निर्णय घेणेत आला आहे. थेरगाव येथील मनपा व दिलीप वेंगसरकर फौंडेशन संयुक्त क्रिकेट अकादमीचे थकीत विद्युतबिल र.रु.९०८९६०/- (नऊ लाख आठ हजार नऊशे साठ फक्त) महाराष्ट्र स्टेट इले. डिस्ट्रीब्युशन कं. लि. यांना अदा करणेस मा.आयुक्त पिं.चिं. मनपा याने क्र. भूजि/५/कावि/५७/२०१४ दि.२१/३/२०१४ आदेशान्वये मान्यता दिली आहे. तथापि याबाबत मा.महापालिका सभेची मान्यता न मिळालेस सदरचा विद्युत खर्च दिलीप वेंगसरकर फौंडेशन यांनी भरणे आवश्यक आहे. अशी अट सदर आदेशात आहे. सदरचा खर्च विद्युत विभाग ड क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील तरतूदी मधुन केला असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.झामाबाई बारणे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ५४२ विषय क्रमांक - १३
दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.भूजि/कावि/६//१७९/२०१४ दि.१/७/२०१४

विषय क्रमांक १३ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५४३ विषय क्रमांक - १४

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.पअक/६/कावि/३४०/२०१४
दि.७/७/२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१३-१४ पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डीपी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवालास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पर्यावरण अहवाल पाहिलातर शहराच्या विकासात कुठल्या पध्दतीने आपण वावरतोय त्याचा अंदाज आल्याशिवाय राहणार नाही. पर्यावरण अहवाल बजेटसारखा वाचत नाही पण त्याच्यावर हलकी नजर मारलीतर लक्षात येते आपल्या शहरातील ज्या वाईट घडामोडी आहेत की ज्या जनसामान्यावर परिणाम करतात अशा प्रत्येक गोष्टीचा उल्लेख त्या अहवालामध्ये दिसून येतो. काही गोष्टी चांगल्या आहेत काही वाईट आहेत. महापालिकेनी कशा पध्दतीने करायचे हे सुध्दा त्या निमीत्तानं दिसते. मगाशी मला बोलू दिलेले नाही. पर्यावरण अहवाल सादर करताना या पर्यावरण विभागाला अनेक बंधन आहेत व अनेक अडचणीना सामोरे जावे लागते हे तुम्हां-आम्हांला काही नवीन नाही. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने दिलेले वेगवेगळया प्रकारचे आदेश असतील. ड्रेनेज विभागावर मगाशी चर्चा झालेली आहे. त्या संदर्भात बरेचसे आदेश, हायकोर्टाच्या गाईडलाईन्स प्राप्त होतात. त्यानुसार हा विभाग काम करत असतो आणि आपले शहर कशा पध्दतीने आहे किंवा कशा पध्दतीने वाढण्याची वाटचाल आहे असे या अहवालावरुन दिसते. ब-याचशा गोष्टी या अहवालामध्ये समाविष्ट झालेल्या दिसतात. आपले पर्यावरण कशा पध्दतीने चांगल, वाईट आहे. याच्यामध्ये ड्रेनेज असेल, नदया नाल्या असतील, अगदी छोटया छोटया गोष्टीचा त्यामध्ये विचार झालेला दिसतो. आपण सगळया गोष्टीचा विचार केलातर महापौरांच्या परिसरातील मोशी भागातील कचरा डेपोचा विचार केलातर तेथील नियोजन कसे असावे, कशा पध्दतीने त्याठिकाणी काम करावे त्या पध्दतीने नियोजन केले गेलेले नाही. हे करत असताना अनेक गोष्टीच्या यामध्ये त्रुटी याठिकाणी दिसतात. ब-याचशा सदस्यांची मगाशी तक्रार होती, माझ्या भागात हे होत नाही, ते होत नाही, सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत ड्रेनेजमध्ये माणसाना उतरवुन काम करण्यास बंदी आहे. मध्यंतरी एक फोटो आला होता. तो कर्मचारी घाणेरडया पाण्यात उतरलेला आहे आणि ते फोटोसह पेपरला आलेले होते. सांगायच तात्पर्य असं आहे की, सुप्रिम कोर्टाचे जे आदेश आहेत त्याचे आपण नक्की पालन करतो का? नसेलतर का करत नाही. पर्यावरणमध्ये काही ठेकेदार असतील, अधिकारी असतील त्यांच्याकडून काही कामात कुचराई होते का? किंवा असलेले विभाग त्याच्यासाठी सक्षम आहेत का? आपल्या पर्यावरण विभागात ड्रेनेज, पर्यावरण अशी दोन्ही बाजूने दोन्ही काम लादलेली आहेत याठिकाणी अधिकारी वर्ग कमी पडत असेलतर ड्रेनेज आणि पर्यावरण हे दोन्ही विभाग वेगवेगळे करा, वेगवेगळे काम असतीलतर वेगवेगळे बजेट करा. हे पंचवीस टक्के बजेटतरी खर्च होणार आहे का? अडचीशे ते तीनशे कोटी त्यांना खर्च करण्यास दिलेतर तो खर्च होणार का? सांगवी सारख्या माझ्या परीसरात १५ एमएलडीचा प्लॅन्ट दहा दहा महीने झाले तो एसटीपी बंद आहे. कसं पर्यावरण नीट राहील. मेरी सारख्या संस्थेला, ती जरी शासनाची संस्था असलीतरी त्यांना काहीतरी लिमीट आहे. दहा- दहा महीने जर आमच्या परीसरातील एसटीपी प्लॅन्ट बंद असेलतर

का प्रदूषण होणार नाही. एक काळ असा होता, आमचा १५ एमएलडीचा प्लॅन्ट त्या १५ एमएलडीमध्ये २३ एमएलडी इन्फ्लो यायचा तो इन्फ्लो येत असताना इतक प्रदूषण व्हायच, इतक पर्यावरण खराब व्हायच त्यावेळेला त्यांना दिसल नाही का? डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी सांगीतले तुमचा प्लॅन्ट हा जुना झालेला आहे, मेरीला अहवाल देवू, मेरीकडून प्लॅनींग करु. मेरीकडून आम्हांला आक्षेप नाही परंतु त्यांच्या वेळेबद्दल आक्षेप आहे. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला सांगीतल आहे की दहा महीने तो प्लॅन्ट बंद पडलेला आहे त्याच्याबद्दल तुम्ही त्यांना रिक्वेष्ट करा. मेरीला २० लाख देणार, त्यातील १२ लाख दिलेले आहे. त्यांचे ॲग्रीमेंट सुध्दा त्यांच्या मनासारखे आहे, पहिल्यांदा आमचे पैसे मिळाल्यापासून त्यांची मुदत चालू, असा ॲग्रीमेंटमध्ये उल्लेख आहे पैसे मिळाल्यापासून सहा महीने मुदत आहे. दहा-दहा महीने तो प्लान्ट बंद ठेवतो त्या भागातील प्रदुषण वाढवतोय याला जबाबदार कोण आहे? आपण कशासाठी तो प्लॅन्ट बंद केला? त्या बंद प्लान्टवर सुध्दा एक ते दिड लाख खर्च करावाच लागतो. आज तेथील सुरक्षा आहे, लाईट आहे, कर्मचारी वर्ग आहे तो पोसावाच लागतो. अशा पध्दतीने कामकाज होणार असेलतर आमच्या समोर केलेला हा पर्यावरण अहवाल काय कामाचा आहे. आपल्या महापालिकेत सगळयात चांगले असे दाखविण्याचा प्रयत्न आहे. काही ठिकाणी शंभर टक्के काम होतयं यात काही शंका नाही. परंतु ज्याठिकाणी चांगले होत नाही त्याठिकाणी आपण लक्ष दिले पाहिजेत. पर्यावरण विभागाकडे कर्मचारी, इंजिनीअर लोकांचा ताफा कमी आहे. पर्यावरण विभाग आणि ड्रेनेज विभाग वेगवेगळा करावा. पर्यावरण विभागाचे हेड डायरेक्ट ॲडीशनल आयुक्त यांना करा त्यांच्याकडे पर्यावरण विभाग दया. आज पर्यावरण विभागाकडे अतीशय सेन्सीटिव्ह असणारा भाग, या सेन्सीटिव्ह असणा-या विभागावर एनपीसीने दहा लाख रुपये दंड ठेवून आपल्याबद्दल ओरडलेले आहेत, आपल्या महानगरपालिकेची बदनामी कुठे का होईना थोडीफार झालेली आहे. शासकीय अधिका-यांकडे त्याची जबाबदारी दया की जेणेकरुन त्यांच कोऑर्डीनेशन व्यवस्थीत राहील. आमचा काही कुठल्या अधिका-यांवर रोष नाही परंतु तिथ जर दिलेले काम व्यवस्थीत जबाबदारीने होणार नसेलतर काय उपयोग. २५ टक्के खर्च त्या विभागाकडून आपण करुनच घेवू शकत नाहीत. आहो, साधी शहराची आपण ड्रेनेज लाईन व्यवस्थीत ठेवू शकत नाहीत, प्रत्येक नगरसेवक त्याच्या बाबतीत ओरडत असेल, प्रत्येक माणूस जर कॉन्ट्रॅक्टरची तक्रार करत असेल, साहेब, मध्यंतरी आपण ड्रेनेजच्या क्लिनींगची एक निवीदा काढली त्यामध्ये अशा अटि, शर्ती टाकल्या की एकही ठेकदार आला नाही पाहिजे. आज आपल्याकडे सहा प्रभाग आहेत त्या सहा प्रभागात वेगवेगळे ठेकेदार पाहिजेत. अशाप्रकारच्या अटि, शर्ती टाकायच्या की कामच झाले नाही पाहिजे. आमच्या सारख्यांनी काम काढलतर ते काम झाल नाही पाहिजे अशा पध्दतीची मानसीकता असेलतर हा पर्यावरण अहवाल आहे. एमआयडीसीचा विचार केलातर, मगाशी मंगलाताई कदम यांनी सांगीतले गगराणी साहेब तेथे उपस्थित नव्हते. चार वर्षापुर्वी मी जेव्हा स्थायी समितीचा चेअरमन होतो

तेव्हा मी दादांना मिटींग लावायला सांगीतली. आपल्या येथे जर्मन टेक्नॉलॉजी जीटीएस नावाचे एक कॉन्ट्रॅक्ट केल होतं. तुम्ही क्रिसीलकडून अहवाल मागून घेतला होता. आपल्याला जर्मन कंपनी रिसायकलींग प्लान्ट उभा करुन देणार होती शंभर कोटी रुपये खर्च करुन त्यांना तीन एक्कर जागा पाहिजे होती. रिसायकलींग पाणी पिण्याच्या योग्य करुन देणार होती ते पाणी आपण त्यांना वापरण्याची आणि विकण्याची मुभा देणार होतो. त्यासाठी त्यांनी आपल्याला आपली यंत्रणा वापरायची परवानगी मागीतली होती, आपल्याला एक रुपया सुध्दा खर्च करायचा नव्हता. गेल्या काही दिवसात आपण धरणामध्ये १३ टक्केच पाणी शिल्लक आहे असं सांगीतल म्हणून पाणी एक दिवसा आड केल, ती परिस्थिती उदयाच्या काळात होणार नाही का? उदयाच्या काळात तुम्ही खात्री घेणार का? आपल्याला त्या पध्दतीनच राहाव लागेल. आपल्याकडे २५० एमएलडीचा प्लॅन्ट आहे व २५० एमएलडी पैकी केवळ आपण १५० एमएलडी ट्रिट करतो उर्वरीत १०० एमएलडी कुठे जाते. मला येथे काही लेखाजोखा दयायचा नाही मला एवढेच सांगायचे आहे की जर आम्ही तुम्हांला १०० टक्के खर्च करण्यास मुभा देत असूतर तो खर्च झाला पाहिजे. तो खर्च झालातर आमच्या नागरीकांना त्याप्रमाणात सुविधा मिळणार आहेत. पर्यावरण अहवाल वाचलातर त्यामध्ये एक नाव चुकलेल आहे पा.क्र.२२ वर जेआरडी टाटा असं पुलाच नाव दिलेल आहे परंतु त्या पुलाचा फोटो मात्र चुकीचा आहे आमच्या समोर विषय मान्यतेसाठी ठेवला त्यामध्ये जर चुका करत असुतर आपण या कामात का करणार नाहीत असं सुध्दा कुठतरी वाटल्याशिवाय राहत नाही. साहेब, तुम्ही कचरा आणि स्वच्छतेची फार चांगल्या पध्दतीने काम करण्याचा येथे आल्यापासून प्रयत्न करतात. या निमित्तान मी एक आठवण करुन देतो की आपल्या कचरा डेपोच्या बाबतीत कायमच अडचणी आणि वेगवेगळया प्रकारच्या मागण्या होत असतात. या पर्यावरण अहवालात आपण कितपत चांगल्या पध्दतीने काम करतो असे फोटो दिलेले आहेत, मी स्वत: पाहिलेले आहे. मला काही ते पटलेल नाही. कॅपींग कस करतो, किती चांगले फोटो दिले, कॅपींग झाल्यानंतर तुम्ही भूभरण कसं करता त्या पध्दतीन काम कसं करता हे चांगले फोटो निघावेत म्हणून त्यावेळेची परिस्थिती तशी दिसते, खरंच प्रत्यक्षात तशी आहे का हो, तर खरंच नाही. धनंजय आल्हाट यांना विचारा ते मोशीचे नगरसेवक आहेत. खरंच परिस्थिती तशी आहे का, नाही तशी परिस्थिती. आज आपण तिथं ज्या पध्दतीने काम करतो रिसायकलींग प्लॅन्ट वेगवेगळे आहेत त्यामध्ये पेट्रोल, डिझेल तयार करण्याचे एक युनीट त्याठिकाणी आहे. गांडूळखत निर्मीती, खत निर्मीती, विदयूत निर्मीती असे वेगवेगळे प्रकारचे प्रकल्प त्याठिकाणी राबविले पाहिजेत. शंभर टक्के प्रकल्प धुळखात पडून आहेत. त्यात फायदा नाही, जे वीस कोटी दयावे लागतात ते दयावेच लागते. पण याच्या बदल्यात जर आपल्याला कोणी एखाद चांगल प्रपोजल दिलतर आपल्या शहरातील कचरा वाहून नेण्याची जबाबदारी त्याच्यावर दया त्यातून आऊटपुट काही निघत का असं बघा. आमच बजेट शंभर कोटी कच-यावर खर्च करणारच आहे. पण त्यातून

जर काही आउटपुट निघत नसेल, त्यातून नागरीकांना कचराच दिसत असेलतर काय उपयोग आहे, अशाप्रकारचे प्रकल्प आपल्या शहरात आले पाहिजेत. केवळ फोटो काढण्यासाठी कचराडेपोत जायचे, साफसफाई करायची, लॉन टाकायची, फोटो काढायचे आणि ते अहवालात छापायचे असलं काम शंभर टक्के नको. आमच शहर या भारतात बेस्ट सिटी ॲवॉर्ड मिळालेल शहर आहे. परंतु अशाप्रकारे आमच पर्यावरण सुध्दा चांगल्या पध्दतीने ठेवावे यासाठी सुध्दा सर्वच विभागान प्रयत्न केला पाहिजे. शहरातील रस्ते, पाणी, विदयूत असेल या सर्व विभागाने प्रयत्न केलाच पाहिजे. आपले बजेट दोन हजार कोटीचे आहे. या बजेटला मंजूरी देत असताना शंभर टक्के बजेट खर्च करु शकतो का हो, नाही करु शकत. परंतु वाचविण्याचा आव मात्र शंभर टक्के आणतो, माझ्याकडून एवढे पैसे वाचले, तेवढे पैसे वाचले, कशासाठी वाचवायचे ज्या अत्यावश्यक सेवा आहेत ज्याला शासनाचे निर्बंध आहेत, ज्याला सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाचे आदेश आहेत ते आपण पाळलेच पाहिजेत. आपण ते पाळतो का? नाही पाळत. विनाकारण कशासाठी पैसे वाचवायचे येथे खर्च नको व्हायला, तेथे खर्च नको व्हायला. खर्च हा केला पाहिजे, खर्च केलातर शंभर टक्के नागरीकांना समाधन आपण देवू. खर्च केलातर काम होतील. आज काम झाले म्हणून हे शहर एक वेगळयाप्रकारचे अस्तित्व घेवून जन्माला आलेल शहर आहे. गेल्या काही वर्षात पंचवीस-तीस वय असताना या शहरानी फार मोठी उभारी घेतली आहे. आज शंभर आदर्श शहरामधील एक आपल शहर आहे. उदयाच्या काळात जरी केंद्रशासनामधली सत्ता बदलली असलीतरी आपल्या शहराचे अस्तित्व कायम तसच राहाव. कायम त्याच पध्दतीन राहाव आणि आपल नाव व्हाव. एक महापौर म्हणून, आयुक्त म्हणून चांगल्या पध्दतीच काम आम्हांला सुध्दा अपेक्षीत असते. त्यामध्ये आमच्यासारख्याचा सहभाग अपेक्षीत पाहीजे त्या पध्दतीचा आमचा सुध्दा सहभाग असायला पाहीजे. या अहवालाच्या निमित्ताने एवढेच सांगतो की, आपल्याकडे छोटया-छोटया गोष्टी आहेत स्वच्छतागृहाचे फोटो आहेत, एकतरी स्वच्छतागृह त्या फोटोसारखे आहे का हो, एक सुध्दा नाही. साहेब, तुम्ही टॉयलेटच्या बाबतीत फार सेन्सिटिव्ह आहात, मागच्यावेळेस तुम्ही सगळयांनाच आदेश दिले. तुम्ही सांगा त्या अहवालातले फोटो पाहून आपल्याकडे एकही टॉयलेट त्याप्रकारचे नाही. का नाही, कशासाठी नाही. ती झोपडपट्टी सुध्दा चांगली राहीली पाहीजे त्यांना सुध्दा चांगल्याप्रकारच्या मुलभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत बीआरटीवर किती ठिकाणी टॉयलेटचे नियोजन केलेले आहे, एक सुध्दा नाही. कन्सलटंटचे काम आहे. त्यांना कसले आपण पैसे देतो. साध टॉयलेटचे सुध्दा नियोजन करु नये. त्या लेआऊटमध्ये साधं टॉयलेटचा उल्लेख असु नये का? सगळया प्रोव्हीजन आपण केल्या पाहिजेत. त्याप्रकारचे नियोजन याठिकाणी दिसत नाही. केवळ पर्यावरण अहवाल, तो पण अशाप्रकारचा जुनाच अहवाल आहे, नवीन नाही. केवळ आपण अहवालासाठी चांगल काम दाखवतो अस व्हायला नको म्हणून आमची अपेक्षा आहे. गेल्या काही दिवसापुर्वी आम्ही पाणीटंचाईला सामोरे गेलो

होतो पाणी टंचाईला सामोरे जाताना आपण भुजल सर्वेक्षण कधी केले का? जमिनीखाली जावुन कधी पाहिल का? आपल्या शहरात पाण्याची पातळी किती आहे. आपण फक्त एफएसआय, टिडीआर झालेले रस्ते एवढेच बघणार का? इन्फ्रास्ट्रक्चर असणं ही अतीशय चांगली गोष्ट आहे परंतु त्याच्या खाली काय करतो ते सुध्दा बघण आवश्यक आहे. परवा मी चेन्नईला गेलो होतो त्याठिकाणी ओव्हरब्रीजखाली रेन हार्वेस्टींग केलेले होते. मागच्या महीन्यात मी एक पत्र दिलेल होतं की पिंपरी चिंचवड शहरामध्ये ठरावीक अंतरावर जमिनी खाली पाणी मुरविलच पाहिजे. आज जरी ओला दुष्काळ वाटला, दोन तीन दिवस पुरपरिस्थिती वाटलीतरी कोरडा दुष्काळ आपण काही दिवसापुर्वी पाहिलेला आहे. ओल्या दुष्काळाचा कालावधी जास्त नसतो तो कालावधी आठ दिवसाचा असतो. परंतु कोरडा दुष्काळ असलातर त्याचे परिणाम संपुर्ण समाजाला भोगावे लागतात. त्यासाठी आपण नियोजन केल पाहिजे. आज पिंपरी चिंचवड शहराच्या जमिनी खालच्या पातळीवरील पाण्याची काय अवस्था आहे. कुठेच बोर लागत नाही, केवळ नुसतं रेन हार्वेस्टींग बिल्डींगच्या टेरेसवरचं पाणी वापरुन चालणार नाही. स्ट्रॉर्म लाईन टाकून सिमेंटन घोटाई करुन ते पाणी वाहून जाण्याची व्यवस्था केलेली आहे त्यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही ते पाणी जमिनीमध्ये मुरवायच आपलच काम आहे, आपलीच जबाबदारी आहे त्यामुळे ते मुरविले पाहिजे. स्ट्रॉर्म लाईनसाठी वर्षाला जवळ जवळ ३०० कोटी खर्च करतो. ते ३०० कोटी खर्च करताना एकाही ठिकाणी रेन हार्वेस्टींगची सिस्टम नाही. ठिक आहे त्यावेळेसच हे प्लॅनींग होत परंतु गेल्या दोन तीन वर्षात दुष्काळाला सामोरे जाताना त्यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टींगचे प्लॅनींग झाले पाहिजे. नवीन मोठमोठया रस्त्यावर जमिनी खाली ५०-५० फुट खाली जावुन जमिनीखालील पाणी मुरवल पाहिजे, जिरवल पाहिजे. आपल्या परीसरात जेवढे तलाव आहेत त्या तलावाच्या परीसरातच फक्त पाणी झिरपते बाकी कुठेच झिरपत नाही. आमची सांगवी असेल, नवी सांगवी असेल, थेरगांव परीसर असेल आमच्या भागात पाणीसाठे नाहीत. आजची आमची परिस्थिती इतकी वाईट आहे. मगाशी कोणीतरी सांगीतल आहे, इतकी वाईट परिस्थिती आहे की, टेम्पोतून, रिक्षातून, कॅण्डमधुन पाणी विकत आणायचे. पर्यावरण अहवालात त्याचा सुध्दा उल्लेख नाही, आपल्या शहराला एक खंतच म्हणायची की नैसर्गीक टेकडी आपल्याकडे नाही. परवा मी च-होलीला गेलो लोहगाव आणि च-होलीमध्ये टेकडीचे ठिकाण आहे तेथून किमान पंचवीस ते तीस टक्के पाणीपुरवठा आपल्या शहराला झालातर मला वाटत शंभर टक्के आपण बाकीच्या बाबतीत सुखी होऊ. पुणे शहरात पर्वती जलकेंद्रातून पाणीपुरवठा होतो, चतु:श्रृंगीहून होतो पुणे शहरामध्ये टेकडया असल्यामुळे उंच टाक्या कमी बांधलेल्या आहेत. दोन-चार कोटी लीटर पाणी ते एकदाच शिफ्ट करतात आणि सोडतात. तेथे पाण्याच नियोजन व्यवस्थीत आहे. आज भोसरीचा शेवटचा भाग, सांगवीचा शेवटचा भाग आमची इतकी वाईट अवस्था होती की जलउपसा एका बाजूला आम्ही तीस-याच बाजूला आम्हीतर सांगतो की सरळ बायफरकेट करा. नदयाच पाणी आपण घेतोय

ठिक आहे नदया जवळ आहेत. इंद्रायणी नदी असेल, पवना नदी असेल, मुळा नदी असेल त्या त्याठिकाणी जलउपसा झाला पाहिजे. तेथून त्या परीसरात पाणी गेले पाहिजे. अशा प्रकारचा विचार कोणी केलाच नाही. आज आपल्या शहरात पाण्याच योग्य नियोजन व्हावे, ड्रेनेजचे योग्य नियोजन व्हावे रोगराई पसरु नये. आपल्या मुलभूत सुविधा सुध्दा तेवढया चांगल्या प्रकारच्या पाहिजेत. या पर्यावरण अहवालाच्या निमित्तान सभागृहाच्या वतीने आवाहन करतो की जी अत्यावश्यक सेवा आहे, मग ती पाण्याच्या बाबतीत असू दयात, ड्रेनेजच्या बाबतीत असू दयात, मा.उच्च न्यायालयाने, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन जास्तीत जास्त प्रमाणात करण्याकडे आपण लक्ष दयाव. मी विनंती करतो की ज्या ज्या गोष्टी नकारात्मक याठिकाणी दिसतात त्या सकारात्मक कशा होतील याकडे सक्षम आयुक्त म्हणून आपण लक्ष दयावे आणि कार्यवाही करावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केल.

------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १५

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजिं/४/कावि/१३१/२०१४ दि.९/७/२०१४

विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे विभाजन होऊन नवीन दिघी येथे नविन पोलीस स्टेशन होण्याकरिता पोलीस खात्यामार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र. एपीओ ३१११/प्र.क्र. १०७ (अ) पु.बां.२/पोल-३ दि.४/३/२०१४ अन्वये दिघी पोलीस स्टेशन स्थापन करणेस शासनाची मंजूरी मिळालेली आहे.

वडमुखवाडी ता.हवेली जि.पुणे येथील स.नं.१२३/१/२ पै., १२३/१/३ पै. मधील औद्योगिक झोनमधील बांधकाम परवानगी क्र. बीपी/वडमुखवाडी/३/२००९ दि.२०/११/२००९ अन्वये सुधारीत मंजुर बांधकाम रेखांकनाचे नकाशात विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.६.५ अन्वये १० % सुविधा भूखंड क्र१ क्षेत्र ३०७४.०२ चौ.मी. जागा म.न.पा.चे ताब्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.२५४७/१४ दि.२०/५/२०१४ अन्वये म.न.पा.चे मालकीची वडमुखवाडी स.नं.१२३/१/१/२ येथील ३६ गुंठे जागा

दिघी पोलीस स्टेशन करिता पोलीस खात्यास मिळणेस विनंती केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सर्वसाधारण धोरणानुसार नविन पोलीस ठाण्याच्या बांधकामाकरिता कमीत कमी २६ गुंठे जागा आवश्यक आहे. तथापि भविष्याच्या दृष्टीने तेथील सर्व क्षेत्र म्हणजे ३०.७४ आर क्षेत्राची मागणी पोलीस खात्याने केली आहे. नगररचना विभागाकडून सदरकामी भाडेमूल्य निर्धारण अद्याप प्राप्त व्हावयाचे आहे.

शासकीय संस्थांची मागणी आलेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार व प्रस्तावित मिळकत वाटप नियमावली नुसार नगररचना विभाग ठरवतील त्या भाडेदरानुसार व मागणी केलेल्या कालावधीसाठी परंतु जास्तीत जास्त ३० वर्ष पर्यंतच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने जागा व मिळकती निविदा न काढता वितरीत करणे शक्य आहे

उपरोक्त बाबीचा विचार करता, म.न.पा.ची वडमुखवाडी ता.हवेली जि.पुणे स.नं.१२३/१/२ पै., १२३/१/३ पै. मधील सद्यस्थितीत २६ गुंठे (२६३१.१६ चौ.मी.) जागा दिघी पोलीस स्टेशनसाठी नगररचना विभागाकडुन प्राप्त होणारे भाडे मुल्य निर्धारणास तसेच करारनाम्याचे अटी/शर्तीस अधीन राहून म.न.पा. अधिनियम कलम ७९ अंतर्गत ३० वर्ष कालावधीसाठी भाडेपट्टयाने विनानिविदा पोलीस खात्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सांगवी पोलिस ठाणे याकरिता मौजे सांगवी येथील स.नं.८३ मधील मनपाच्या मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र. ३३४ हे मोकळी जागा या प्रयोजनाकरीता आरक्षित आहे. व सदर आरक्षण क्र.३३४ मनपाच्या ताब्यात आहे. मा.स्थायी समितीने सांगवी पोलिस ठाणेसाठी सदर जागा देणेस मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीतील सांगवी पोलिस ठाणेची जागा मनपाने दिली असून गाळे स्वरुपातील जागा असल्याने याठिकाणी नागरिकांना व पोलिस प्रशासनाला अडचणी येत आहेत. त्यामुळे सांगवी पोलिस ठाणेसाठी वरील आरक्षण क्र. ३३४ ची जागा मनपा अधिनियम कलम ७९ अंतर्गत ३० वर्षे कालावधीसाठी नियमानुसार भाडेकराराने किंवा किमान दराने पोलिस खात्यास देणेस व याठिकाणी मनपा नियमानुसार पोलिस ठाणे बांधणेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**मा.तानाजी खाडे-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.शमीम पठाण-** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडते- मनपाच्या ताब्यात असलेल्या प्रभाग क्र.२१ मधील सर्वे नं. १९५ मध्ये पोलिस चौकीसाठी मनपाने जागा उपलब्ध करुन दयावी. त्याठिकाणी पोलिस चौकीची आवश्यकता असल्याने

नविन पोलिस चौकी सुरु करणेसाठी मा.पोलिस कमिशनर पुणे यांना प्रस्ताव पाठवून मंजूरी घेऊन पोलिस चौकी सुरु करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.मंदाकिनी ठाकरे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- प्र.क्र.४ कृष्णानगर येथिल पूर्णानगर परिसरामध्ये मनपा आरक्षित जागा आहेत. त्या आरक्षित जागेवर नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चिखली पोलिस स्टेशनसाठी इमारत बांधून देण्यास व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे महानगरपालिकेची आरक्षित जागा असुन स.न.१४४/१४९ असा आहे. सदर जागा पोलिस चौकीसाठी घ्यावी असा ठराव करण्यात (प्रभागात) आला आहे. परंतु ह्या जागेत महानगरपालिकेने पोलिस चौकीसाठी जागा बांधून घ्यावी. सदर जागेचे आरक्षण क्र.८३ आहे. सदर कामास २५ लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. यास मान्यता देणेत यावी.

**मा.सुमन नेटके** - मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, सर्व उपसूचना स्विकारल्या.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ५४४ विषय क्रमांक - १५

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.भूजिं/४/कावि/१३१/२०१४ दि.९/७/२०१४

विश्रांतवाडी पोलीस स्टेशनचे विभाजन होऊन नवीन दिघी येथे नविन पोलीस स्टेशन होण्याकरिता पोलीस खात्यामार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र एपीओ ३१११/प्र.क्र. १०७ (अ) पु.बां.२/पोल-३ दि.४/३/२०१४ अन्वये दिघी पोलीस स्टेशन स्थापन करणेस शासनाची मंजूरी मिळालेली आहे.

वडमुखवाडी ता.हवेली जि.पुणे येथील स.नं.१२३/१/२ पै.,१२३/१/३ पै. मधील औद्योगिक झोनमधील बांधकाम परवानगी क्र. बीपी/वडमुखवाडी/३/ २००९ दि.२०/११/२००९ अन्वये सुधारीत मंजुर बांधकाम रेखांकनाचे नकाशात विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.६.५ अन्वये १०% सुविधा भूखंड क्र.१ क्षेत्र ३०७४.०२ चौ.मी. जागा म.न.पा.चे ताब्यात आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.२५४७/१४ दि.२०/५/२०१४ अन्वये म.न.पा.चे मालकीची वडमुखवाडी स.नं.१२३/१/१/२ येथील ३६ गुंठे जागा दिघी पोलीस स्टेशन करिता पोलीस खात्यास मिळणेस विनंती केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सर्वसाधारण धोरणानुसार नविन पोलीस ठाण्याच्या बांधकामाकरिता कमीत कमी २६ गुंठे जागा आवश्यक आहे. तथापि भविष्याच्या दृष्टीने तेथील सर्व क्षेत्र म्हणजे ३०.७४ आर क्षेत्राची मागणी पोलीस खात्याने केली आहे. नगररचना विभागाकडून सदरकामी भाडेमूल्य निर्धारण अद्याप प्राप्त व्हावयाचे आहे.

शासकीय संस्थांची मागणी आलेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार व प्रस्तावित मिळकत वाटप नियमावली नुसार नगररचना विभाग ठरवतील त्या भाडेदरानुसार व मागणी केलेल्या कालावधीसाठी परंतु जास्तीत जास्त ३० वर्ष पर्यंतच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने जागा व मिळकती निविदा न काढता वितरीत करणे शक्य आहे.

उपरोक्त बाबीचा विचार करता, म.न.पा.ची वडमुखवाडी ता.हवेली जि.पुणे स.नं.१२३/१/२ पै., १२३/१/३ पै. मधील सद्यस्थितीत २६ गुंठे (२६३१.१६ चौ.मी.) जागा दिघी पोलीस स्टेशनसाठी नगररचना विभागाकडुन प्राप्त होणारे भाडे मुल्य निर्धारणास तसेच करारनाम्याचे अटी/शर्तीस अधीन राहून म.न.पा. अधिनियम कलम ७९ अंतर्गत ३० वर्ष कालावधीसाठी भाडेपट्टयाने विनानिविदा पोलीस खात्यास देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील सांगवी पोलिस ठणे याकरिता मौजे सांगवी येथील स.नं.८३ मधील मनपाच्या मंजूर विकास आराखड्यातील आरक्षण क्र. ३३४ हे मोकळी जागा या प्रयोजनाकरीता आरक्षित आहे. व सदर आरक्षण क्र.३३४ मनपाच्या ताब्यात आहे. मा.स्थायी समितीने सांगवी पोलिस ठाणेसाठी सदर जागा देणेस मान्यता दिलेली आहे. सद्यस्थितीतील सांगवी पोलिस ठाणेची जागा मनपाने दिली असून गाळे स्वरुपातील जागा असल्याने याठिकाणी नागरिकांना व पोलिस प्रशासनाला अडचणी येत आहेत. त्यामुळे सांगवी पोलिस ठाणेसाठी वरील आरक्षण क्र. ३३४ ची जागा मनपा अधिनियम कलम ७९ अंतर्गत ३० वर्षे कालावधीसाठी नियमानुसार भाडेकराराने किंवा किमान दराने पोलिस खात्यास देणेस व याठिकाणी मनपा नियमानुसार पोलिस ठाणे बांधणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी. तसेच मनपाच्या ताब्यात असलेल्या प्रभाग क्र.२१ मधील सर्वे नं. १९५ मध्ये पोलिस चौकीसाठी

मनपाने जागा उपलब्ध करुन द्यावी. त्याठिकाणी पोलिस चौकीची आवश्यकता असल्याने नविन पोलिस चौकी सुरु करणेसाठी मा.पोलिस कमिशनर पुणे यांना प्रस्ताव पाठवून मंजूरी घेऊन पोलिस चौकी सुरु करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच प्र.क्र.४ कृष्णानगर येथिल पूर्णानगर परिसरामध्ये मनपा आरक्षित जागा आहेत. त्या आरक्षित जागेवर नागरीकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने चिखली पोलिस स्टेशनसाठी इमारत बांधून देण्यास व त्यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी येथे महानगरपालिकेची आरक्षित जागा असुन स.न.१४४/१४९ असा आहे. सदर जागा पोलिस चौकीसाठी घ्यावी असा ठराव करण्यात (प्रभागात) आला आहे. परंतु ह्या जागेत महानगरपालिकेने पोलिस चौकीसाठी जागा बांधून घ्यावी. सदर जागेचे आरक्षण क्र.८३ आहे. सदर कामास रु.२५ लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ५४५ विषय क्रमांक - १६

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र
क्र.स्था/बीआरटीएस/३२६ /२०१४ दि. १०/०७/२०१४

पिंपरी चिंचवड मनपाने नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेअंतर्गत बीआरटीएस सेवा पुरविणेसाठी एकूण ४५ कि.मी.लांबीचे रस्ते JnNURM अंतर्गत विकसीत करणेचे काम हाती घेतलेले आहे. सदर प्रकल्पाअंतर्गत दापोडी -निगडी, सांगवी - किवळे, नाशिक फाटा- वाकड व काळेवाडी फाटा – देहू आळंदी रस्ता अशा ४ बीआरटीएस कॉरीडॉर चा समावेश आहे. दापोडी - निगडी व सांगवी - किवळे ह्या दोन्ही कॉरीडॉरच्या पायाभूत सुविधा विषयक कामे पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत. त्या अंतर्गत Dedicated Lane करणे व बस स्टेशन बांधणे या मुख्य सुविधांचा समावेश आहे. सदर दोन्ही कॉरीडॉरवर बीआरटीएस बस सेवा सुरू करणे पुर्वी Intelligent Transit Management System (ITMS) ची यंत्रणा उभारणे आवश्यक आहे.

ITMS यंत्रणा राबविणेकामी राज्य शासनामार्फत केंद्रशासनाकडे पिं.चिं.मनपाने दि.१६।०२।२०१३ रोजी र.रू.१८.६२ कोटीचा DPR सादर केला होता. त्यास अनुसरून केंद्रशासनाने JnNURM अंतर्गत पिं.चिं.मनपाचा सदर DPR दि.०४।०३।२०१४ रोजी CSMC बैठकीमध्ये मंजुर केलेला आहे. तथापि तदनंतर दि.०५।०६।२०१४ च्या CSMC बैठकीमध्ये सदर DPR केंद्र शासनाने Budget Constraint मुळे नामंजुर केला आहे. त्यामुळे केंद्रशासनाच्या JnNURM च्या

अंतर्गतच्या निधीमधून कॉरीडॉर १ व २ करिता ITMS यंत्रणा कार्यान्वित करणे सध्या शक्य होत नाही.

ITMS यंत्रणा उभारणेकामी JnNURM अंतर्गत केंद्रशासनाचे ५०%,राज्य शासनाचे २०%, व मनपाचे ३०% असा निधी उपलब्ध करणेत येणार होता.तथापि केंद्रशासनाने ITMS चा DPR निधीच्या कमतरते अभावी नामंजूर केल्याने ITMS यंत्रणा कार्यान्वित करणेसाठी मनपास १००% निधी PMPML कडे उपलब्ध करून द्यावा लागणार आहे.तसेच बीआरटीएस बस सेवा यशस्वी होणेसाठी ITMS यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक आहे. मनपाचे बीआरटीएस कॉरीडॉर १ व २ करिता ITMS यंत्रणा पुर्णपणे मनपा फंडातून करणे व कॉरीडॉर ३ व ४ करिता ITMS यंत्रणा भविष्यात केंद्र शासनाचा निधी उपलब्ध झाल्यानंतर राबविणे योग्य राहील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकरिता ITMS यंत्रणा राबविणे करिता मा.महापालिका सभा ठराव क्र.२७४ दि.०९।०५।२०१३ अन्वये र.रू.४९.७१ कोटी च्या रकमेस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. ITMS यंत्रणा कार्यान्वित करणेचे सल्लागार मे.Urban Mass Transit Company,Delhi असून त्यांनी बीआरटीएस कॉरीडॉर १ व २ करिता ITMS यंत्रणा कार्यान्वित करणे,नियंत्रण केंद्र ( Control Centre ) व Disaster Recovery Centre विकसित करणे या कामाकरीता पिं.चिं.मनपा चा हिस्सा म्हणून एकूण १५.८७ कोटी खर्च अपेक्षित असल्याचे कळविले आहे. पिं.चिं.मनपा मधील बीआरटीएस बस सेवा चालू करणेकामी ITMS विकसित करणेकरिता बीआरटीएस रस्त्यांची अनुषंगिक कामे करणे या उपलेखाशिर्षाअंतर्गत सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकांध्ये अ.क्र.५ (iv) वर र.रू.१० कोटी ची तरतूद केलेली आहे. ITMS ची निविदा PMPML मार्फत प्रसिध्द करणेची कार्यवाही चालू केली आहे. ITMS विकसित करणेकामी नियंत्रण केंद्र (Control Centre) व Disaster Recovery Centre हे पुणे व पिंपरी चिंचवड मनपा करिता एकत्रित असून स्वारगेट येथे उभारणेत येणार आहे.

तरी पिं.चिं.मनपा हद्दीतील दापोडी - निगडी व सांगवी - किवळे या दोन कॉरीडॉरवर बीआरटीएस बस सेवा सुरू करणेकामी ITMS यंत्रणा उभारणेसाठी निविदा कार्यवाही करणेकामी PMPML ला उपलब्ध तरतूदीनुसार सध्या र.रू.१० कोटी देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १७

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ** –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पापु।जशुके।जा क्र। १२८।२०१४ दिनांक - १०।७।२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात पाणी पुरवठा करण्यासाठी दररोज सुमारे४५० द.ल.ली. पाणी लागते. सदरचे पाणी पवना धरणातून नदीमध्ये सोडण्यात येते. नदीमध्ये रावेत बंधा-यातून अशुध्द जलउपसा केंद्रातून सेक्र.२३ येथे जलशुध्दीकरण प्रक्रीया करुन संपुर्ण शहरात वितरित करण्यात येते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर व धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दि १०/०७/२०१४ पर्यंत पाऊस सुरु न झाल्यामुळे पवना धरणातील पाण्याची पातळी खालावली आहे. सद्यस्थितीत पवना धरणामध्ये १३.७२% पाणी साठा उपलब्ध आहे. सदरचा पाणीसाठा मनपाने सुरु केलेल्या पाणी कपातीच्या नियोजनाप्रमाणे सुमारे ३० ऑगस्ट पर्यंत पुरेल. सद्यस्थितीत लांबलेला पावसाळा विचारात घेता सदरचा उपलब्ध पाणी साठा काटकसरीने वापरणे अपरिहार्य आहे. यासाठी महानगरपालिकेने या पुर्वी २ जुलै पासून १ वेळ पाणी पुरवठ्याचे धोरण अवलंबलेले आहे. यामुळे साधारणतः एकुण वापरामध्ये सुमारे २०% पाणी कपात करणे शक्य झाले आहे. सद्यस्थितीत पुढील काळाचा विचार करता आज दि. १०/०७/२०१४ रोजी मा. आयुक्तांनी पाणी पुरवठा विभागच्या सर्व अभियंता समवेत बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये पाणी टंचाई बाबत केलेल्या उपाययोजना व या पुढील काळात सर्वंकष पाणी टंचाई आराखडा तयार करणेचे दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांची माहिती प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ मध्ये जोडली आहे. सदरची माहीती अवलोकन करणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.सुजाता पालांडे** - मा. महापौर साहेब, विषय क्रमांक १७ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.अमिना पानसरे** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ५४६ विषय क्रमांक - १७

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ** –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पापु।जशुके।जा क्र। १२८।२०१४ दिनांक - १०।७।२०१४

विषय क्रमांक १७ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अनिता तापकीर** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १८

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ** –१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पापु।जशुके।जा क्र। १२९।२०१४ दिनांक - १०।७।२०१४

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात पाणी पुरवठा करण्यासाठी दररोज सुमारे४५० द.ल.ली. पाणी लागते. सदरचे पाणी पवना धरणातून नदीमध्ये सोडण्यात येते. नदीमध्ये रावेत बंधा-यातून अशुध्द जलउपसा केंद्रातून सेक्र.२३ येथे जलशुध्दीकरण प्रक्रीया करुन संपुर्ण शहरात वितरित करण्यात येते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसर व धरणाच्या पाणलोट क्षेत्रात दि १०/०७/२०१४ पर्यंत पाऊस सुरु न झाल्यामुळे पवना धरणातील पाण्याची पातळी खालावली आहे. सद्यस्थितीत पवना धरणामध्ये १३.७२% पाणी साठा उपलब्ध आहे. सदरचा पाणीसाठा मनपाने सुरु केलेल्या पाणी कपातीच्या नियोजनाप्रमाणे सुमारे ३० ऑगस्ट पर्यंत पुरेल. सद्यस्थितीत लांबलेला पावसाळा विचारात घेता सदरचा उपलब्ध पाणी साठा काटकसरीने वापरणे अपरिहार्य आहे. यासाठी महानगरपालिकेने या पुर्वी २ जुलै पासून १ वेळ पाणी पुरवठ्याचे धोरण अवलंबलेले आहे. यामुळे साधारणतः एकुण वापरामध्ये सुमारे २०% पाणी कपात करणे शक्य झाले आहे. सद्यस्थितीत पुढील काळाचा विचार करता आज दि. १०/०७/२०१४ रोजी मा. आयुक्तांनी पाणी पुरवठा विभागच्या सर्व अभियंता समवेत बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये पाणी टंचाई बाबत केलेल्या उपाययोजना व या पुढील काळात सर्वंकष पाणी टंचाई आराखडा तयार करणेचे ठरले.

पाणी टंचाई परिस्थितीचा विचार करता पाणी पुरवठा विषयक कामकाजासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेचे गरजेचे असल्याने या बाबत आर्थिक व प्रशासकीय निर्णय घेण्याचे अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. पेपरला बातमी आलेली आहे की पुणे महापालिकेनी त्यांचा पाणीपुरवठा पुर्ववत केलेला आहे त्यामुळे सर्वप्रथम मी सभागृहाच्या वतीने विनंती करते की, आपले धरण पुर्ण भरलेले आहे, पाऊस चालू आहे त्यामुळे गेल्या पंधरा दिवसामध्ये जी असुविधा झालेली होती ती असुविधा टाळण्यासाठी आपण पुर्ववत पाणीपुरवठा करावा अशी मी विनंती करते.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवडमध्ये एक टाईम पाणी ठेवावे. आम्ही शेवटच्या टोकाला आहोत, एक टाईम पाणी आलेतर पाणी मिळते. धरण शंभर टक्के भरल्यानंतर दोन टाईम पाणी सोडण्याचा विचार करावा. आता एक वेळेस पाणी दयावे. एक ते दिड कि.मी. लांब लांब लाईनी आहेत त्याच्यामध्ये आपण पाणीपुरवठा एक तास सोडतो एक तासामध्ये २५ मिनीटे लाईन भरण्यासाठी जातात त्यामुळे अर्धा तास पाणी मिळते. शंभर टक्के धरणात पाणी आल्यानंतरच हे करावे, आता एक टाईमच पाणी दयावे.

**मा.आश्विनी चिंचवडे** - मा.महापौर साहेब, महिलांचे काम सकाळच्या वेळेस असते त्यामुळे सकाळच्या वेळेस पाणीपुरवठा करावा.

**मा.विनया तापकीर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त आमचा ग्रामीण भाग आहे. ग्रामीण भागावर अनेक वर्षापासून अन्याय होतो आहे. आमचे म्हणणे आहे की, सर्व ग्रामीण भागातील जे गाव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत येतात त्यांना समान पाणी वाटप करावं. आमच्यावर अन्याय करु नका. जे एक तास पाणी येते ते सुध्दा अपुर्ण पाणीपुरवठा आहे प्रेशरन येत नाही, लोप्रेशर असतो. वारंवार सांगुन सुध्दा उपाययोजना केल्या जात नाहीत, मी कालच आपल्याला सांगीतल आहे की आपण त्याबद्दल मिटींग घेवू. अधिका-यांना विचारलेतर समाधानकारक उत्तर मिळत नाहीत. मला वाटत जे पाणी च-होलीसाठी किंवा मोशीसाठी, जो ग्रामीण भाग आहे त्यासाठी से.२३ मधून जे पाणी उचलाव लागत ते आपण उचलत आहोत त्यामुळे माझी अशी सूचना राहील की आम्हांला पाणी वाढवून दयावे.

**मा.स्वाती साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सर्वांना पाणीपुरवठा कमी आहे. आमच्या भागाचा प्रश्न आहे. आमच्याकडे टाकीशिवाय पर्याय नाही. जास्त वेळ पाणी सोडून सुध्दा आमच्याकडचा प्रश्न सुटणार नाही कारण तो चढावरचा भाग आहे. त्यामुळे आपण लवकरात लवकर कार्यवाही करावी व ग्रामीण भागाला दोन वेळेस पाणी दयाव.

**मा.अरुणा भालेकर** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ग्रामीण भाग सतरा वर्षे झाले महापालिकेमध्ये समाविष्ट झालेला आहे. तरी आमच्याकडे प्रत्येक भागामध्ये पाण्याची टंचाई आहे. आमच्याकडे पाणी दोन वेळा याव, नाहीतर सगळीकडेच एक टाईम पाणी दयावे एवढच बोलते आणि थांबते.

**मा.आशा सुर्यवंशी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. मी तुमच्याकडे पाण्याच्या संदर्भात गेले तीन दिवसापासून दोनवेळा भेटून झालेलं आहे. माझ्या वॉर्डात बीजलीनगरचा भागातील टाक्या उंचवटयावर असल्यामुळे खुप पाण्याची टंचाई होत आहे आणि नागरीकांना त्रास होत आहे. लोकांना पाणी साठवण्याच्या टाक्या करता येणार नाहीत त्यामुळे माझी अग्रहाची विनंती राहील माझ्या प्रभागाला दोन वेळेस पहिला होता तसा पाणीपुरवठा करावा.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रत्येक नगरसेवकांचे आपल्या वॉर्डातील नागरीकावर प्रेम असते, जीव असतो. त्यांना असं वाटत की आपण त्यांना किती सुविधा दयाव्यात असं वाटत असतं. तुम्ही शहराचे प्रमुख आहात. त्यामुळे काही वॉर्डाला दोन वेळा व काही वॉर्डाला एक वेळा असा अन्याय करु नका. यापुर्वी सुध्दा आम्हांला दापोडीला एकच वेळा पाणी मिळत होतं आणि ते पुरतं आता सुध्दा एक वेळाच पाणी आहे आणि सगळयांनाच एक वेळा पाणी दया. लोकांना या दरम्यान चांगली सवय लागलेली आहे. लोक पाणी काटकसरीने वापरतात ही सवय कन्टीन्यू ठेवा आणि दोन वेळा पाणी देत असालतर सगळयांनाच दोन वेळा पाणी दया, सर्वांना नियम सारखाच ठेवा ही विनंती आहे.

**मा.मंगलाताई कदम**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पाण्याचा विषय खरंच जिव्हाळयाचा आहे. नशीबान पाऊस पडणार नाही, पडणार नाही असं म्हणत होतो परंतु पाऊस पडला. आता डॅम पण भरत आलेले आहेत. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये सगळयाना सारख पाणी दयाव अशी विनंती आहे. कुठल्याही नगरसेवकांवर अन्याय होवू नये परंतु प्रेशरनं पाणी दयाव. आताच सांगीतल की आम्हांला एक टाईम पाणी दिलतरी चालेल परंतु ते प्रेशरन आणि पुरेस होईल अशा पध्दतीन दया. की जेणेकरुन कोणीचीही टँकरची मागणी येणार नाही. एकतर पावसाळयात पाण्यात गढुळपणा येवू शकतो. चांगल्या पध्दतीच व्यवस्थीत व प्रेशरने पाणी दयाव. विषय क्रमांक १८ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सुचना मी मांडते. श्री.टेकाळे साहेब यांची बदली झालेली आहे त्यांचा सत्कार करावा.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, सूचनेस मी अनुमोदन देतो. सर्वांना आवाहन करतो मध्यंतरी पाणी नव्हते, पाण्याची भयान परिस्थिती होती त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनी ओळखावे. ज्यावेळा पाणी नव्हतं त्यावेळेला काय अवस्था होती. पाणी एकदाच यायच नंतर दोन दिवसाआड यायच अशी परिस्थिती होती. माझे म्हणणे आहे की पाणी एक वेळ दिलेतरी

चालेल परंतु प्रेशरने पाणी मिळावे. ज्या वॉर्डात पाणी येत नाही, ते ठिकाण असे आहेत की रायझींग मेन वर आहे, आणि ते उंचावर आहेत त्या लोकांना अजीबात प्रेशर मिळत नाही अशा ठिकाणी तशाप्रकारचे निर्देष संबंधीत विभागाना दयावेत. त्याचे सर्वेक्षण केले पाहिजे. अती महत्वाची गोष्ट म्हणजे एक वेळेस पाणी दया परंतु प्रेशरने दयावे हे आम्ही सर्वजन मान्य करतो. परंतु लिकेजेस कमी कराव व त्यावर नियंत्रण ठेवावे. स्लममध्ये पाणी दयावे, परंतु स्लम मध्ये असं होतं की पाणी दिवसांदिवस वाहत राहतं त्याच्यावर नियंत्रण आपले राहत नाही. पाणी वेस्टेज होणार नाही याकडे लक्ष दयावे. झोपडपट्टीमध्ये पाणी दया परंतु वेस्टेज होणार नाही याकडे पाहण्यासाठी स्कॉड नेमून लक्ष दयावे. भविष्यात नागरीकांनी पाण्याचे महत्व लक्षात घेता पाण्याची बचत केली पाहिजे. तरी एक टाईम पाणी दया प्रेशरने दया आणि समसमान पाणी दयावे.

**मा.शुभांगी बो-हाडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.पोर्णिमा सोनवणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ५४७ विषय क्रमांक - १८

दिनांक - ५/८/२०१४ विभाग - मा.आयुक्त

**संदर्भ -**१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. पापु। जशुके।जा क्र। १२९। २०१४ दिनांक - १०।७।२०१४

विषय क्रमांक १८ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर** - टेकाळे साहेब यांची बदली झालेली आहे त्यामुळे त्यांचा सत्कार करणेत येत आहे.

(मा.उदय टेकाळे, सहा.आयुक्त यांचा मा.महापौर, मा.उपमहापौर, अध्यक्ष- स्थायी समिती, पक्षनेते, विरोधी पक्षनेते, सर्व गटनेते यांचे हस्ते सत्कार करणेत आला.)

**मा.महापौर**- सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/८१९/१४
दिनांक - २९/०९/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.